म. ग्रं. सं. ठाणे.
विषय चरित्र
सं. क्र. ११८६

चरित्र


# सूर्यास्त

प्र. के. अत्रे.

REFBK-0013808

# सूर्यास्त

प्राचार्य प्रल्हाद केशव अत्रे



१३८०८

११८५.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १३८०८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)





REFBK-0013808

## प्राचार्य प्रल्हाद केशव अत्रे

ह० वि० मोटे प्रकाशन

किंमत ३ रुपये



© प्रल्हाद केशव अत्रे
पहिली आवृत्ति
१५ ऑगस्ट १९६४
श्रावण २४, शक १८८६

सजावट  स्टुडीओ डी. जी. जी.
११ अजय निवास, वडाळा, मुंबई ३१

छायाचित्र  हरबन्स चड्डा, मुंबई १

प्रकाशक  ह. वि. मोटे
३ वेस्ट व्ह्यू
दादर, मुंबई १४

मुद्रक  वि. पु. भागवत.
मौज प्रिंटिंग ब्यूरो, मुंबई ४

एकमेव विक्रेते  पॉप्युलर बुक डेपो, मुंबई ७
बॉम्बे बुक डेपो, मुंबई ४

स्वातंत्र्यसूर्य मावळला

अग्नये स्वाहा !

अश्रु आणि फुलें

लोकप्रिय नेहरू


भारताचे ऋतुराज


नेहरू आणि गांधीजी

नेहरू आणि पंचशील

नेहरूवाद

विरोधकांना भुलविणारे नेहरू





रसिकराज नेहरू

चाचा नेहरू

नेहरूंचें अंतरंग

नेहरू आणि गुलाब

ऋतुसंहार

अखेरचा प्रणिपात

अनंताची हांक

अखेरची इच्छा

जीवनपट

# स्वातंत्र्यसूर्य मावळला

भारताचे पंतप्रधान गेले. जवाहरलाल नेहरू गेले. दुपारीं अडीच वाजतां वज्राघाताप्रमाणें ती भयानक वार्ता आमच्या कानांवर आदळली आणि कांहीं काळ आमचा मेंदू बधिर झाला. आमचें हृदय गोठल्याचा आम्हांला भास झाला. आमच्या साऱ्या गात्रांची चैतन्यशक्तीच लुप्त झाल्यासारखें आम्हांला वाटूं लागलें. बराच वेळपर्यंत त्या घोर वार्तेवर आमचा विश्वासच बसेना!

अलीकडे कांहीं महिन्यांपासून नेहरू आजारी होते हें सर्वविश्रुत होतें. आठवड्याभरापूर्वींच मुंबईमध्यें भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या अधिवेशनासाठीं ते आले होते, तेव्हां ते एवढे क्षीण झाले होते कीं, बसल्या जागेवरून उठण्यासाठीं त्यांना दुसऱ्याच्या हाताचा आधार घ्यावा लागत होता. पण तरीहि ती भेट मुंबईला नि महाराष्ट्राला त्यांनीं दिलेली शेवटचीच भेट ठरेल असें मात्र कुणाच्याहि ध्यानींमनीं आलें नव्हतें. मुंबईमधलें तें अधिवेशन आटोपल्यावर नेहरू

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थलप्रत
अनुक्रम 3९९९४ वि: चारीत्र
क्रमांक ११७६ नों: दि: ५/५/६७
मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे ९३/०८

विश्रांतीसाठीं दोन दिवस डेहराडूनला गेले होते. तेथून ते दिल्लीला परतले नि कांहीं तासांतच मेंदूमध्यें रक्तस्राव होऊन त्यांचें अकस्मात् निधन झालें.

नेहरूंचा अंत हा केवळ एका व्यक्तीचा अंत नाहीं. तो भारताच्या इतिहासामधील एका सबंध युगाचा अंत होय. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामांत लोकमान्य टिळक यांच्या युगानंतर गांधीयुग आलें. त्या युगांतहि गांधीजींच्या खालोखाल देशव्यापी लोकप्रियता जवाहरलाल नेहरू आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांनाच काय ती लाभली. पित्याप्रमाणेंच पुत्रहि कर्तबगार निपजण्याचा चमत्कार जगांत क्वचितच घडतो. पण जवाहरलाल नेहरूंच्या बाबतींत तो चमत्कार घडला.

गांधीजींचे एक ज्येष्ठ नि श्रेष्ठ सहकारी पंडित मोतीलाल नेहरू यांचे चिरंजीव म्हणून जवाहरलालजींनीं भारताच्या राजकारणांत पदार्पण केलें नि लवकरच अग्रगण्य राष्ट्रीय नेत्यांच्या मालिकेंत त्यांचें नांव झळकूं लागलें. जवाहरलाल हे गांधीजींचे निष्ठावंत शिष्य होते. पण विद्यार्थीदशेच्या काळांत अनेक वर्षें विलायतेंत राहिल्यामुळें आधुनिक पाश्चात्य विचारसरणीचा परिणाम त्यांच्या मनावर झाला होता. त्या विचारसरणीचा पुरस्कार कॉंग्रेसमध्यें जवाहरलालजींनींच सर्वांत प्रभावीपणें केला.

कॉंग्रेसच्या राजकारणावर आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनाचा ठसा जवाहरलालजींनींच उमटवला. चीन, अबिसिनिया, स्पेन आदि अन्य देशांच्या स्वातंत्र्यवादी नि फॅसिझमविरोधी संग्रामांना कॉंग्रेसचा पाठिंबा जवाहरलालजींनीं मिळवून दिला आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्याला अन्य देशांमधल्या जनतेचा पाठिंबा मिळवण्यासाठीं त्यांनीं कसोशीचे प्रयत्न केले. भारतामध्यें समाजवादी आंदोलनाचा उगम जवाहरलालजींचा भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर उदय होण्यापूर्वींच झाला होता. पण सोविएत रशियाचा १९२८

मध्यें दौरा करून परतल्यावर जवाहरलालजींनीं काँग्रेसच्या व्यासपीठावरून समाजवादाचा उद्घोष जो केला, त्यामुळें समाजवादी विचारसरणीचा देशाच्या कोनाकोपऱ्यांतहि प्रसार होण्यास प्रचंड साहाय्य झालें हें निर्विवाद आहे.

१९२९ मध्यें कम्युनिस्ट नेत्यांवर ब्रिटिश सत्तेविरुद्ध युद्ध पुकारल्याच्या आरोपाखालीं मीरत कटाचा खटला जो भरण्यांत आला त्यामध्यें त्या आरोपींच्या बचावाचे वकील म्हणून नेहरू न्यायालयांत उभे राहिले. देशामधल्या कामगारांच्या वर्गीय आंदोलनालाहि जवाहरलालजींनीं त्या काळांत पाठिंबा दिला आणि अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेसचें अध्यक्षपदहि त्यांनीं भूषविलें. स्वराज्यप्राप्तीनंतर भारतीय जनतेचें जीवन सुखी नि समृद्ध करण्यासाठीं आर्थिक नियोजनाची आवश्यकता आहे हें सत्य स्वातंत्र्यपूर्व काळांतच काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांच्या गळीं नेहरूंनींच पहिल्याप्रथम उतरवलें आणि अशा नियोजनाचा आराखडाहि काँग्रेसच्या योजना समितीचे अध्यक्ष या नात्यानें १९३८ सालांत त्यांनीं तयार केला.

देशामधल्या सगळ्या परकीय भांडवलाचें नि सगळ्या मूलभूत उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण करणें, जमीनदारशाही नष्ट करून 'कसेल त्याची जमीन' करणें, यांसारख्या क्रांतिकारक सूचना त्या आराखड्यांत नेहरूंनीं केल्या होत्या. नेहरूंच्या या जहाल दृष्टिकोनामुळें त्यांचे गांधीजींशीं वेळोवेळीं खटकेहि उडाले. उदाहरणार्थ, काँग्रेसनें संपूर्ण राष्ट्रीय स्वातंत्र्याची मागणी करावी हें गांधीजींना प्रथमतः मान्य नव्हतें. ब्रिटिश साम्राज्याच्या चौकटींतील अंतर्गत स्वायत्तता (डोमिनियन स्टेटस) म्हणजेच स्वराज्य अशी

विश्रांतीसाठीं दोन दिवस डेहराडूनला गेले होते. तेथून ते दिल्लीला परतले नि कांहीं तासांतच मेंदूमध्यें रक्तस्राव होऊन त्यांचें अकस्मात् निधन झालें.

नेहरूंचा अंत हा केवळ एका व्यक्तीचा अंत नाहीं. तो भारताच्या इतिहासामधील एका सबंध युगाचा अंत होय. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामांत लोकमान्य टिळक यांच्या युगानंतर गांधीयुग आलें. त्या युगांतहि गांधीजींच्या खालोखाल देशव्यापी लोकप्रियता जवाहरलाल नेहरू आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांनाच काय ती लाभली. पित्याप्रमाणेंच पुत्रहि कर्तबगार निपजण्याचा चमत्कार जगांत क्वचितच घडतो. पण जवाहरलाल नेहरूंच्या बाबतींत तो चमत्कार घडला.

गांधीजींचे एक ज्येष्ठ नि श्रेष्ठ सहकारी पंडित मोतीलाल नेहरू यांचे चिरंजीव म्हणून जवाहरलालजींनीं भारताच्या राजकारणांत पदार्पण केलें नि लवकरच अग्रगण्य राष्ट्रीय नेत्यांच्या मालिकेंत त्यांचें नांव झळकूं लागलें. जवाहरलाल हे गांधीजींचे निष्ठावंत शिष्य होते. पण विद्यार्थीदशेच्या काळांत अनेक वर्षें विलायतेंत राहिल्यामुळें आधुनिक पाश्चात्य विचारसरणीचा परिणाम त्यांच्या मनावर झाला होता. त्या विचारसरणीचा पुरस्कार काँग्रेसमध्यें जवाहरलालजींनींच सर्वांत प्रभावीपणें केला.

काँग्रेसच्या राजकारणावर आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनाचा ठसा जवाहरलालजींनींच उमटवला. चीन, अबिसिनिया, स्पेन आदि अन्य देशांच्या स्वातंत्र्यवादी नि फॅसिझमविरोधी संग्रामांना काँग्रेसचा पाठिंबा जवाहरलालजींनीं मिळवून दिला आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्याला अन्य देशांमधल्या जनतेचा पाठिंबा मिळवण्यासाठीं त्यांनीं कसोशीचे प्रयत्न केले. भारतामध्यें समाजवादी आंदोलनाचा उगम जवाहरलालजींचा भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर उदय होण्यापूर्वींच झाला होता. पण सोविएत रशियाचा १९२८

मध्यें दौरा करून परतल्यावर जवाहरलालजींनीं काँग्रेसच्या व्यासपीठावरून समाजवादाचा उद्‌घोष जो केला, त्यामुळें समाजवादी विचारसरणीचा देशाच्या कोनाकोपऱ्यांतहि प्रसार होण्यास प्रचंड साहाय्य झालें हें निर्विवाद आहे.

१९२९ मध्यें कम्युनिस्ट नेत्यांवर ब्रिटिश सत्तेविरुद्ध युद्ध पुकारल्याच्या आरोपाखालीं मीरत कटाचा खटला जो भरण्यांत आला त्यामध्यें त्या आरोपींच्या बचावाचे वकील म्हणून नेहरू न्यायालयांत उभे राहिले. देशामधल्या कामगारांच्या वर्गीय आंदोलनालाहि जवाहरलालजींनीं त्या काळांत पाठिंबा दिला आणि अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेसचें अध्यक्षपदहि त्यांनीं भूषविलें. स्वराज्यप्राप्तीनंतर भारतीय जनतेचें जीवन सुखी नि समृद्ध करण्यासाठीं आर्थिक नियोजनाची आवश्यकता आहे हें सत्य स्वातंत्र्यपूर्व काळांतच काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांच्या गळीं नेहरूंनींच पहिल्याप्रथम उतरवलें आणि अशा नियोजनाचा आराखडाहि काँग्रेसच्या योजना समितीचे अध्यक्ष या नात्यानें १९३८ सालांत त्यांनीं तयार केला.

देशामधल्या सगळ्या परकीय भांडवलाचें नि सगळ्या मूलभूत उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण करणें, जमीनदारशाही नष्ट करून ‘कसेल त्याची जमीन’ करणें, यांसारख्या क्रांतिकारक सूचना त्या आराखड्यांत नेहरूंनीं केल्या होत्या. नेहरूंच्या या जहाल दृष्टिकोनामुळें त्यांचे गांधीजींशीं वेळोवेळीं खटकेहि उडाले. उदाहरणार्थ, काँग्रेसनें संपूर्ण राष्ट्रीय स्वातंत्र्याची मागणी करावी हें गांधीजींना प्रथमतः मान्य नव्हतें. ब्रिटिश साम्राज्याच्या चौकटींतील अंतर्गत स्वायत्तता (डोमिनियन स्टेटस) म्हणजेच स्वराज्य अशी

गांधीजींची व्याख्या होती. पण १९२८ मध्यें भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या बैठकींत जवाहरलाल, नेताजी सुभाष बोस आणि कम्युनिस्ट यांनीं संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव संयुक्तपणें मांडला आणि सरदार वल्लभभाई पटेल आदि 'उजव्या' नेत्यांच्या विरोधाला न जुमानतां तो बहुमतानें संमत झाला.

गांधीजी त्या बैठकीला हजर नव्हते. पण नंतर त्या ठरावाला त्यांनीं जाहीर विरोध दर्शवला होता. परंतु गांधीजींना हवें असलेलें मर्यादित स्वराज्य निश्चित काल-मर्यादेच्या आंत द्यायला ब्रिटिश राज्यकर्ते तयार होईनात, तेव्हां गांधीजींनीं संपूर्ण स्वातंत्र्याच्या ठरावाला पाठिंबा दिला आणि २६ जानेवारी १९३० रोजीं भरलेल्या कॉंग्रेसच्या अखिल भारतीय अधिवेशनांत जवाहरलालजींनींच तो ठराव मांडला आणि तो एकमतानें संमत झाला. गांधीजींच्या हयातींतहि जवाहरलालजींना भारतीय जनतेच्या हृदयांत जें वेगळें अढळ स्थान लाभलें, त्याचें खरें कारण हेंच होतें कीं, गांधीजींपेक्षां अधिक क्रांतिकारक नि अधिक पुरोगामी भूमिका त्या काळांत जवाहरलालजींनीं घेतली. त्यामुळेंच देशामधल्या जहाल राष्ट्रप्रेमी तरुणांचे आणि कामगार-शेतकऱ्यांचे जवाहरलाल नेहरू हे सर्वांत लाडके पुढारी बनले.

पण नेहरूंवर तरीहि गांधीजींचा वैयक्तिक प्रभाव एवढा जबरदस्त होता कीं, गांधीजींची गैरमर्जी स्वीकारून कॉंग्रेस-मधल्या संघटित डाव्या शक्तींचें नेतृत्व स्वीकारण्याचें नेहरूंनीं नाकारलें. एवढेंच नव्हे तर नेताजी सुभाष बोस यांनीं कॉंग्रेसमधील सगळ्या डाव्या पक्षांच्या संयुक्त पाठिंब्यानें गांधीवादी राजकारणाला आव्हान देण्याचा प्रयत्न त्रिपुरा कॉंग्रेसच्या वेळीं केला, तेव्हां नेहरूंनीं गांधीजींची बाजू घेऊन नेताजींना विरोध केला. गांधीजींना पर्यायी असें नेतृत्व निर्माण करण्यासाठीं आवश्यक ती वैचारिक सामुग्री, लोक-प्रियता नि कॉंग्रेसमधल्या जहालांचें पाठबळ नेहरूंच्या

पाठीशीं असतांनाहि त्यांनीं गांधीजींच्या दडपणापुढें वेळोवेळीं नमतें घेतलें, हीच त्यांच्या राजकारणाची खरी शोकांतिका होय.

यामुळें नेहरू अखेरपर्यंत गांधीवादी उजव्या गटाच्या कॉंग्रेसवाल्या पुढाऱ्यांच्या गोतावळ्यांतच राहिले आणि त्याचा परिणाम नेहरूंच्या एके काळच्या क्रांतिकारक विचार-सरणीची धार अधिकाधिक बोथट होण्यांत झाली, तरीहि गांधीजी नि सरदार पटेल ह्यांच्या निधनानंतर आणि नेताजी सुभाष बोस यांच्या देशत्यागानंतर नेहरूंइतका श्रेष्ठ नेता कॉंग्रेसमध्यें दुसरा कुणी उरला नव्हता हें सत्य आहे. नेहरूंच्या राजकारणाविषयीं केवळ कॉंग्रेसविरोधी पक्षांच्याच नव्हे, तर खुद्द कॉंग्रेसमधल्या अनेक नेत्यांचे तीव्र मतभेद होते. आंतर-राष्ट्रीय राजकारणांतील शांततावादीत्वाच्या अतिरेकामुळें नेहरूंनीं पाकिस्तानी आक्रमकांपुढें काश्मीरच्या नि अन्य अनेक प्रश्नांवर पुन्हा पुन्हा जी पड खाल्ली ती भारताला अपकारक ठरली. त्याच वृत्तीमुळें नेहरू चिनी आक्रमणा-विषयीं गाफील राहिले. त्यामुळें त्यांच्याबद्दल पुष्कळच गैरसमज पसरला.

/ पण सूर्यावर देखील डाग असले तरी त्यामुळें तो काजवा ठरत नाहीं. सूर्य तो सूर्यच ! म्हणून नेहरूंच्या राजकारणावर टीका करण्यासारखें पुष्कळ असलें तरी भारतीय स्वातंत्र्य-संग्रामाचे एक महानेते आणि नंतर स्वतंत्र भारताचे पंतप्रधान या नात्यानें नेहरूंनीं जी महान् कामगिरी बजावली, ती या देशाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं नमूद झाल्याखेरीज राहणार नाहीं. या खंडप्राय देशामधल्या पंचेचाळीस कोटि लोकांपैकीं प्रत्येकाच्या मुखीं ज्याचें नांव दुमदुमत आहे,

हिमालयाच्या गिरिराजींतील, आसामच्या अरण्यांतील, राजस्तानच्या वालुकामय प्रदेशांतील, महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांतील, कन्याकुमारीच्या किनारपट्टींतील, सबंध देशाच्या साऱ्या कोनाकोपऱ्यांतील प्रत्येक प्रदेशामध्यें ज्याचें चित्र कोठें ना कोठें लावलेलें आढळेल, असा नेहरूनंतर दुसरा नेता या देशांत कुणी नाहीं.

आज आशिया-आफ्रिकेमधल्या अनेक देशांनीं स्वीकारलेल्या तटस्थतावादी परराष्ट्रीय राजनीतीचे जनक नेहरू होते. त्या राजनीतीची त्यांनीं केलेली प्रत्यक्ष अंमलबजावणी वादग्रस्त असली, तरी भारतासारख्या नव्यानेंच स्वतंत्र झालेल्या नि मागासलेल्या राष्ट्रानें जगामधल्या या अथवा त्या सत्तागटाचे मिंधे न बनतां आंतरराष्ट्रीय राजकारणांत स्वतंत्र भूमिकाच घेतली पाहिजे ही नेहरूंची मूलभूत विचारसरणी द्रष्टेपणाची होती हें आजहि प्रत्ययाला येत आहे. या धोरणामुळें नेहरूंच्या नांवाला जगाच्या पंचखंडांत प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन्सन, रशियाचे पंतप्रधान ख्रुश्चेव, इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष नासर, एवढेंच काय पण चिनी आक्रमकांचे अग्रणी माओ त्से-तुंग नि चौ एन्-लाय यांच्याशीं एक तोलामोलाचा आंतरराष्ट्रीय दर्जाचा मुत्सद्दी या नात्यानें बोलूं शकणारा नेता नेहरूनंतर भारतामध्यें दुसरा कुणी नव्हता.

कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालीं भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं झालेल्या संग्रामांतील अखेरचा अग्रगण्य नेता नेहरूंच्या निधनामुळें आज अस्तंगत झाला आहे. स्वातंत्र्यलढ्याच्या त्या कालखंडाला स्वातंत्र्यप्रस्थापनेनंतरच्या कालखंडाशीं जोडणारा एक महान् दुवा नेहरूंच्या निधनामुळें निखळला आहे. या देशामधल्या लोकशाहीच्या राज्यसत्तेचा सर्वोच्च नायक नेहरूंच्या निधनामुळें हरपला आहे. जागतिक शांततेच्या आकाशांतील एक तेजस्वी तारा नेहरूंच्या निधनामुळें मावळला आहे. देशाच्या इतिहासांतील एका युगप्रवर्तक

कालखंडाची इतिश्री नेहरूंच्या निधनामुळें झाली आहे. नेहरूंची जागा घेऊं शकेल आणि सबंध राष्ट्राच्या राजकारणावर आपला प्रभाव गाजवूं शकेल, एवढ्या श्रेष्ठ दर्जाचा नि अमाप लोकप्रियतेचा कोणीहि एक नेता आमच्या नजरेसमोर आज नाहीं. मग कालाच्या उदरांत काय दडलें आहे कोणास ठाऊक !


पण निदान आज तरी असें म्हणणेंच भाग आहे कीं, लोकमान्य टिळकांनंतर राष्ट्राच्या नेतृत्वाचा वारसा गांधीजींनीं चालवला, गांधीजीनंतर तो वारसा नेहरूंनीं चालवला, पण नेहरूंचा मात्र राजकीय वारस कुणीच उरला नाहीं. यामुळें नेहरूंच्या निधनानंतर देशामधल्या काँग्रेस राजवटींत निर्नायकी माजण्याचा धोका आम्हांला दिसत आहे. देशाच्या सीमेवर चिनी आणि पाकिस्तानी आक्रमक शस्त्रें परजीत खडे आहेत आणि खुद्द देशामध्यें आर्थिक, राजकीय इत्यादि सर्व क्षेत्रांमध्यें अत्यंत अनिश्चित नि विकट परिस्थिति निर्माण झाली आहे, अशा वेळींच सबंध देशावर ज्यांचा प्रभाव होता असा नेहरूंसारखा लोकोत्तर नेता काळानें ओढून नेला आहे. आतां/राष्ट्रीय स्वातंत्र्याची, लोकशाहीची नि समाजवादाची चाड असलेल्या सगळ्या शक्तींनीं जर आपसांतले क्षुद्र पक्षीय मतभेद बाजूला सारून साऱ्या जनतेचें सामुदायिक नेतृत्व करण्यासाठीं एकसंध फळी उभारली, तरच देशाला तरणोपाय आहे.

पण पुढें जें काय घडायचें असेल तें असो. आज तरी नेहरूंच्या निधनामुळें सबंध राष्ट्राची घोर हानि झाली आहे हें खरें. त्यांच्या स्मृतीला दुःखित अंतःकरणानें, अश्रुपूर्ण नयनांनीं दोन्ही हात जोडून नि मस्तक लववून आम्ही श्रद्धांजलि अर्पण करतों.



# अग्नये स्वाहा!

राजघाटावरील चंदनकाष्ठांच्या त्या राशींतून प्रथम मूर्तिमंत यमाच्या क्रुद्ध नि लालभडक नेत्रांप्रमाणें धगधगणारी एक ठिणगी वर उसळली, मग तिचें रूपांतर यमाच्या कराल जिभेप्रमाणें अधाशीपणें लवलवणाऱ्या एका ज्वालेंत झालें. त्या एका ज्वालेंतून शेकडों ज्वाला यमदूतांच्या सेनेप्रमाणें अवतरल्या आणि एकमेकींना पेटत्या मिठ्या मारून अक्राळ-विक्राळ नृत्य करूं लागल्या. मग धुराच्या लोटाची काळीकुट्ट संहारध्वजा आकाशापर्यंत फडकवीत साक्षात् यमराज आपल्या विराट देहाच्या कणाकणांतून अंगार ढाळीत तेथें प्रकटला. चितेवरल्या पार्थिव देहाला त्यानें गाढ आलिंगन देऊन स्वतःमध्यें हळूहळू सामावून घेतलें.



तें भयानक दृश्य पाहतांच राजघाटाभोंवतीं जमलेल्या दहा लाखांच्या जनसमुदायानें एकच करुण हंबरडा फोडला. त्या समुदायाच्या हुंदक्यांनीं दहा दिशा गद्गदून गेल्या.


दगडासारखें घट्ट काळीज करून आल्या प्रसंगाला तोंड देण्यास सरावलेले राजधुरंधर मुत्सद्दी लहान बालकाप्रमाणें हमसाहमशीं स्फुंदूं लागले. 'आत्मा अमर असून, तो केवळ जुनें वस्त्र पालटून नवें वस्त्र धारण करावें त्याप्रमाणें जुना देह त्यागून नव्या देहांत प्रवेश करतो' हें भगवद्गीतेमधलें स्थितप्रज्ञाचें तत्त्वज्ञान आत्मसात् केलेले राष्ट्रपति राधाकृष्णन् यांनाहि शोकावेग आवरेना.

मृत्यूला सामोरे जाणें हेंच ज्यांचें नेहमींचें कर्तव्य, गेल्या महायुद्धांत आफ्रिकेच्या वाळवंटामध्यें, युरोपच्या बर्फामध्यें नि ब्रह्मदेशाच्या अरण्यामध्यें रोज हजारों मृत्यूंचें दर्शन घेतांनाहि ज्यांचीं चित्तें विचलित झालीं नव्हतीं, पाकिस्तानी आक्रमकांचा मुकाबला करतांना काश्मीरच्या खोऱ्यांत नि चिनी आक्रमकांशीं झुजतांना हिमालयाच्या पर्वतराजींत आपले सहकारी डाव्या उजव्या बाजूला निष्प्राण अवस्थेंत धडाधड कोसळतांना पाहूनहि ज्यांचे नेत्र कोरडे राहिले होते, असे भारताचे सेनापति नि सैनिकहि डोळयांतल्या अश्रूंना मोकळी वाट करून देत होते.

अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स, युगोस्लाविया, संयुक्त अरब प्रजासत्ताक, सिलोन इत्यादि देशोदेशींच्या राज्यसत्तांचे श्रेष्ठ नि ज्येष्ठ प्रतिनिधि आपापल्या देशांतून घाईघाईनें विमानोड्डाण करून भारतांत आले होते आणि त्या चितेसमोर मूकपणानें नि झुकलेल्या मस्तकानें उभे राहून ढळाढळा अश्रु गाळीत होते. सारें जग त्या क्षणीं राजघाटावर जणुं एकत्र येऊन रडत होते. शोकाच्या महापुराप्रमाणें तेथें लोटलेल्या दहा लाख सामान्य जनांच्या व्याकुळतेला तर पारावार नव्हता.


साऱ्या धर्मांचे, साऱ्या जातींचे, साऱ्या वयांचे, साऱ्या

वर्णांचे नि साऱ्या वर्गांचे लोक पोरक्या झालेल्या अर्भकाप्रमाणें तेथें जमून आक्रंदत होते. कुणी धाय मोकलून आक्रोशीत होता, कुणीं खचून जाऊन बसकण मारली होती, कुणी भुईवर तडातड मस्तक आपटून घेत होता, तर कुणी असह्य दुःखावेगानें बेशुद्ध झाला होता. त्या समुदायाच्या वीस लाख नेत्रांतून वाहणारी विराट धवल अश्रुगंगा जवळूनच वाहणाऱ्या यमुनेच्या काळ्याभोर प्रवाहांत मिसळत होती. त्या एकेका अश्रूंतून जणुं या खंडप्राय भारत देशामधली पंचेचाळीस कोटि जनता आकांत करीत होती, "नेहरू— नेहरू! नेहरू—! जवाहर! जवाहर!"



त्या प्रचंड समुदायाच्या करुण नजरा समोरच्या चितेमधून भडकणाऱ्या ज्वालांवरून ढळत नव्हत्या. जणुं काय कांहीं दैवी चमत्कार घडेल, स्वर्गांतून गरूड अकस्मात् भरारी मारून अमृतकुंभ घेऊन राजघाटावर अवतरेल, त्या अमृताच्या सिंचनानें ती चिता विझेल आणि—मस्तकावर शुभ्र तिरकस टोपी डौलानें परिधान केलेली, शुभ्र शेरवानीवर लावलेल्या उमलत्या गुलाबाशीं स्पर्धा करणारें हास्य मुद्रेवर खेळवणारी, नेत्रांतून चैतन्याचें तेज सांडणारी नेहरूंची चिरतरुण सडपातळ गौरवर्ण मूर्ति त्या चितेवरून अवखळपणें झरझरा उतरून आपल्यामध्यें परत येईल, अशी वेडी आशा त्या समुदायाला वाटत होती. पण तशा चमत्कारांचें पौराणिक युग कधींच सरलें आहे. चिता धडधडतच राहिली आणि तिच्या स्पर्शासरशी नेहरूंचा देह भस्मीभूत होत राहिला. केवळ एका व्यक्तीचा नव्हे, तर एका युगाचा अंत त्या चितेवर होत होता.

तें युग कीं, जेव्हां परकीय साम्राज्यसत्तेचे क्रूर पाश तोडण्यासाठीं सारा भारत प्राणपणानें झुंजत होता. स्त्रिया आणि पुरुष, बालकें आणि वृद्ध, स्वातंत्र्याच्या त्या होमकुंडांत आनंदानें सर्वस्वाची आहुति देत होती. पाशवी साम्राज्यसत्तेच्या आग-ओकत्या बंदुका नि क्रूर घाव घालणाऱ्या लाठ्या कोट्यवधि निःशस्त्र गुलामांच्या निर्भय प्रतिकारापुढें हतबल ठरत होत्या. साम्राज्यसत्तेच्या अमंगल तुरुंगांना स्वातंत्र्याच्या देव्हाऱ्याची मंगल कळा लाभली होती. त्या



ज्वलंत युगाच्या अग्रभागीं नेहरू सत्तावीस वर्षं एखाद्या समशेरीप्रमाणें तळपत होते.

राजतुल्य संपत्तिवैभव सहजपणें लाथाडून, विलायतेंतील उच्च शिक्षणामुळें, बॅरिस्टरच्या पदवीमुळें नि वडिलोपार्जित प्रतिष्ठेमुळें इंग्रजांच्या दरबारांत मानमान्यता नि उच्चाधिकार मिळवण्याची चालत आलेली संधि अव्हेरून, वैयक्तिक स्वास्थ्याचा नि संसारसुखाचा त्याग करून नेहरूंनीं स्वातंत्र्याच्या खडतर संग्रामांत सर्वस्व पणाला लावून उडी घेतली होती. त्यांच्या त्या त्यागानें नि शौर्यानें सारा देश भारून गेला होता. स्वतः अत्यंत श्रीमंत कुळांत जन्माला येऊनहि देशामधल्या कोट्यवधि गोरगरिबांचा उद्धार करणाऱ्या समाजवादाचा महामंत्र राष्ट्रीय नेतृत्वाच्या व्यासपीठावरून नेहरूंनीं देशाला दिला होता.


तुरुंगांतहि, जगाच्या इतिहासाचें विश्लेषण करणारे महान् ग्रंथ लिहून सुशिक्षित समाजाला राष्ट्राच्या भवितव्याकडे पाहण्याची नवी दृष्टि नेहरूंनीं दिली होती. तुरुंगामध्येंच आपलें आत्मचरित्र लिहून स्वतःच्या विचारांचा नि अंतःकरणाचा जो आविष्कार त्यांनीं साऱ्या दुनियेसमोर केला होता तो एवढा भव्य होता कीं, लाखों भारतीय तरुणांच्या जीवनाला नवें देशप्रेमी वळण लावायला तें आत्मचरित्र कारणीभूत झालें होतें. नेहरूंच्या आवेशयुक्त भाषणामधलें एक एक वाक्य उभ्या राष्ट्राची रणगर्जना बनलें होतें.

भारताचा स्वातंत्र्यसंग्राम जगामधल्या सगळ्या गुलाम राष्ट्रांच्या स्वातंत्र्यसंग्रामापासून अविभाज्य असल्याचें व्यापक सत्य त्यांनीं या देशाला शिकवलें होतें. स्पेनमधील फॅसिझमविरोधी युद्धाच्या रणक्षेत्राला नेहरूंनीं स्वतः जाऊन भेट दिली होती. जपानी साम्राज्यवाद्यांच्या आक्रमणाविरुद्ध झुंजणाऱ्या चीनविषयीं स्वतः गुलाम असलेल्या भारताला

वाटणारी सहानुभूति व्यक्त करण्यासाठीं चीनला भारतामधून वैद्यकीय पथक पाठवण्याची प्रेरणा नेहरूंनीं दिली होती. यामुळें उभ्या जगामधल्या स्वातंत्र्यप्रेमी जनतेच्या मुखीं नेहरूंचें नांव झालें होतें. केवळ भारतीय जनतेच्याच नव्हे, तर साऱ्या मानवजातीच्या स्वातंत्र्यासाठीं तळमळणाऱ्या त्या विभूतीचे अवशेष आतां राजघाटावरल्या त्या चितेमध्यें नष्ट होत होते.

लोकमान्य टिळक, गांधीजी, सरदार पटेल नि नेताजी सुभाषचंद्र बोस यांसारख्या युगधुरंधरांच्या मालिकेंतील अखेरचा महापुरुष त्या चितेवर चिरनिद्रा घेत होता. सतत सोळा वर्षे अत्यंत बिकट परिस्थितींत राष्ट्राच्या राज्यसत्तेची धुरा नेटानें पेलणारा स्वतंत्र भारताचा पहिला पंतप्रधान त्या चितेच्या अग्निशय्येवर अखेरची विश्रांति घेत पहुडला होता. भारतांत संसदीय लोकशाहीची खंबीर मुहूर्तमेढ रोंवणारा महान् मुत्सद्दी त्या चितेमध्यें अंतर्धान पावत होता. सर्वसंहारक जगड्व्याळ अणुयुद्धाच्या भीतीनें ग्रासलेल्या मानवजातीला पंचशीलाचा संजीवनीमंत्र देणारा जागतिक शांततेचा महर्षि त्या चितेवर पंचमहाभूतांत विलीन होत होता.

लाखों लोक साश्रु नयनांनीं, दुःखव्याकुळ मुद्रेनें आणि सुन्न मनानें भारताच्या त्या भाग्यविधात्याचें, आधुनिक जगाच्या त्या महानेत्याचें तें महानिर्वाण पाहात होते. उभ्या देशामधल्या कोट्यवधि जनतेच्या हृदयांना त्या चितेच्या ज्वाला पोळत होत्या. पंचखंडांमधले अब्जावधि मानव त्या चितेवरील त्या युगपुरुषाच्या स्मृतीला श्रद्धांजलि अर्पण करीत होते. स्वातंत्र्यासाठीं, शांततेसाठीं नि समतेसाठीं आमरण प्रखरतेनें जळत राहिलेल्या जीवनाची ज्योत निमाल्यावर तिचा देहरूपी अवशेष जो उरला होता, तो अशा रीतीनें अग्निनारायणाशीं एकरूप झाला. अग्नये स्वाहा! अग्नये स्वाहा! अग्नये स्वाहा!



# अश्रू आणि फुले

जिवंतपणीं सर्वत्र जयजयकार आणि मृत्यूनंतर चहूंकडे हाहाकार अशी विराट आणि विश्वव्यापी लोकप्रियता पंडित नेहरूंना जेवढी लाभली, तेवढी क्वचितच यापूर्वी जगांतल्या कोणत्याहि महापुरुषाला लाभली असेल. जागतिक लोकप्रियतेचे शतकानुशतकांचे उच्चांकच नेहरूंनीं मोडून टाकले असें म्हणावयाला हवें. नेहरूंच्या अनपेक्षित अवसानामुळें साऱ्या जगाला एवढा शोक झाला कीं, अश्रूंचे अक्षरशः महापूर वाहूं लागले नि फुलांचे डोंगरच्या डोंगर त्यांच्यावर येऊन पडले.

राष्ट्रपति राधाकृष्णन् आणि चक्रवर्ती राजगोपालाचारियर ह्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. नवे पंतप्रधान नंदा तर ओक्साबोक्शीं रडूं लागले. शेख अब्दुल्लाला तर आपले अश्रु आवरतां आवरेनात. मोठमोठ्या माणसांची ही दशा तर सामान्य माणसाची काय अवस्था झाली असेल हें काय सांगायला हवें? हजारों लोक धाय मोकलून आक्रोश करीत सुटले. हुंदके व हंबरडे ह्यांचा जिकडे तिकडे हलकल्लोळ

उडाला. एका व्यक्तीसाठीं साऱ्या विश्वानें एवढा आक्रोश करावा, असें अभूतपूर्व दृश्य प्रत्यक्ष परमेश्वराला देखील या पृथ्वीतलावर पाहावयाला मिळालें नसेल.

नेहरू हे केवळ राष्ट्रपुरुष नसून विश्वपुरुष होते ही गोष्ट त्यांच्या मृत्यूनंतर कां होईना पण आतां सूर्यप्रकाशासारखी स्पष्ट झालेली आहे. नेहरूंच्यावर शोकाश्रूंची एवढी वृष्टि झाली, तेवढाच प्रेमाच्या आणि आदराच्या फुलांचाहि अपरंपार वर्षाव झाला. किंबहुना, आमच्यापैकीं कोणाचा वर्षाव अधिक होतो आहे, याची अश्रु आणि फुलें यांच्यामध्यें जणुं कांहीं चढाओढच लागून राहिली होती. या अश्रूंचे आणि फुलांचे गुच्छ किंवा हार गुंफावयाला हजारों मालाकारांचे हात अपुरे पडतील. तरी देखील अश्रूंच्या आणि फुलांच्या ह्या महासागरांतून कांहीं ओंजळींचे उपहार आम्ही आमच्या वाचकांच्या हातीं देतों.

मानवतेचा एक महान् पुजारी आणि भारताचा एक अद्वितीय नेता आज नाहींसा झाला आहे ! आपल्या स्वातंत्र्याचा लढवय्या आणि राष्ट्राचा भाग्यविधाता गेला म्हणून केवळ भारतीय जनतेला दुःख होईल असें नव्हे, तर ज्यानें आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत शांतता आणि प्रगति ह्या मानवतेच्या अत्युच्च ध्येयासाठीं आपलें सर्वस्व वेंचलें, त्या महापुरुषासाठीं जगांतील सारी पुरोगामी जनता शोक केल्यावांचून राहाणार नाहीं. महात्मा गांधी आणि नेहरू यांनीं भारताबद्दल आणि भारतीय जनतेबद्दल जीं जीं म्हणून कांहीं स्वप्नें रचलीं होतीं, तीं तीं साकार होईपर्यंत त्या दोघांचे आत्मे भारताला स्फूर्ति देत राहतील. ज्यांचें महत्त्व सध्यांच्या शतकाच्या मर्यादाहि ओलांडील अशी विसाव्या शतकांतली एक अलौकिक विभूति आणि एक महान् मुत्सद्दी मानवजातीनें गमावलेला आहे.

नेहरूंच्या मृत्यूनें जगांतील तटस्थ देशांचें, आणि विकासोन्मुख राष्ट्रांचें फारच नुकसान झालें आहे.

विश्वनाशापासून मानवतेला वांचवण्याचा ज्यानें पराकाष्ठेचा प्रयत्न केला, असा शांततेचा एक झुंझार सैनिक आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा निष्णात तज्ज्ञ आज नाहींसा झाला आहे. आणि तो अशा वेळीं कीं, जेव्हां राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय गुंतागुंतीच्या समस्या सोडविण्याला ज्यांचें अतिशय साहाय्य झालें असतें! नेहरू म्हणजे पूर्व आणि पश्चिम यांचा एक अद्भुतरम्य समन्वय होता. ब्रिटिश साम्राज्यवादी रुडयार्ड किपलिंग ह्याचे 'पश्चिम ती पश्चिम, पूर्व ती पूर्व, दोघींची कालत्रयीं गांठ पडणार नाहीं,' हे उद्गार नेहरूंनीं खोटे पाडले आहेत. साऱ्या जगाबद्दल त्यांना आपलेपणा वाटे, पण स्वतःच्या घरासारखें असें त्यांना कुठेंच वाटत नसे. नेहरू म्हणजे कधींहि उकललें न जाणारें एक जितकें आकर्षक तितकेंच परस्परविरोधी कोडें होतें. त्यांच्या मृत्यूनें हिमालय पर्वत ढांसळला आहे, असें म्हटलें तर ती अलंकारिक अतिशयोक्ति होऊं नये.

भारतीय जनतेनें एक अत्यंत मौल्यवान् खजिना गमावलेला आहे. भारताच्या इतिहासांत जनतेनें एकाच व्यक्तीवर प्रेमाचा एवढा वर्षाव केल्याचा दाखला सांपडणार नाहीं. आशिया-आफ्रिका खंडांतील लोकांना आणि जगांतील पददलित मानवांना प्रकाश आणि आशा देणारे नेहरू हे एक दीपस्तंभ होते. भारताच्या निधर्मी राज्यशासनाचा नेहरू हे एकमेव आधारस्तंभ होते. ब्रिटिशांनीं ज्यांना चौदा वर्षें तुरुंगांत ठेवलें त्यांच्याबद्दल लवमात्र कडवट भावना त्यांच्या मनांत उरली नव्हती. यापेक्षां त्यांच्या उदार अंतःकरणाची आणखी काय साक्ष देतां येईल?

भारताला त्यांनीं मिळवून दिलेलें स्वातंत्र्य ही मानवतेला

त्यांनीं दिलेली एक महान् देणगीच होय! नेहरूंचें माहात्म्य ज्यांनीं ओळखलें त्यांनाच त्यांच्या मृत्यूबद्दल शोक करण्याचा अधिकार आहे. परतंत्र भारताला स्वतंत्र करण्यासाठीं आणि स्वतंत्र भारतांत लोकशाही समाजवादाचें मंदिर बांधण्यासाठीं त्यांनीं आपली उभी हयात खर्च केली. पं. नेहरू म्हणजे मूर्तिमंत भारतवर्षच होय! आपल्यामागून आपला वारस कोण आहे, हें त्यांनीं कधींहि सांगितलें नाहीं. ह्याचें कारण प्रातिनिधिक सरकारनें आपला नेता लोकशाही मार्गानें निवडावा, या गोष्टीवर त्यांची श्रद्धा होती. स्वतःचा वारस न निवडण्यांतच लोकशाही परंपरेचा एक नवीन वारसा त्यांनीं निर्माण करून ठेवला.

केवळ आशिया खंडांतीलच नव्हे, तर जगांतील स्वातंत्र्याचा आणि शांततेचा नेहरू हे एक अभेद्य बुरुज होते. नेहरूंचें नांव केवळ इतिहासाच्या पानांतच राहणार नसून तें मानवतेच्या अंतःकरणांत जिवंत राहील. इतकें समृद्ध आणि संपूर्ण जीवन फारच थोडे पुरुष ह्या जगांत जगले असतील. आपल्या देशाला त्यांनीं केवळ राष्ट्रीयतेच्या पातळीवर चढवलें नाहीं, तर विशालतेच्या आणि उत्तुंगतेच्या शिखरावर नेऊन पोहोंचवलें. आधुनिक भारत हें नेहरूंच्या जीवनकार्याचें एक जिवंत स्मारक आहे. मानवतेच्या महावनांतील एक उत्तुंग वृक्ष उन्मळून पडावा तसें आज वाटत आहे. न्यायाचा, शांततेचा आणि मानवी प्रतिष्ठेचा जगांत त्यांच्यासारखा प्रभावी पुरस्कर्ता होणार नाहीं.

भारताच्या स्वातंत्र्यसंघर्षांत त्यांनीं जो क्रांतिकारक भाग घेतला, तो इतिहास कधींहि विसरणार नाहीं. महायुद्धाचें संकट जगांतून नष्ट व्हावें यासाठीं त्यांनीं आकाशपाताळ एक केलें—आणि महात्मा गांधीजींप्रमाणेंच शांततेचा संदेश जगाला दिला. ' युद्धमुक्त जग ' हेंच त्यांचें सर्वांत चिरंतन स्मारक होय! हें त्यांचें ध्येय साकार करण्यासाठीं मानवतेनें आपली पराकाष्ठा करावी. सम्राट् अशोक आणि शहेनशहा

अकबर यांच्या ऐतिहासिक साच्यांमधूनच जणुं कांहीं त्यांची रचना ईश्वरानें केलेली होती. एखाद्या जहाजाचा कप्तान अकस्मात् नाहींसा व्हावा आणि त्या जहाजांतील लोक अनाथ आणि असहाय्य व्हावे अशी ह्या राष्ट्रांतील लोकांची आज स्थिति झालेली आहे.

देशाच्या साऱ्या बाजूंनीं आकाशांत काळेकभिन्न ढग जमत असतांना जनतेला धीर देऊन तिला एकत्रित करणारा नेहरू हा एकमेव आधारस्तंभ होता. भारतीय जनतेच्या जीवनांतला प्रकाश आतां मावळला असून सर्वत्र कधींहि न भरून येणारी एक देशव्यापी पोकळी निर्माण झालेली आहे. नेहरूंच्या निधनानें भारताच्या राष्ट्रीय इतिहासांतलें एक क्रांतिकारक पर्व समाप्त झालें असून, आतां यापुढें एका निराळ्याच पर्वाची सुरुवात होणार आहे. साम्राज्यवादाचे ते कट्टर दुष्मन होते. भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाला त्यांनीं आंतरराष्ट्रीय पातळीवर नेऊन बसवलें.

बुद्धि आणि भावना यांचा समतोल नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वामध्यें स्वभावतःच सांधलेला होता. त्याचेंच प्रतिबिंब स्वतंत्र भारताच्या राष्ट्रीय धोरणामध्यें आज उमटलेलें दिसतें आहे. भारतासारख्या प्राचीन देशाला आधुनिक विज्ञानाचा दृष्टिकोण त्यांनींच प्रथम दिला. बैलगाडीच्या मनोवृत्तीनें आपल्याला मोटरींतून प्रवास करतां येणार नाहीं, असें ते नेहमीं म्हणत. जगांतून युद्ध नाहींसें व्हावें, म्हणून त्यांनीं जन्मभर 'युद्ध' केलें. केवळ जीवनांतून युद्ध नाहींसें करून भागणार नाहीं, तर मनुष्याच्या मनांतून युद्धाला हद्दपार केलें पाहिजे, यावर त्यांचा कटाक्ष असे. आधुनिक काळांत लढाया ह्या केवळ रणक्षेत्रावरच लढल्या जात नसून त्या शेतांमध्यें,

कारखान्यांमध्यें, शाळेमध्यें आणि महाविद्यालयांमध्यें लढाव्या लागतात, असें ते म्हणत.

मानवतेच्या इतिहासांत जेव्हां जेव्हां धोका निर्माण झाला, तेव्हां तेव्हां शांतता आणि शहाणपणा यांचाच कैवार नेहरूंनीं घेतलेला आहे. जगाच्या इतिहासाला कलाटणी देणारीं जीं कांहीं मूठभर माणसें असतात, त्यांमध्येंच नेहरूंचा अंतर्भाव करतां येईल. प्राचीन काळीं जर ते जन्माला आले असते तर ते भारताचे 'सम्राट्' झाले असते. लोकशाहीच्या काळांत ते जन्माला आले म्हणून ते भारताचे 'पंतप्रधान' झाले. विद्यमान काळांतील स्वतंत्र राष्ट्रांमधल्या सर्व पंतप्रधानांचे नेहरू हे मुकुटमणि ठरतील ! वेगवेगळीं राष्ट्रें, वंश आणि राज्यपद्धति यांच्यामध्यें 'पूल' बांधून त्यांना एकत्र जोडण्याचा नेहरूंनीं प्रयत्न केला, म्हणून त्यांच्या नांवामध्यें एवढें आंतरराष्ट्रीय आकर्षण उत्पन्न झालें आणि त्यांच्या हयातीमध्येंच त्यांच्याभोंवतीं एखाद्या दंतकथेची अद्‌भुतरम्यता निर्माण झाली.

जगामधल्या कोणत्याहि देशांत त्यांच्याइतका लोकप्रिय पंतप्रधान मुळीं झालेलाच नाहीं. मुलांचे ते 'नेहरू चाचा' होते. स्त्रियांचे ते 'लाडके राजपुत्र' होते. बुद्धिवंतांमध्यें ते लेखक होते. कलावंतांमध्यें ते कलावंत होते. अनेक विज्ञान परिषदांमध्यें ते अध्यक्ष होते. इतिहासकारांमध्यें भारताचा 'पुन्हा शोध लावणारे' ते संशोधक होते. चिनी आक्रमणापासून संरक्षण करणारें नेहरू हेंच एक भारताजवळचें 'अण्वस्त्र' होतें. प्राचीन काळापासून अनेक सुधारणांचे आणि संस्कृतींचें स्वागत केलेलें असल्यानें हा देश आंतरराष्ट्रीय संस्कारांचें केंद्र बनलेला आहे, ह्या गोष्टीवर नेहरूंची आंतरिक श्रद्धा असल्यामुळें रवींद्रनाथ टागोरांप्रमाणेंच नेहरू हे वृत्तीनें आंतरराष्ट्रीयवादी झालेले होते.


नेहरू हे कांहीं नुसतेच राजकीय मुत्सद्दी नव्हते; तर ते प्रतिभाशाली इतिहासकार होते. राजकारण हा मानवी

उत्क्रांतीचाच एक भाग आहे, अशा व्यापक दृष्टीनें ते त्याच्याकडे पाहात होते. त्यामुळें त्यांचें राजकीय धोरण सामान्य मुत्सद्द्यांच्या राजकारणाप्रमाणें कधींहि तात्कालिक वाटलें नाहीं. माणसांचीं मनें राजकीय दास्यांतून, आर्थिक गुलामगिरींतून, सामाजिक जुलमांतून आणि सांस्कृतिक अगतिकेंतून मुक्त करण्याचा नेहरूंनीं भगीरथ प्रयत्न केला. विचारांची संस्कारक्षमता, भावनेची कोमलता, आणि बुद्धीचें औदार्य यांचा समन्वय नेहरूंमध्यें झालेला होता. स्वातंत्र्यावर आणि लोकशाहीवर त्यांची अढळ श्रद्धा होती. त्यामुळें देशाच्या प्रचलित सामाजिक आणि राजकीय विचारांत आणि आचारांत त्यांनीं नवचैतन्य ओतलें. केवळ भारताच्या स्वातंत्र्यासाठींच ते झगडले नाहींत, तर आफ्रिका, आशिया आणि दक्षिण अमेरिका या खंडांत जेथें जेथें स्वातंत्र्याच्या चळवळी झाल्या त्या सर्वांना त्यांनीं पाठिंबा दिला.

जनतेचें अपरंपार प्रेम हेंच नेहरूंच्या लोकप्रियतेचें सर्वांत मोठें भांडवल होतें. त्यामुळें त्यांच्यावर किंवा देशावर केव्हांहि मोठीं संकटें कोसळलीं तरी जनतेच्या हृदयसिंहासनावरील त्यांचें अद्वितीय स्थान अढळच राहिलें. रईस अमरोहि या उर्दू कवीनें म्हटलें आहे—

हम ने नेहरू की शक्ल-ओ-सुरत में
हिंद का एक मिसलिया देखा;
लब-ओ-आरिझ पें मौज-इ-गंग-ओ-जमन
तेवारों में हिमालय देखा

(नेहरूंच्या चेहऱ्यांत आम्हांला भारताची मूर्ति दिसली. त्यांच्या ओठांत नि गालांत आम्हांला गंगा-यमुनांच्या लाटा प्रतीत झाल्या. आणि त्यांच्या कपाळावर आम्हांला हिमालय भासमान झाला.)




पंडित जवाहरलाल नेहरूंचें राजकीय जीवन अथांग जनसागराच्या उसळत्या लाटांवर स्वार होऊन डौलानें सफर करणाऱ्या नौकेसारखें होतें. नेहरू म्हणजे अलोट गर्दी, नेहरू म्हणजे मिनिटागणिक टाळ्यांचा प्रचंड कडकडाट, नेहरू म्हणजे लाखों कंठांमधून निनादणारा गगनभेदी जयजयकार असें समीकरण झालें होतें.

१९१६ सालांत लोकमान्य टिळक आणि डॉ. ॲनी बेझंट यांच्या नेतृत्वाखालीं ज्या दोन वेगवेगळया 'होमरूल लीग'—इंग्रज सत्ताधाऱ्यांनीं भारताला अंतर्गत स्वायत्तता द्यावी अशी मागणी करणाऱ्या संघटना स्थापन झाल्या, त्या दोन्हींमध्यें जवाहरलालनीं कार्य सुरू केल्यापासून त्यांचें नांव भारताच्या राजकीय क्षितिजावर प्रथम तळपूं लागलें. १५ एप्रिल १९१९ रोजीं जनरल डायरनें जालियनवाला बागेंत केलेल्या राक्षसी कत्तलीचा निषेध करणारीं जीं जळजळीत भाषणें जवाहरलालजींनीं ठिकठिकाणीं केलीं त्यांच्यामुळें

जनतेचें मन त्यांच्याकडे अधिक आकर्षित झालें. पण जवाहरलालजींना खरी राष्ट्रव्यापी लोकप्रियता लाभली ती १९२०–२१ सालांत गांधीजींच्या नेतृत्वाखालीं झालेल्या प्रचंड सत्याग्रहसंग्रामामध्यें.

जवाहरलाल नेहरू यांचे वडील पंडित मोतीलाल नेहरू हे अलाहाबाद हायकोर्टमधील एक अग्रेसर वकील नि अत्यंत धनाढ्य गृहस्थ म्हणून प्रसिद्ध होते. तेहि जरी राजकारणांत भाग घेत होते, तरी लोकमान्य टिळकांनीं 'आरामखुर्चीवरील राजकारण' म्हणून ज्याचा उपहास केला होता, त्या मवाळांच्या राजकारणाचेच एक अध्वर्यु म्हणून ते जालियनवाला बागेतील कत्तलीच्या काळापर्यंत तरी ओळखले जात होते. त्यांना इंग्रजांचें एवढें कौतुक होतें कीं, जवाहरलालनें अंतर्बाह्य प्रतिइंग्रज बनावें आणि या देशामधल्या 'गांवढळ' मुलांचा संपर्क त्याला लागूं नये म्हणून बालपणीं इंग्रज शिक्षिकांच्या हाताखालीं त्याला घरींच शिक्षण त्यांनीं देवविलें होतें.

त्यानंतर पुढील शालेय शिक्षणासाठीं इंग्रज अमीर-उमरावांच्या मुलांना शिकवणाऱ्या 'हॅरो' या इंग्लंडमधील शाळेंत त्याला त्यांनीं पाठवलें होतें. पुढें कॉलेजचें शिक्षणहि इंग्लंडमधील 'केंब्रिज'च्या जगद्विख्यात विद्यालयांत घेऊन आणि लंडन येथें बॅरिस्टरची परीक्षा उत्तीर्ण होऊन जवाहरलाल भारतांत परतले होते. त्या काळांत भारतीय बॅरिस्टर हाताच्या बोटांवर मोजण्याएवढे होते. अशा वातावरणांत वाढलेला कुणीहि सामान्य वृत्तीचा तरुण वडिलोपार्जित गजान्त लक्ष्मीचा उपभोग घेत, बॅरिस्टरच्या पेशामध्यें खोऱ्यानें आणखी पैसा ओढीत, इंग्रज सरकारच्या राजदरबारीं मानमान्यता नि किताब मिळवण्यावर धन्यता मानीत नि

विलासामध्यें लोळत राहिला असता. पण तरुण जवाहरलालनें या साऱ्या सुखांचा देशासाठीं सहजगत्या त्याग केला, तेव्हां या देशामधली स्वातंत्र्यप्रेमी नि भाविक जनता हेलावून गेली.

ज्या नेहरू कुटुंबाचे कपडे रोज पॅरिसमधून धुऊन येत असल्याची दंतकथा होती, ऐटबाज घोडागाडीशिवाय घरांतून बाहेर पडणें ज्या कुटुंबाला माहीत नव्हतें, (मोटरगाड्यांचा जमाना भारतामध्यें त्या वेळीं सुरू झाला नव्हता), ज्या कुटुंबाच्या घरचा ऐषआरामी पाहुणचार अलाहाबादमधल्या नवाब-जहागीरदारांनींहि लाजावें असा होता, त्या कुटुंबामधल्या जवाहरलालनें खादीचे जाडेभरडे कपडे नेसून, उन्हातान्हामध्यें नि धुळींत, खेड्यापाड्यांमधून गरीब शेतकऱ्यांच्या सभा घेत वणवण हिंडावें, या कल्पनेनेंहि त्या जनतेचीं अंतःकरणें उचंबळून आलीं. सत्याग्रहसंग्रामांत उडी घेऊन जवाहरलालनीं तुरुंगवास पत्करला तेव्हां तर त्या जनतेच्या कौतुकादराला पारावार उरला नाहीं.

तेव्हांपासून ती जनता जवाहरलाल नेहरूंना देवासमान मानूं लागली. १९२८ सालांत केवळ ‘डोमिनियन स्टेटस’वर (ब्रिटिश साम्राज्याच्या चौकटींतील अंतर्गत स्वायत्ततेवर) संतुष्ट राहण्याचा गांधीजींचा सल्ला न मानतां, नेहरूंनीं सुभाषचंद्र बोस नि कम्युनिस्ट यांच्यासह अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या बैठकींत संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मांडण्यांत नि तो बहुमतानें संमत करून घेण्यांत पुढाकार घेतला, तेव्हां तर नेहरूंची लोकप्रियता गांधीजींनाहि मागें सारणार काय असें वाटूं लागलें. १९२९ मध्यें नेहरूंनीं कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून समाजवादाचा पुकारा केला तेव्हां गांधीवादाच्या अशास्त्रीय आर्थिक सिद्धांतामुळें गोंधळलेल्या देशामधल्या तरुण पिढीला नेहरू हे आपले अग्रणी वाटूं लागले.

गांधीजींची या देशामधल्या बहुजनसमाजावर अखेरपर्यंत जी मोहिनी होती, ती अद्भुत नि अद्वितीय होती यांत शंका

नाहीं. पण गांधीजींच्या मोठेपणाभोंवतीं या देशामधल्या अशिक्षित नि धर्मभोळ्या जनतेला गुंग करणाऱ्या गूढवादाचें वलय होतें. गांधीजी हेहि विलायतेंत उच्च शिक्षण घेतलेले बॅरिस्टर होते. पण त्यांच्या राजकारणाचा भर अभ्यासापेक्षां, विद्वत्तेपेक्षां नि बुद्धिवादापेक्षां श्रद्धेवरच अधिक होता. गांधीजी आफ्रिकेमधून परतल्यावर त्यांनीं नामदार गोखल्यांना भेट दिली, तेव्हां गोखल्यांच्या वाचनालयांतील प्रचंड ग्रंथसंग्रह पाहून, 'राजकारण करण्यासाठीं एवढ्या पुस्तकांची काय आवश्यकता?' असा प्रश्न त्यांनीं जो विचारला तो सुप्रसिद्धच आहे.

भारतीय सामान्य जनतेशीं एकरूप होण्यासाठीं म्हणून गांधीजी पंचा गुंडाळीत. पण त्यांचें राजकीय धोरण मात्र सामान्य जनांना, एवढेंच काय, पण अनेकदां मुरब्बी राजकीय मुत्सद्द्यांनाहि अगम्य अशा 'आंतल्या आवाजा'च्या आदेशावर अवलंबून होतें. गांधीजींच्या प्रार्थना, त्यांचा आश्रम नि त्यांचे तंत्रमंत्र राजकीय नेत्यापेक्षां एखाद्या मठाधिपति महन्तालाच अधिक साजेसे होते. यामुळें गांधीजींना 'महात्मा' ही जो पदवी प्राप्त झाली ती सामान्य जनतेला त्यांच्याविषयीं वाटणाऱ्या आदराचें नि प्रेमाचें प्रतीक जरी होती, तरी गांधीजींच्या धोरणांत कांहीं तरी अतर्क्य नि बुद्धिवादाच्या चौकटींत न बसणारें असल्याची भावनाहि त्या पदवीमागें होती.

पण पंडित जवाहरलाल नेहरू जरी गांधीजींच्या आयुष्यभर नि त्यांच्या मृत्यूनंतरहि त्यांचे शिष्य म्हणूनच वावरले, तरी एखाद्या राष्ट्रीय अथवा पक्षीय समारंभाच्या वेळीं प्रसंगप्राप्त विधि म्हणून तासभर चरखा फिरवण्यापलीकडे नि नेहमीं

खादी नेसण्यापलीकडे गांधीवादी मठसंप्रदायाच्या आहारीं ते कधीं गेले नाहींत. ते खादीचेच कपडे पण अशा रुबाबांत घालीत कीं, कांहीं विचारूं नका! प्रथम ते धोतर नेसत असत, पण धोतराचा घोळ त्यांच्या चपळ हालचालींना नि सुटसुटीतपणाच्या कल्पनांना मानवण्यासारखा नव्हता. म्हणून ते चुस्त पायजमा घालूं लागले. डोक्यावर ऐटींत तिरकस बसवलेली धारदार इस्त्रीची गांधी टोपी, अंगांत मोकळाचाकळा पण भोंगळ नव्हे असा झब्बा, त्यावर अंगालगत बसणारें जाकिट नि पायांत तंग सुरवार अशा थाटांत अनेक वर्षें ते वावरत असत.

गांधीजीमुळें खादीच्या पांढऱ्या टोपीला 'गांधीटोपी' (जी वापरण्याचें खुद्द गांधीजींनीं कांहीं वर्षांनंतर कायमचें सोडून दिलें) असें नांव पडलें, त्याचप्रमाणें जवाहरलाल वापरीत असलेल्या पद्धतीचें जाकिट 'नेहरू–जाकिट' म्हणून प्रसिद्ध झालें. पंतप्रधान झाल्यावर नेहरू सहसा शेरवानीच घालीत असत, तीहि अतिशय काळजीपूर्वक घेतलेली. देशामधल्या गोरगरिबांशीं एकरूप होण्यासाठीं कंबरेला पंचा गुंडाळून उघडेंबंबच राहिलें पाहिजे, अथवा गबाळा पोशाखच केला पाहिजे ही बुवाबाजी नेहरूंना मुळींच मान्य नव्हती. म्हणून लुंगी-पंचेवाल्या, अथवा बोंगेबाज अजागळ वेषांतल्या कॉंग्रेसवाल्या पुढाऱ्यांच्या मेळाव्यांत ऐटबाज पोशाख केलेली नेहरूंची मूर्ति लगेच उठून दिसे. याशिवाय नेहरूंना निसर्गानें अत्यंत देखणी चर्या, तेजस्वी गोरा वर्ण नि रुबाबदार बांधा बहाल केला होता. नेमस्त आहार नि नियमित व्यायाम घेऊन त्यांनीं शरीराचा सडपातळ बांधेसूदपणा अखेरपर्यंत कायम राखला होता.

त्यांच्याइतका रूपसुंदर पुरुष केवळ कॉंग्रेसच्याच काय, पण या देशाच्या राजकारणांत दुसरा कुणी नव्हता असें म्हणणें नेहरूंच्या वार्धक्यांत देखील अतिशयोक्तीचें ठरणार नाहीं. नेहरूंच्या या राजबिंड्या रूपामुळें त्यांच्याविषयीं

सामान्य जनतेला वाटणाऱ्या आकर्षणांत अधिकच भर पडली. नेहरूंच्या या असामान्य व्यक्तिमत्त्वाच्या जोडीला त्यांच्या राजकीय विचारांची नि आवेशपूर्ण वक्तृत्वाचीहि जबरदस्त छाप जनतेवर पडत असे. तसें पाहतां नेहरूंच्या वक्तृत्वांत लोकमान्य टिळकांच्या वाणींतील घनगंभीर गडगडाट नव्हता, गांधीजींच्या वाणींतील अस्खलितपणा नि आर्जवीपणा नव्हता, नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या वाणींतील काव्यात्मता नव्हती, अथवा सरदार पटेलांच्या वाणींतील धारदार उपहास नि उग्रपणा नव्हता. उलट नेहरू आवेशांत आले म्हणजे भाषण करतांना ते वाक्यागणिक पुनः पुन्हा चाचरत, अडखळत, एकेका शब्दाची पुनरुक्ति करीत. मुद्देसूद, ठांशीव नि सूत्रबद्ध विचार मांडण्याऐवजीं ऐन वेळीं मनांत येतील तशा कल्पनांचे ते पाल्हाळ लावीत.

पण तरीहि त्यांच्या भाषणामध्यें एक विलक्षण आवेश असे, तळमळ असे, उचंबळणाऱ्या भावनांचा ओज असे, विचारांच्या प्रचंड गर्दीचा ओघ असे. आपलें मन जणुं काय श्रोत्यांपुढें उघडें करून दाखवणारें संभाषण करावें तशा रीतीनें ते भाषण करीत असत. ते बोलतांना जे अडखळत ते त्यांच्या डोक्यामध्यें उसळणाऱ्या विविध नि सर्वव्यापी विचारांची गति भाषेच्या गतीपेक्षां जास्त असे म्हणून होय. विचारांच्या कमतरतेमुळें अथवा योग्य शब्दांच्या उणिवेमुळें नव्हे. तसें पाहतां त्यांचें भाषेवर विलक्षण प्रभुत्व होतें. विद्यार्थीदशेंतील संस्कारामुळें ते इंग्रजी भाषेंत अधिक अस्खलितपणें बोलूं नि लिहूं शकत असत, तरी हिंदी भाषाहि त्यांनीं आत्मसात् केलेली होती. विद्यार्थीदशेंत अरबी, फारसी नि उर्दू भाषांचा अभ्यास केल्यामुळें त्यांच्या हिंदी

भाषणामध्येंहि अनेक उर्दू शब्द येत. पण मौलाना आझादांप्रमाणें लोकांना दुर्बोध वाटण्याइतकें फारसी शब्दांचें प्राचुर्य त्यांच्या भाषणांत नसे. त्यांची वाक्यें अत्यंत सुटसुटीत असत. प्रत्येक वाक्यांत विचारांना यथायोग्य शब्दांचा साज चढवलेला असे.

याशिवाय त्यांच्या वक्तृत्वाचें एक वैशिष्ट्य असें कीं, ते केवळ जिभेनें नव्हे तर जणुं काय सबंध मुद्रेनें नि सबंध शरिरानें बोलत. त्यांच्या भाषणांतील भावनांबरोबर त्यांची संवेदनाशील चर्या क्षणाक्षणाला पालटत असे. क्षणांत ती चर्या गंभीर होई, क्षणांत हसरी, क्षणांत त्यांच्या कपाळावर आंठ्या पडत, तर क्षणांत त्यांच्या सबंध मुद्रेवर अत्यंत मृदु भाव पसरत. त्यांचे डोळे क्षणांत मिटत तर क्षणांत विस्फारून विलक्षण तेजानें चमकूं लागत. भाषण करतां करतां कधीं ते निर्धारान ताठ होत, तर कधीं आतुरतेनें पुढें झुकत. कधीं विचारांसरशीं नि कल्पनेसरशीं तळवे पसरलेले त्यांचे हात नाचूं लागत, तर कधीं त्या हातांच्या आवेशानें मुठी वळत. अशा रीतीनें त्यांच्या वक्तृत्वामध्यें गाढ विचारांचा नि उत्कट भावनांचा जो मूर्तिमंत साक्षात्कार होत असे, त्यामुळें विद्वानांपासून अडाण्यापर्यंत सगळ्या प्रकारचे लाखों श्रोते तासन् तास मंत्रमुग्ध होत.

या भाषणांमधून ते जे विचार मांडीत त्यांच्यामध्यें गांधीजींप्रमाणें अध्यात्मवादी गूढगुंजनाचा लवलेश नसे. आधुनिक राजकारणाच्या भाषेंत ते बोलत असत. पण ते बोलतांनाहि रोजच्या क्षुद्र कटकटीपलीकडच्या नि सबंध जगाला व्यापणाऱ्या उदात्त विचारांचा भव्य साक्षात्कार श्रोत्यांना घडवीत असत. या सगळ्या कारणांमुळेंच गांधीजीं-नंतर कोठल्याहि नेत्याच्या भाषणाला जमत नसे एवढी अफाट गर्दी नेहरूंच्या प्रत्येक भाषणाला उसळत असे. कित्येक लोक तर एक थोर राष्ट्रीय विभूति म्हणून नेहरूंच्या केवळ दर्शनासाठीं प्रचंड संख्येनें धांवत येत असत. नेहरूंना

स्वतःच्या या अमाप लोकप्रियतेची केवळ जाणीवच होती असें नव्हे तर त्यांना तिचा हव्यास होता असें म्हणणें चूक ठरणार नाहीं.

बालपणीं कौटुंबिक वातावरणामुळें, विद्यार्थीदशेंत परदेशामधील वास्तव्यामुळें, नंतर राजकारणांतील धकाधकीमुळें नि आयुष्यांतील एका शोकांतिक घटनेमुळें नेहरूंचें व्यक्तिगत जीवन अत्यंत एकाकी होतें. त्यांना सहकारी अनेक होते, पण त्यांच्या विचारांशीं नि भावनांशीं पूर्णपणें समरस होणारा खरा जिव्हाळ्याचा मित्र त्यांना अखेरपर्यंत नव्हता. या एकाकीपणाची भरपाईच जणुं ते प्रचंड जनसमुदायामध्यें सतत मिसळून करीत असत. ते कॉंग्रेसच्या नेतृत्वांत प्रथम पुढें येऊं लागले, तेव्हां एका कॉंग्रेसवाल्या पुढाऱ्यानें त्यांना म्हटलें, 'जवाहर, तूं एवढ्या एकलकोंड्या प्रवृत्तीचा आहेस कीं, ज्याच्याशीं अंतःकरण मोकळें करावें असा एकहि मित्र तुला नसेल अशी माझी खात्री आहे.' यावर नेहरूंनीं क्षणभर स्तब्ध राहून उत्तर दिलें, 'माझें अंतःकरण मी जनतेपुढें मोकळें करतों.'


नेहरूंना जनसमुदायाबद्दल वाटणाऱ्या विलक्षण आकर्षणाचें रहस्य त्यांच्या वरील उत्तरांत आहे. जनतेचेंहि नेहरूंवर विलक्षण प्रेम होतें. यामुळें संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या काळांतील मुंबईमधले एकदोन अपवाद वगळतां नेहरूंना जनसमुदायाची उणीव कधींच भासली नाहीं. १९५०मध्यें नाशिक येथें भरलेल्या कॉंग्रेसच्या अखिल अधिवेशनामध्यें सरदार पटेल आदि नेत्यांनीं नेहरूंच्या इच्छेविरुद्ध कॉंग्रेसमधील कट्टर उजव्या गटाचे एक सूत्रधार पुरुषोत्तमदास टंडन यांना कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावर निवडून आणलें. त्या वेळीं


आपल्या विरोधकांना जरब बसवण्यासाठीं नेहरूंनीं स्वतःच्या लोकप्रियतेचा पद्धतशीर वापर केला होता. तो असा कीं, त्या अधिवेशनासाठीं नेहरू सगळ्यांत आधीं येत नि तेथून सगळ्यांत आधीं जात. अधिवेशनाच्या भोंवतीं जमलेला हजारोंचा जनसमूह नेहरू दिसेनासे होतांच पांगून जाई नि इतर पुढाऱ्यांचा जयजयकार करायला कुणी उरत नसे.

नेहरूंबद्दल जनतेला अशी अपार भक्ति होती, म्हणूनच इतर कोणत्याहि पुढाऱ्याची जशी वर्तणूक त्या जनतेच्या जमावानें कधीं सहन केली नसती तशी वर्तणूक नेहरूंच्या हातीं मात्र तो जमाव सहन करी. एवढेंच नव्हे, तर तिच्याबद्दल नेहरूंचें तो कौतुक करी. एखाद्या जाहीर सभेंत गडबड-गोंधळ अथवा बेशिस्त दिसून आली तर नेहरू कमालीचे संतापून श्रोत्यांच्या अंगावर ओरडत, त्यांना दमदाटी करीत आणि कधीं कधीं तर जमावामध्यें घुसून धक्काबुक्कीहि करीत. असा प्रयत्न जर दुसऱ्या एखाद्या पुढाऱ्यानें केला असता, तर सभेंतल्या जमावानें परत व्यासपीठावर उभे राहण्याइतक्या धड अवस्थेंत त्याला ठेवलें असतें असें वाटत नाहीं. पण नेहरूंच्या दोषांसहितसुद्धां त्यांच्यावर जनतेचें एवढें प्रेम होतें कीं, त्यांच्या या असहिष्णु उतावळेपणाची देखील लोक तारीफ करीत.


मागें नेहरू केरळच्या दौऱ्यावर असतांना, त्यांच्या स्वागतासाठीं उसळलेल्या अफाट जनसंमर्दाला स्वतःचें दर्शन व्हावें, म्हणून आपल्या सत्कारासाठीं उभारलेल्या एका कमानीच्या खांबावर ते लहान मुलाप्रमाणें सरसर चढले. इतर कुणा पुढाऱ्यानें तसें केलें असतें तर लोकांना आचरटपणा वाटून त्यांनीं त्या पुढाऱ्याची हुर्यो केली असती. पण नेहरूंच्या अवखळ, उत्साही नि उत्सवप्रिय व्यक्तिमत्त्वाला मात्र तें शोभून दिसलें. जवळजवळ चव्वेचाळीस वर्षें अशा उदंड नि अलौकिक लोकप्रियतेच्या शिखरावर आरूढ झालेले नेहरू आतां या जगांतून गेले. सभेच्या व्यासपीठावर धांवत धांवत

चढणारी, व्यासपीठावर बसल्यानंतरहि सतत अस्वस्थ हालचाली करणारी, क्षणांत हंसणारी नि क्षणांत रागावणारी, क्षणांत उदास नि क्षणांत आनंदी दिसणारी त्यांची उत्साहमूर्ति यापुढें दिसणार नाहीं. त्यांच्या त्या विराट सभा यापुढें दिसणार नाहींत, त्यांचें तें भावनोत्कट नि आवेशयुक्त वक्तृत्व पुन्हा ऐकायला मिळणार नाहीं. तशा अचाट नि अखंड लोकप्रियतेचा नेता आज तरी भारतांत दुसरा कुणी नाहीं. 'कालाय तस्मै नमः' याहून अधिक काय म्हणणार?





महात्मा गांधींच्या प्रयाणप्रसंगीं पंडित नेहरूंनीं जे हृदयविदारक उद्गार काढले होते, तेच नेमके त्यांच्या निर्वाणालाहि लागू पडतात. "आमच्या जीवनांतला आज प्रकाश गेला आहे. सर्वत्र काळोख पसरला आहे. काय सांगावें आणि कसें बोलावें तें कळत नाहीं. आमचा लाडका नेता आम्हांला सोडून गेला आहे. इतकीं वर्षें आम्ही त्याला डोळे भरून पाहत होतों, पण यापुढें आम्हांला तो कधींहि दिसणार नाहीं. कोणत्याहि बाबतींत आम्हांला सल्ला पाहिजे असला किंवा संकटाच्या प्रसंगीं आम्हांला धीर हवा असला, तर आम्ही त्यांच्याकडे धांवत जात होतों! यापुढें आम्हांला धीर कोण देणार? आम्हांला सल्ला कोण देणार? ह्या विचारानें या देशांतील कोट्यवधि लोकांच्या अंतःकरणावर दुःखाचा प्रचंड आघात होईल.



"हा प्रकाश खरोखरच गेला काय? नाहीं, तसें म्हणणें चूक आहे. या देशावर लकाकणारा हा प्रकाश कांहीं सामान्य

प्रकाश नव्हता. तो स्वर्गीय प्रकाश होता ! तो यापुढेंहि शेंकडों वर्षें—नव्हे हजारों वर्षें या देशावर प्रकाशतच राहील. केवळ या देशालाच नव्हे, तर साऱ्या जगाला तो चैतन्य देत राहील. असंख्य अंतःकरणांना आधार देईल ! हा प्रकाश केवळ वर्तमान काळापुरता नव्हता, तर अमर आणि अनंत सत्याचा तो तेजोवलय होता. त्यानेंच ह्या प्राचीन देशाला स्वातंत्र्याचा मार्ग दाखविला."

विसाव्या शतकांत ह्या जगांत अनेक महापुरुष जन्माला आले. पण त्यांपैकीं फारच थोड्या महापुरुषांच्या वांट्याला नेहरूंची उत्तुंग लोकप्रियता आली. जनतेला गांधींबद्दल जास्त श्रद्धा आणि आदर वाटला असेल; स्टॅलीनच्या हातांत अधिक अमर्याद सत्ता केंद्रित झाली असेल; पण त्यांच्यापेक्षांहि नेहरूंच्या लोकप्रियतेचें स्वरूप निराळें होतें. साऱ्या आशिया खंडाच्या राजकीय जागृतीचें नेहरू हे प्रचंड प्रतीक होऊन बसले होते. आधुनिक जगांतील वैचारिक संघर्षांचे ते ऊर्जस्वल 'सुवर्णमध्य' होते. भारतीय स्वातंत्र्याच्या प्रश्नाला राष्ट्रीय पातळीवरून उचलून आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या कोंदणांत बसविण्याचा अद्‌भुत चमत्कार त्यांनींच केला.

जागतिक इतिहासाच्या रंगभूमीवर एखाद्या धीरोदात्त नायकाप्रमाणें गेलीं कित्येक वर्षें ते तळपत होते, ही गोष्ट त्यांच्या भक्तांप्रमाणें त्यांच्या शत्रूंनाहि कबूल करावी लागेल. कीर्तीच्या आणि लोकप्रियतेच्या अत्युच्च शिखरावर वर्षांनुवर्षें अढळपणें आरूढ होऊन बसलेला असा लोकोत्तर पुढारी आजपर्यंत जगांत क्वचितच होऊन गेला असेल ! त्यांच्या अंगांतले दोष जगजाहीर असूनहि साऱ्या जगाला वेगवेगळ्या

कारणानें का होईना, पण त्यांच्याबद्दल विलक्षण आकर्षण वाटत होतें यांत कांहीं शंका नाहीं.

कोणाला त्यांच्या स्वातंत्र्यप्रेमाचें आणि ध्येयनिष्ठेचें आकर्षण वाटे, तर कोणाला त्यांच्या निर्मळ ध्येयवादाचें आणि अद्भुतरम्य स्वप्नरंजकतेचें कौतुक वाटे. कोणाला त्यांच्या गारवर्ण, चिरतरुण आणि शोभिवंत आकृतीचें प्रेम वाटे, तर कोणी त्यांच्या उतावळ्या, संतापी पण निर्भय आणि धाडसी वृत्तीवरच आषक होत असे. कांहीं असलें तरी व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनांत त्यांच्याइतका अंतर्बाह्य शुद्ध, सुंदर आणि पारदर्शक पुरुष क्वचितच पुन्हा पाहावयाला मिळेल. महाकवि कालिदास ज्याप्रमाणें म्हणतो, "किमिव हि मधुराणां मण्डन नाकृतीनाम्" (जातीच्या सुंदराला कांहींहि शोभतें!) त्याप्रमाणें नेहरूंच्या दोषांनींहि त्यांच्या सद्गुणांची उलट शोभाच वाढलेली होती. किंबहुना दोष आणि सद्गुण यांचा अपूर्व मनोहर समन्वय नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वांत झाल्यामुळें नेहरू हे पूर्णचंद्राप्रमाणेंच अत्यंत आल्हादकारक वाटत होते.

नेहरूंच्या व्यापक आणि समृद्ध जीवनांत परस्परविरोधी वैशिष्ट्यांचे अनेक प्रवाह वाहात होते, हेंच त्यांच्या लोकप्रियतेचें मुळीं रोमहर्षक रहस्य होय! जन्मानें ते भारतीय होते, तर शिक्षणानें ते पाश्चात्य होते! प्राचीन भारताच्या संस्कारांनीं त्यांचें मन प्रभावित झालें असलें, तरी वृत्तीनें ते आधुनिक होते. आंतरराष्ट्रीय दृष्टिकोणाचे ते कट्टर राष्ट्रवादी देशभक्त होते. उदारमतवाद, मानवतावाद आणि समतावाद ह्यांचा त्यांच्यामध्यें 'समसमा संयोग कीं जाहला' असल्यामुळें नवभारताच्या आशाआकांक्षांचें ते एक श्रद्धास्थान होऊन बसले होते.

तसें म्हणाल, तर कोणत्याहि स्वतंत्र विचाराचे ते जनक असे नव्हते. गांधी, मार्क्स आणि फेबियन समाजवादी यांच्याकडून त्यांनीं पुष्कळसे विचार घेतले. पण त्या

विचारांतला तिखटपणा कमी करून त्यांचें शक्य तितकें सौम्य मिश्रण तयार करण्याचें चातुर्य त्यांनीं दाखविलें. तसें म्हणाल, तर ते कर्मयोगीहि पण नव्हते! पुष्कळदां तर कोणत्या वेळीं काय करावें, हेंच त्यांना कळत नसे. 'हें करूं का तें करूं?' अशा विचारांच्या भोंवऱ्यांत 'हॅम्लेट'प्रमाणें ते गिरक्या घेत राहात. कोणत्याहि महत्त्वाच्या विषयावर आत्मचिंतन करण्याची त्यांची प्रवृत्ति नव्हती. विराट जनसमुदायांत उभे राहून ते प्रगटपणें विचार करीत.

लोकमनावर त्यांचें एवढें वर्चस्व असून प्रत्यक्षपणें लोकांमध्यें ते क्वचितच वावरत. किंबहुना लोकसमुदायांत असतांनाहि आपण जणुं कांहीं एकाकी आहोंत, अशीच त्यांची भावना होती. काँग्रेसचे ते एकमेव पुढारी असूनहि, काँग्रेसच्या पक्षयंत्रणेवर त्यांना कधींहि प्रभावी नियंत्रण करतां आलें नाहीं. एखाद्या अद्‌भुतरम्य नाटकाचा कोणी तरुण राजपुत्र नायक असावा आणि काव्याच्या कलात्मक सृष्टींतून नाना तऱ्हेचे रोमहर्षक पराक्रम करीत, त्यानें जसा सबंध नाटकभर संचार करावा, तशा तऱ्हेचा मोहक आभास नेहरूंच्या जीवनाचें सिंहावलोकन करीत असतां झाल्यावांचून राहात नाहीं. म्हणूनच महात्मा गांधी त्यांना 'राजकारणांतला राजपुत्र' या विशेषणानें संबोधीत असत!

व्यवहाराच्या वास्तववादी जगांतून नेहरू क्वचितच चालले असतील किंवा फिरले असतील! कल्पनासृष्टींतील ध्येयवादाच्या ढगावरून एखाद्या गरुडाप्रमाणें ते भराऱ्या मारीत असत. आपल्या कोटाच्या गुंडीला अडकविलेल्या गुलाबाप्रमाणे साऱ्या जगांत गुलाबांच्या पाकळ्यांचे गालिचे अंथरतां येतील असें त्यांना वाटे. त्या गुलाबांच्या

पाकळ्यांचे कांटे त्यांना कधीं दिसले नाहींत किंवा टोंचले नाहींत. नोकरशाहीच्या हातांत नियंत्रणाचीं सूत्रें देऊन, समाजविकासाच्या योजना यशस्वी केल्या तर देशामध्यें क्रांति होईल आणि समाजवाद येईल; अथवा पाशवी वलावर आधारलेलें आधुनिक राज्ययंत्र हें गांधीजींच्या अहिंसावादी परंपरेशीं मुळींच विसंगत नाहीं, अशी आत्मवंचना कोणता व्यवहारवादी आणि वास्तववादी राज्यकर्ता करून घेईल बरें ?

काव्य आणि राजकारण यांतला फरक सामान्य माणसाला समजतो, पण नेहरूंना मात्र तो कधींच उमगला नाहीं. पण तसें नेहरूंना सांगायचें धैर्य मात्र कोणालाच झालें नाहीं. नेहरूंवर लोक जितकें प्रेम करीत असत, तितकेंच त्यांना ते भीतहि असत. एकाच व्यक्तीबद्दल प्रीति आणि भीति या दोन परस्परविरोधी भावना वाटाव्यात, अशी नेहरूंच्या स्वभावाची चमत्कारिक रचना होती. सर्वसामान्य राज्यकारभारांतील आणि सार्वजनिक जीवनांतील दोषांची आणि उणिवांची नेहरूंना जाणीव नव्हती असें नाहीं. अधिकाऱ्यांच्या वशिलेबाजीची आणि लांचलुचपतखोरीची त्यांनीं कडक शब्दांमध्यें काय कमी निर्भर्त्सना केली ?

'काळ्या बाजारवाल्यांना फांशीं दिलें पाहिजे' असें किती तरी वेळां नेहरू बोलले असतील! पण एकहि काळाबाजार-वाला त्यांच्या राज्यांत कधीं फांशीं गेला नाहीं! मोठमोठ्या शहरांतल्या गलिच्छ वस्त्या पाहून त्यांच्या संतापाचा पारा काय कमी वर चढत असे? अशा वस्त्या पाहिल्या कीं संतापानें त्यांच्या सर्वांगाचा भडका उडे! आणि ते एकदम ओरडत, 'मोडून टाका हीं घरें, जाळून टाका या वस्त्या!' पण नेहरूंचा राग, संताप किंवा चीड फार वेळ टिकत नसे. गलिच्छ वस्त्यांतून ते निघून गेले, म्हणजे मग पुन्हां क्वचितच त्यांना त्याची आठवण होई. याचें कारण समाजांतील दैन्य पाहून फार वेळ दुःख करीत बसण्याची त्यांची वृत्ति नसे. अप्रिय भावना आणि अप्रिय विचार ते विसरून जाण्याचा

प्रयत्न करीत. त्यांच्या स्वभावांतील ही अस्थिरता किंवा स्वप्नरंजकता गृहीत धरूनहि असें म्हणतां येईल कीं, भारतीय जीवनांतील आजच्या अनेक विधायक गोष्टींचे ते एकमेव शिल्पकार होते.

प्रस्तुत कालीं भारतांतील भिन्न भिन्न धर्मांचें आणि जातींचें ऐक्य समाधानकारक रीतीनें झालें असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. तरी देखील ज्या प्रमाणांत तें झालेलें आढळतें, त्याचें श्रेय गांधीजीनंतर नेहरूंनाच देणें योग्य ठरेल! भारताच्या तटस्थतावादी परराष्ट्रीय धोरणाचे तर पंडित नेहरू हेच एकमेव शिल्पकार होत! आज जगांतील सारीं राष्ट्रें अमेरिका किंवा रशिया या दोन गटांपैकीं कोणत्या ना कोणत्या तरी गटांत सामील झालेलीं आढळतील. पण प्रसंग पडेल त्याप्रमाणें या दोन्हीहि गटांचें साहाय्य घेऊन पुन्हां त्यांच्या मायाजालांत स्वतःला गुंतवून न घेण्याचें नेहरूंनीं जें प्रसंगावधान दाखविलें, तो आंतरराष्ट्रीय राजकारणांतला एक महान् चमत्कार गणला जाईल.

देशाच्या योजनाबद्ध अर्थव्यवस्थेचे तर ते एकमेव जनक होत. राष्ट्रविकासाच्या ज्या तीन पंचवार्षिक योजना नेहरूंनीं अंमलांत आणल्या, त्या संपूर्णतया यशस्वी झाल्या असें कोणालाहि म्हणतां येणार नाहीं. तथापि ह्या अशा तऱ्हेच्या विराट राष्ट्रयोजना अंमलांत आणण्यासाठीं जी दूरदृष्टि, ध्येयनिष्ठा आणि जो आशावाद लागतो, त्यांचा नेहरूंच्या ठिकाणीं कधींच तुटवडा पडला नाहीं. संकटांचे अनेक डोंगर आडवे आले तरी पर्वताचें शिखर गांठण्याची 'तेनसिंगा'-ची हिंमत आणि निर्धार नेहरूंनीं कधींच सोडला नाहीं. देशांतील सुशिक्षितांना नि तरुणांना नेहरूंचें एवढें आकर्षण

वाटत असतांनाहि, काँग्रेसचें मात्र त्यांना कधींहि आकर्षण वाटलें नाहीं, ही एक विचार करण्यासारखी गोष्ट आहे. नेहरूंचें व्यक्तिमत्त्व एवढें जबरदस्त असतांनाहि काँग्रेसमधल्या निरनिराळ्या गटांमधले अंतर्गत संघर्ष किंवा आपल्या मंत्रिमंडळांतील निरनिराळे वैचारिक मतभेद त्यांना कधींहि मिटवतां आले नाहींत. आपलीं राजकीय धोरणें आणि विचारपरंपरा आपल्यानंतर जो पुढें चालवूं शकेल असा तरुणांचा गट काँग्रेसमध्यें ते कधींहि तयार करूं शकले नाहींत.

याचें कारण असें असावें कीं, कोणत्याहि राजकीय आणि तात्त्विक विचारसरणीचा स्पष्ट ठसा त्यांच्या मनावर कधींच उमटला नाहीं. आयुष्याच्या प्रारंभीं ते उदारमतवादाचे आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. त्यानंतर गांधीजींच्या अहिंसावादाचा आणि साधनशुचितेचा संस्कार त्यांच्यावर झाला. पुढें मार्क्सच्या वर्गविहीन समाजरचनेनें त्यांचें मन आकर्षित केलें. तथापि पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या मानवतावादाचाच पगडा त्यांच्या मनावर अधिक प्रभावानें पडल्यामुळें कोणत्याहि एका विशिष्ट राजकीय विचारसरणीबद्दल आत्यंतिक निष्ठा अशी त्यांना कधींच वाटली नाहीं. या त्यांच्या विशिष्ट मनोरचनेमुळें जहाल क्रांतिवादापासून कटाक्षानें त्यांनीं स्वतःला बाजूला ठेवलें. त्यांच्या शब्दांत जेवढी क्रांति होती, तेवढी त्यांच्या कृतींत कधींच येऊं शकली नाहीं. क्रांतिकारक समाजवादी असें त्यांना म्हणण्यापेक्षां 'उदारमतवादी समाजसुधारक' असेंच त्यांना म्हणणें अधिक योग्य होईल.

कोणत्या गोष्टींमुळें नेहरूंचें नांव अमर राहील, असें जर कोणीं आम्हांला विचारलें, तर आम्ही असें म्हणूं कीं, जागतिक राजकारणाच्या संघर्षांत तटस्थतावादी धोरणाचा अंगीकार करून भारताला त्यांनीं सुवर्णमध्याच्या मार्गावर सतत ठेवलें. आंतरराष्ट्रीय शीतयुद्धापासून नेहरूंनीं भारताला अलग ठेवलें, हे नेहरूंचे उपकार अविस्मरणीय आहेत यांत शंका नाहीं. पण भारताची आर्थिक प्रगति झाल्यावांचून आणि

भारतामध्यें प्रादेशिक आणि जातीय ऐक्य निर्माण झाल्यावांचून लोकशाहीच्या मार्गावर भारताची प्रगति होणें अशक्य आहे. ह्या दृष्टीनें भारताच्या भवितव्याचा नेहरूंनीं विचार केला खरा. पण त्या कामीं फारसें यश त्यांच्या पदरांत पडलें नाहीं, हीच त्यांच्या राष्ट्रीय कर्तृत्वामधली एक महत्त्वाची उणीव आहे. याचें कारण नेहरूंना वास्तववादापेक्षां अद्‌भुतरम्यतेचें अधिक आकर्षण वाटे.

राजकारणांतले ते एक प्रतिभाशाली कवीच होते असें म्हटलें पाहिजे. रवींद्रनाथ टागोरांनीं 'ऋतुराज' या विशेषणानें नेहरूंचा गौरव केलेला आहे. वसंत ऋतु हा जसा सुगंधाचा, सौंदर्याचा आणि तारुण्याचा स्फूर्तिदाता असतो, त्याप्रमाणें कोट्यवधि लोकांना आनंद, आल्हाद आणि स्फूर्ति देणारे नेहरू हे भारताचे 'ऋतुराज'च होते, असेंच त्यांचें वर्णन करावें लागेल.



# नेहरू आणि गांधीजी

गांधीजी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांची जोडी भारतामधल्या राष्ट्रीय आंदोलनाच्या सबंध इतिहासांत केवळ अद्वितीय होती. १९२० पासून ते ३० जानेवारी १९४८ रोजीं गांधीजींचा खून होईपर्यंत भारतीय राजकारणाच्या अग्रभागीं ही जोडी अभेद्यपणें तळपत होती. दोन श्रेष्ठ राजकीय नेत्यांचें ऐक्य नि सहकार्य एवढ्या दीर्घकाळपर्यंत टिकल्याचें, एवढेंच नव्हे तर सतत वाढत गेल्याचें उदाहरण केवळ या देशाच्याच काय, पण सबंध जगाच्या राजकारणांत क्वचितच आढळेल.

वर वर पाहतां गांधीजी आणि जवाहरलाल यांची ही युति मोठी विलक्षण वाटते. गांधीजी वयानें आणि राजकारणांतहि जवाहरलालजींपेक्षां कितीतरी वडील होते. दक्षिण आफ्रिकेंतील वर्णद्वेषविरोधी सत्याग्रहाची पुण्याई पाठीशीं घेऊन गांधीजी १९१५ सालाच्या सुरुवातीला भारतामध्यें परतले आणि

बिहारमधील चंपारण्य येथील निळीच्या मळ्यांतील मजुरांचा सत्याग्रह, गुजरातच्या खेडा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचा सत्याग्रह, दडपशाहीच्या रौलट कायद्याविरुद्ध झालेलें आंदोलन, इत्यादि लढ्यांचें नेतृत्व करून राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या संग्रामांत एवढ्या झपाट्यानें ते पुढे सरसावले कीं, लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर काँग्रेसचीं सूत्रें आपोआपच गांधीजींच्या हातीं आलीं.

या साऱ्या काळांत जवाहरलाल राजकारणामधला आपला निश्चित मार्ग अद्याप हुडकीत होते. अखेर त्यांनीं गांधीजींचें नेतृत्व स्वीकारलें, एवढेंच नव्हे, तर तोंवर मवाळ राजकारणाचे एक अध्वर्यु असलेले आपले पिताजी पंडित मोतीलाल नेहरू यांनींहि गांधीजींच्या नेतृत्वाखालील सामुदायिक लढ्यांत उतरण्यास त्यांना प्रवृत्त केलें. पण असें असलें तरीहि पंडित मोतीलाल हे गांधीजींचे तोलामोलाचे सहकारी नि जवाहर हा गांधीजींचा एक तरुण अनुयायी अशीच स्थिति त्या काळांत होती. पण नंतर गांधीजींनीं स्वतः जवाहरलालना काँग्रेसच्या नेतृत्वांत महत्त्वाचें स्थान प्राप्त करून दिलें.

खरें पाहतां गांधीजींच्या नेतृत्वाच्या काळांत, जवाहरलालजींपेक्षां वयानें ज्येष्ठ, अत्यंत कर्तबगार, संघटनाकुशल नि तात्त्विक दृष्ट्या गांधीजींना अधिक जवळचे असे अनेक नेते काँग्रेसमध्यें दाखल झाले होते. चक्रवर्ति राजगोपालाचारी यांच्यासारखे कुशाग्र बुद्धीचे, चाणाक्ष, विद्वान् नि गांधीवादी तंत्रमंत्रामध्यें निष्णात असे आधुनिक 'चाणक्य' गांधीजींच्या सतत सान्निध्यांत होते, एवढेंच नव्हे तर ते गांधीजींचे प्रत्यक्ष व्याहीच होते. सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासारखे कणखर, संघटनाकुशल नि धूर्त 'पोलादी पुरुष' गांधीजींच्या निकटवर्ति

सहकाऱ्यांमध्यें होते. डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्यासारखे सेवावृत्तीचे, श्रद्धाळू नि निष्ठावंत नेते गांधीजींच्या खांद्याला खांदा लावून उभे होते. पण त्या सर्वांपेक्षां जवाहरलाल यांना गांधीजींनीं कॉंग्रेसच्या नेतृत्वांत अग्रस्थान दिलें. १९२९ मध्यें कॉंग्रेसचे बहुसंख्य वरिष्ठ नेते सरदार पटेलांना कॉंग्रेसचे अध्यक्ष करण्याच्या बाजूचे असतांना गांधीजींनीं आपलें सर्व वजन खर्चीं घालून जवाहरलालना कॉंग्रेसचे अध्यक्ष केलें, एवढेंच नव्हे तर 'माझा राजकीय वारस जवाहरलालच आहे' असेंहि त्यांनीं नंतर जाहीर केलें.

गांधीजींचें जवाहरलालजींवरील हें प्रेम नि जवाहरलालजींची गांधीजींवरील भक्ति वरकरणी अत्यंत आश्चर्यकारक वाटण्यासारखी होती. कारण गांधीजी आणि जवाहरलाल यांचें व्यक्तिमत्त्व, तसेंच त्यांचे वैचारिक नि राजकीय पिंड परस्परांपासून मूलतः अगदीं भिन्न, एवढेंच नव्हे तर कांहीं बाबतींत परस्परविरोधी होते. गांधीजी हेहि जवाहरलालजींप्रमाणें विलायतेंत राहून नि बॅरिस्टर होऊन आलेले होते. पण जवाहरलालना अगदीं बालपणापासून त्यांचे वडील पंडित मोतीलाल नेहरू यांनीं उमरावी थाटाचें आणि इंग्रजांचें अंतर्बाह्य अनुकरण करणारें वळण लावण्याचे प्रयत्न केले होते. याउलट गांधीजींचें घराणें जुन्या कर्मठ वळणाचें होतें. त्यामुळें गांधीजींच्या राजकारणांत अध्यात्माचें, गूढवादाचें नि धार्मिक तंत्रमंत्राचें प्रस्थ होतें, तर जवाहरलाल नेहरू तत्त्वतः ईश्वराचें अस्तित्व न मानणारे आणि राजकारणांत बुद्धिवादावर भर देणारे होते. गांधीजी अध्यात्मिक प्रचाराच्या मार्गानें समता स्थापूं पाहणाऱ्या सर्वोदयाचे प्रवर्तक होते, तर नेहरू भौतिक क्रांतीला प्राधान्य देणाऱ्या समाजवादाचे पुरस्कर्ते होते.

गांधीजी अहिंसेला एक श्रद्धास्थान मानीत असत, तर नेहरू केवळ एक व्यावहारिक आवश्यकता म्हणून अहिंसेचा प्रचार करीत असत. खादी हा गांधीजींच्या आर्थिक कार्यक्रमाचा गाभा होता, तर नेहरू स्वदेशीचें नि ग्रामोद्योगांचें

केवळ प्रतीक म्हणून खादीला मान देत असत आणि आधुनिक यंत्रसज्ज उद्योगधंद्यांच्या विकासाला अग्रक्रम देत असत. गांधीजींचा पंचा, त्यांचा आश्रमसंप्रदाय इत्यादींच्या आहारीं नेहरू कधींच गेले नाहींत. गांधीजींच्या राजकारणांतील 'आंतल्या आवाजा'चें अगम्य नि अशास्त्रीय अवडंबर नेहरूंच्या राजकारणांत नव्हतें. गांधीजींना राजकारणाच्या अभ्यासापेक्षां श्रद्धेचें महत्त्व जास्त वाटत असे. याउलट नेहरूंचा तत्त्वज्ञान, राजकारण, अर्थशास्त्र इत्यादि विषयांचा प्रचंड अभ्यास होता. गांधीजींना संगीत, नाट्य, नृत्य, चित्रकला इत्यादि कलांची नि ललित वाङ्मयाची गोडी मुळींच नव्हती. त्यांनीं सबंध आयुष्यांत 'रामराज्य' हा एकच चित्रपट पाहिला. याउलट नेहरू हे अत्यंत रसिक होते. गांधीजींच्या वेषांत केवळ उपयुक्तता नि स्वच्छता यांवरच ध्यान दिलेलें असे, तर नेहरूंच्या वेषांत नि विशेषतः त्यांच्या छातीवर सतत विराजणाऱ्या गुलाबांच्या फुलांत त्यांच्या सौंदर्यदृष्टीचें दर्शन होत असे.

अशा रीतीनें अत्यंत भिन्न वैयक्तिक नि वैचारिक प्रकृतीचे हे दोघे नेते देशाच्या राजकारणांत एकत्र राहिले, याचें श्रेय जवाहरलालजींच्या भावनाप्रधान नि हळव्या श्रद्धेला, तसेंच गांधीजींच्या मुत्सद्देगिरीला आहे. जवाहरलालजींना गांधीवादी तत्त्वज्ञान नि कार्यपद्धति पूर्णपणें कधींच पटली नव्हती. तरीहि गांधीजींना गुरुस्थानीं मानून नेहरूंनीं काँग्रेसमध्यें प्रवेश केल्यापासून, गांधीजींचा त्यांच्यावर एवढा व्यक्तिगत प्रभाव पडला कीं, गांधीजींचे जे विचार-आचार त्यांना मनापासून पटत नसत ते देखील स्वतःच्या मताला मुरड घालून नेहरू शिरोधार्य मानीत असत. अनेकदा त्यांचा गांधीजींशीं वादहि

होई. पण अखेर गांधीजींच्या आग्रहापुढें नेहरू मान तुकवीत. अशा वेळीं आपल्या मनांत माजणाऱ्या तुंबळ वैचारिक नि भावनात्मक संघर्षाचें अत्यंत प्रांजळ वर्णन नेहरूंनीं आपल्या आत्मचरित्रांत केलेलें आहे.

नेहरूंनीं काँग्रेसच्या व्यासपीठावरून एकदाच गांधीजींना रोखठोक विरोध केला होता. तो म्हणजे, काँग्रेसनें ब्रिटिश साम्राज्याच्या चौकटींतील अंतर्गत स्वायत्ततेवर संतुष्ट राहावें ही गांधीजींची भूमिका फेटाळून. १९२८ मध्यें मद्रास येथें भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या अधिवेशनांत संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मांडण्यामध्यें नेहरूंनीं पुढाकार घेतला. तो ठराव बहुमतानें संमतहि झाला. त्या आधीं नेहरूंनीं समाजवादाचा जाहीर पुरस्कार केला होता आणि अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेस या कामगार संघटनेचें नेतृत्वहि त्यांनीं स्वीकारलें होतें. या सर्व घटनांमुळें नेहरू आपल्या आटोक्याबाहेर जाणार अशी भीति गांधीजींना वाटूं लागली. नेहरूंना पाठवलेल्या दोन पत्रांमध्यें त्यांनीं ती भीति व्यक्तहि केली.

नेहरूंना त्या वेळीं नेताजी सुभाषचंद्र बोस यांची खंबीर साथ होती. हे दोघे तरुण, प्रभावी, ज्वलज्जहाल नि लोकप्रिय नेते जर दंड थोपटून एकत्र उभे राहिले, तर आपल्याला काँग्रेसच्या नेतृत्वांतून बाजूला सारून नि गांधीवादी राजकारण मागें टाकून राष्ट्रीय आंदोलनाला ते नवेंच वळण लावतील असा 'धोका' गांधीजींना वाटूं लागला. पण या प्रश्नावर जवाहरलालना काँग्रेसच्या नेतृत्व-मंडळांतून खालीं खेचण्याचा प्रयत्न काँग्रेसमधल्या नि देशामधल्या एकंदर तप्त वातावरणांत यशस्वी होईल अशी गांधीजींना खात्री वाटेना. त्यांतून जवाहरलालना या प्रश्नावर उघड झुंजीचें आव्हान दिल्यास, त्यांच्या तडफदार स्वभावानुसार ते अधिकच खवळून उठतील आणि तसें झाल्यास काँग्रेसमधल्या नि देशामधल्या वातावरणांत त्यांना पराभूत करणें मुष्किल ठरेल याची जाणीव गांधीजींना होती.

त्याउलट जवाहरलालला प्रेमानें गोंजारल्यास आपल्यावरील भक्तीमुळें तो विरघळतो हाहि अनुभव गांधीजींना होता. म्हणूनच गांधीजींनीं १९२९ मधील कॉंग्रेस अधिवेशनाचें अध्यक्षपद जवाहरलालना देण्यांत पुढाकार घेतला आणि मग इंग्रज सरकारचे व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांच्याशीं वाटाघाटी करण्याकरतां म्हणून, संपूर्ण स्वातंत्र्याचा उल्लेखहि नसलेल्या अकरा कलमी मसुद्यावर नेहरूंची सही युक्तिप्रयुक्तीनें त्यांनीं घेतली. सुभाषचंद्र बोस यांनीं मात्र अशी सही देण्याचें साफ नाकारलें. नंतर लॉर्ड आयर्विन यांच्याबरोबरच्या वाटाघाटी फिसकटल्यावर गांधीजींनींहि संपूर्ण स्वातंत्र्याच्या ठरावाला पाठिंबा दिला आणि मिठाच्या कायद्याचा भंग करण्यासारख्या वर वर क्षुल्लक दिसणाऱ्या प्रश्नावर १९३० मध्यें देशव्यापी सत्याग्रहलढा पेटवण्याची अद्‌भुत किमया करून दाखवली हें खरें. पण कोठलाहि लढा क्रांतीच्या अवस्थेपर्यंत पोहोंचूं न देतां, इंग्रज सरकारवर दडपण आणण्यापुरता त्या लढ्याचा उपयोग करून तो मागें घ्यायचा आणि मग वाटाघाटी सुरू करायच्या हें गांधीजींचें ठराविक तंत्र होतें.

त्यानुसार १९३०–३१ चा लढाहि आपल्या 'आंतल्या आवाजा'ची द्वाही देऊन त्यांनीं मागें घेतला नि व्हाइसरॉयशीं तडजोड केली. लढा शिगेला पोहोंचत असतांच गांधीजींनीं घेतलेल्या या माघारीमुळें नेहरू वैतागून अक्षरशः ढळढळा रडले. पण गांधीजींनीं पुन्हां त्यांची समजूत घातली. अशा रीतीनें गांधीजींनीं जवाहरलालना अखेरपर्यंत आपल्या कह्यांत ठेवलें. अनेकदां कॉंग्रेसच्या ठरावांमधली भाषा जवाहरलाल-जींची, पण प्रत्यक्ष कृतीचा निर्णय मात्र गांधीजींचा असें घडत

असे. नेताजी सुभाष बोस यांनीं मात्र अशा रीतीनें गांधीजीं-पुढें शरणागति स्वीकारण्याचें नाकारलें आणि पुढें त्रिपुरा येथील अधिवेशनांत गांधीजी, सरदार पटेल इत्यादींच्या विरोधाला न जुमानतां, काँग्रेसमधील डाव्या पक्षाच्या संयुक्त पाठिंब्यानें ते काँग्रेसच्या अध्यक्षपदावर निवडून आले. त्या वेळीं जवाहरलालजींनीं सुभाष बोसना साथ दिली असती तर देशाच्या राजकारणाचा रंग पालटला असता आणि राष्ट्रीय चळवळीचें नेतृत्व समाजवादी शक्तीच्या हातीं आलें असतें. पण गांधीजींवरील भक्तीमुळें नेहरूंनीं तेव्हां सुभाष बोस यांना विरोध केला आणि नंतर गांधीजी, सरदार पटेल, इत्यादि नेत्यांनीं सुभाषना काँग्रेसच्या नेतृत्वांतून नेस्तनाबूत केलें.

त्यानंतर दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत 'करेंगे या मरेंगे' या निर्धारानें झालेल्या लढ्यांत काँग्रेसमधले उजवे-डावे हे मतभेद कांहीं काळ बाजूला पडले. पण १९४५ मध्यें काँग्रेस-नेत्यांची तुरुंगांतून मुक्तता झाल्यावर जनतेच्या स्वयंस्फूर्त लढ्याचें देशभर रान पेटलें आणि त्याची परिणति फेब्रुवारी १९४६ मध्यें तीस हजार आरमारी नाविकांनीं इंग्रजांविरुद्ध सशस्त्र उठाव करण्यांत झाली, तेव्हां त्या लढ्याला संघटित स्वरूप देण्याऐवजीं गांधीजींच्या आदेशानुसार तो लढा विझवण्यांतच नेहरूंनीं पुढाकार घेतला. त्यानंतर वाटाघाटींच्या 'अहिंसक' मार्गानें काँग्रेसच्या नेत्यांनीं स्वराज्य मिळवलें खरें. पण त्या 'अहिंसेची' किंमत राष्ट्राच्या फाळणीच्या रूपानें आणि हिंस्त्र धर्मांध यादवीच्या रूपानें त्यांना द्यावी लागली.

अर्थात् तें कांहीं असलें, तरी नेहरूंनीं राष्ट्राच्या स्वातंत्र्या-साठीं जो त्याग केला, जे कष्ट भोगले, जें शौर्य दाखवलें, तसेंच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाच्या पंतप्रधानपदाची धुरा अत्यंत विकट परिस्थितींत त्यांनीं ज्या नेटानें सांभाळली, त्यामुळें त्यांचें नांव या राष्ट्राच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं

कोरलें जाईल हें खरें. पण त्याच वेळीं नेहरूंवर गांधीजींचा नि गांधीवादाचा एवढा जबरदस्त पगडा जर नसता, तर ते केवळ राष्ट्राच्या स्वातंत्र्याचेच नव्हे, तर राष्ट्रांत समाजवाद प्रस्थापित करण्याच्या आंदोलनाचेहि सर्वश्रेष्ठ अग्रणी ठरले असते. पण तें घडायचें नव्हतें. हें मात्र मान्य केलें पाहिजे कीं, पंतप्रधान या नात्यानें नेहरूंनीं राष्ट्राचा शकट जेवढा पुढें नेला, तेवढा तो नेणें काँग्रेसच्या इतर कोणत्याहि नेत्याला जमलें नसतें. म्हणूनच नेहरूंच्या सर्व उणिवांसहितहि या राष्ट्राच्या ऐतिहासिक नेत्यांमध्यें त्यांचें स्थान अढळ आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १२८०८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३६८८४ वि: धारम
क्रमांक ७१७६ नो: दि: ६/५/६४



# नेहरू आणि पंचशील

'पंचशील' हें पंतप्रधान नेहरूंचें एक महान् स्वप्न होतें. तें स्वप्न साकार करण्यासाठीं त्यांनीं आपली सर्व शक्ति, सर्व मुत्सद्देगिरी नि सर्व प्रतिष्ठा पणाला लावली होती. दोन भीषण महायुद्धांमध्यें भाजून पोळून निघालेलें जग पुन्हां तिसऱ्या महायुद्धाच्या खाईत होरपळलें जाऊं नये ही उदात्त भावना या स्वप्नामागें होती. सबंध राष्ट्र अक्षरशः भस्मसात् करण्याची सर्वसंहारक शक्ति अंगीं असलेल्या पन्नास नि शंभर मेगॅटनच्या अण्वस्त्रांनिशीं आणि हजारों मैल अंतरावरील कोणत्याहि ठिकाणावर अचूक मारा करणाऱ्या प्रक्षेपणास्त्रांनिशीं तिसरें महायुद्ध जर पेटलें, तर त्यामध्यें सारी मानवजातच नष्ट होण्याचा धोका आहे, या भयानक सत्याची जाणीव या स्वप्नामागें होती.



सध्यांच्या स्फोटक आंतरराष्ट्रीय वातावरणांत कोणत्याहि दोन राष्ट्रांमधील युद्धाचें पर्यवसान सर्वविध्वंसक जागतिक

युद्धामध्यें होण्याची शक्यता आहे, ही वास्तव भीति या स्वप्नामागें होती. म्हणून हा सर्वनाशाचा धोका टाळण्यासाठीं जगामधल्या भिन्न समाजव्यवस्थांच्या सगळ्या राष्ट्रांनीं एकमेकांशीं शांततेनें वागावें, आपसांतील मतभेद लढाया न करतां वाटाघाटींनीं मिटवावे, सगळ्या राष्ट्रांनीं एकमेकांच्या स्वातंत्र्याला मान द्यावा नि एकमेकांवर आक्रमण करूं नये, एवढेंच नव्हे, तर परस्परांशीं आर्थिक नि सांस्कृतिक सहकार्य करून सर्व राष्ट्रांनीं प्रत्येक राष्ट्राच्या नि प्रत्येक राष्ट्रानें सर्व राष्ट्रांच्या विकासाला साहाय्य करावें आणि आंतरराष्ट्रीय सलोख्याचें नवें युग निर्माण करावें, अशी थोर आकांक्षा या स्वप्नामागें होती.

हें स्वप्न भारत ज्या आशिया खंडाचा भाग आहे त्या खंडामध्येंच प्रथम समूर्त करून, सगळ्या जगाला आदर्श घालून देण्याची भव्य महत्त्वाकांक्षा नेहरूंनीं उराशीं बाळगली होती. यासाठीं प्रदेश नि लोकसंख्या या दोन्ही बाबतींत आशियामधला सगळ्यांत प्रचंड देश असलेल्या चीनशीं सलोखा करण्याचा यत्न नेहरूंनीं केला. या प्रयत्नाला भारत आणि चीन यांच्यामधील पंचशील कराराचें फळ आलें, तेव्हां केवळ भारतानेंच नव्हे तर उभ्या जगामधल्या सगळ्या शांततावादी जनतेनें नेहरूंचा गौरव केला. त्यानंतर इंडोनेशियामधील बांडुग येथें आशिया-आफ्रिका खंडांमधल्या स्वतंत्र राष्ट्रांची अभूतपूर्व परिषद् होऊन त्या सर्वांनीं पंचशीलाची प्रतिज्ञा घेतली, तेव्हां तर जागतिक शांततेचे एक अग्रणी म्हणून पंचखंडांमध्यें त्यांचा जयजयकार झाला.

पण नेहरूंच्या या उत्तुंग मानवतावादी ध्येयाला त्यांच्या दोन शेजाऱ्यांनींच सुरुंग लावला. त्यांतील पहिला शेजारी

म्हणजे पाकिस्तान. १९४७ मध्यें नंगें आक्रमण करून काश्मीरचा तिसरा हिस्सा वळकावणाऱ्या पाकिस्तानी सत्ताधाऱ्यांवर पंचशीलाच्या प्रसाराचा काडीमात्र परिणाम न होतां त्यांनीं भारताविरुद्ध युद्धखोर कट-कारस्थानें चालूच ठेवलीं. पण पाकिस्तानचा जन्मच मुळीं स्वराज्यप्राप्तीनंतरहि भारताच्या प्रगतींत विघ्न निर्माण करूं पाहणाऱ्या इंग्रज साम्राज्यवाद्यांच्या कारवायांतून आणि मुस्लिम लीगच्या धर्मांध भारतद्वेषांतून झालेला असल्यामुळें पाकिस्ताननें असें वागावें यांत नवल नव्हतें. नवल हें कीं, 'सहअस्तित्वाच्या' मार्क्सवादी सिद्धान्ताचा मंत्र जपणाऱ्या नि 'हिंदी-चिनी भाई भाई' असा जयघोष करीत भारताच्या गळ्यांत गळा घालून फिरणाऱ्या चिनी सत्ताधाऱ्यांनींहि भारतीय सीमाप्रदेश गिळंकृत करण्यासाठीं भारतावर आक्रमक चढाई केली.

ज्या भारतानें चीनच्या कम्युनिस्ट राजवटीला संयुक्त राष्ट्रसंघांत प्रवेश मिळावा म्हणून अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राचा रोष पत्करूनहि आटोकाट प्रयत्न केले, तसेच तिबेट-वरील चिनी आक्रमणाकडे जाणूनबुजून डोळेझांक केली, त्याच भारताला चिनी सत्ताधाऱ्यांनीं हाडवैरी ठरवून कृतघ्नतेचा कळस केला. चिनी सत्ताधाऱ्यांच्या या कपटी नि क्रूर आक्रमणामुळें आशियांतील राष्ट्रांच्या ऐक्याचा चक्काचूर झाला. जागतिक शांततेच्या ध्येयाला जबर हादरा बसला. भारताच्या परराष्ट्रीय धोरणावर तर चिनी आक्रमणामुळें भयं-करच आघात झाला. पंतप्रधान नेहरूंचें पंचशीलवादी धोरण मूलतःच चुकीचें नि राष्ट्रविघातक असल्याच्या टीकेचा भडिमार सुरू झाला. नेहरूंनीं अलिप्ततावादी परराष्ट्रीय धोरणाचा त्याग करून, चिनी आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठीं सरळ सरळ अमेरिकेच्या गोटांत सामील व्हावें नि लागेल ती किंमत देऊन पाकिस्तानशीं 'लष्करी संयुक्त आघाडी' उभारावी असा सूरहि उमटूं लागला.

ज्या पंचशीलाच्या थोर ध्येयाची आपण जीवाभावानें

जोपासना केली, ज्याच्या आधारें आशिया खंडांत स्वातंत्र्य, शांतता नि सहकार्य यांचें नंदनवन निर्माण करण्याची पवित्र आकांक्षा आपण वाळगली, त्याचा, आपण सर्वांत विश्वासू नि जिव्हाळ्याचा मित्र मानलेल्या चीननेंच दुष्टपणें विध्वंस केलेला पाहून नेहरूंच्या भावनाप्रधान मनाला केवढ्या घोर यातना झाल्या असतील याची कल्पनाच करवत नाहीं. चिनी सत्ताधाऱ्यांच्या या उलट्या काळजाच्या नि युद्धपिपासू अंतरंगाची आपल्याला कल्पना न आल्यामुळें केवळ पंचशीलाचें ध्येयच नव्हे, तर भारताचें साक्षात् स्वातंत्र्य नि सुरक्षितताच धोक्यांत आल्याच्या विचारानें नेहरूंच्या बुद्धीला नि अंतःकरणाला जो विदारक धक्का बसला असणार, त्यामुळेंच त्यांचा मृत्यु निदान कांहीं वर्षें तरी लवकर ओढवला अशी आमची खात्री आहे.

पण पाकिस्तानी आणि चिनी आक्रमणामुळें भारतावर जें संकट ओढवलें आहे, त्यामुळें नेहरूंच्या पंचशीलवादी परराष्ट्रीय धोरणाचा पायाच नेस्तनावूत झाला आहे, असा जो युक्तिवाद लढवण्यांत येतो तो आम्हांला अयोग्य आणि पराभववादी मनोवृत्तीचा वाटतो. केवळ जागतिक शांततेच्या दृष्टिकोनां-तूनच नव्हे, तर खुद्द भारताच्या रक्षणासाठीं नि विकासासाठींहि नेहरूंनीं घालून दिलेलें अलिप्ततावादी, शांततावादी नि स्वतंत्र परराष्ट्रीय धोरणच तत्त्वतः योग्य नि अपरिहार्य आहे. भारत हा नव्यानेंच स्वतंत्र झालेला नि मागासलेला असा देश आहे. त्याला स्वतःच्या आर्थिक, राजकीय नि सांस्कृतिक विकासावरच जास्तींत जास्त लक्ष केंद्रित करणें भाग आहे. अशा स्थितींत जागतिक शीतयुद्धाच्या आखाड्यामध्यें उतरणें त्याला परवडण्यासारखें नाहीं. त्यांतून जगामधल्या

कोणत्याहि सत्तागटांत भारतानें सामील होणें त्याच्या स्वातंत्र्याला धोक्याचें आहे.

भारतामध्यें कम्युनिस्ट राजवट नसल्यानें त्यानें सोविएत रशिया आदि कम्युनिस्ट सत्तेखालील राष्ट्रांच्या गोटांत सामील होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं. याउलट अमेरिकेच्या गोटांत सामील होण्याचें त्यानें जर ठरवलें, तर अमेरिकेच्या साम्राज्यवादी जाळ्यांत तो फसण्याचा धोका आहे. अमेरिकन सत्ताधाऱ्यांचे भारताविषयींचे हेतु शुद्ध नाहींत हे काश्मीर-प्रकरणीं नि गोवा–प्रकरणीं पुरेपूर सिद्ध झालेलें आहे. तसेंच भारताला अमेरिकेकडून मिळणाऱ्या आर्थिक नि संरक्षण-विषयक साहाय्याच्या मोबदल्यांत भारतावर स्वतःचें साम्राज्यवादी आर्थिक नि राजकीय वर्चस्व लादण्याचे डावपेच अमेरिकन सत्ताधारी अजहि खेळत आहेत. म्हणून चिनी आक्रमणामुळें गांगरून जाऊन ब्रिटन–अमेरिकेच्या गोटांत शिरणें हा आगींतून फुफाट्यांत उडी घेण्याचाच प्रकार ठरेल.

पंतप्रधान नेहरूंच्या नेतृत्वाखालीं भारतानें अलिप्ततावादी नि सर्व राष्ट्रांशीं मैत्री ठेवण्याचें जें धोरण स्वीकारलें, त्यामुळेंच भारताला आज स्वतःच्या रक्षणासाठीं नि विकासासाठीं अमेरिका नि रशिया या दोन्ही प्रतिस्पर्धी राष्ट्रांकडून साहाय्य मिळत आहे, हें विसरून चालणार नाहीं. पंचशील हें जर केवळ अव्यवहार्य मनोराज्य असतें, तर आशिया नि आफ्रिका खंडांमधल्या नवोदित स्वतंत्र राष्ट्रांपैकीं बहुतेकांनीं स्वतःच्या परराष्ट्रीय धोरणावर पंचशीलाचें शिक्कामोर्तब केलेंच नसतें. म्हणून भारताच्या परराष्ट्रीय धोरणामध्यें कोणता कमजोर दुवा जर असेल, तर तो पंचशीलाचा मूलभूत सिद्धान्त हा मुळींच नव्हे. आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा आढावा घेऊन, भारतानें अलिप्ततावादी, शांततावादी नि स्वतंत्र परराष्ट्रीय धोरण स्वीकारणें आवश्यक असल्याची भूमिका नेहरूंनीं जी घेतली ती खरोखर द्रष्टेपणाची होती.

पण नेहरूंच्या आचारविचारांत अनेकदां कठोर वास्तववादी

नि व्यवहारी वृत्तीपेक्षां स्वप्नाळू नि काव्यमय कल्पनांची भरारी अधिक प्रभावी ठरत असे. त्यामुळें पंचशीलवादी धोरणाचें प्रत्यक्षांत आचरण करतांना प्रत्येक बाबतींत व्यवहारी तारतम्याच्या कसोटीवर तें घासून पाहण्याऐवजीं गांधीजींच्य अतिरेकी अहिंसावादाशीं नेहरूंनीं त्याची सांगड घातली. म्हणूनच १९४७ मध्यें पाकिस्ताननें काश्मीरवर केलेल्या आक्रमणाचा भारतीय सैन्यानें जवळजवळ धुव्वा उडवलेला असतांना, संयुक्त राष्ट्रसंघामार्फत काश्मीरचा प्रश्न सलोख्यानें सोडवण्याची भुलथाप लॉर्ड माउंटबॅटननीं देतांच अहिंसाप्रेमी नेहरूंनीं भारतीय सैन्याची विजयी चढाई थोपवून धरली नि काश्मीरचा एक-तृतीयांश हिस्सा प्रदेश पाकिस्तानी आक्रमकांच्याच ताब्यांत राहूं देऊन काश्मीरचा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघाच्या खोड्यांत अडकवला. तेथें तो सुटणें अशक्य असल्याचें स्पष्टपणें नि अनेकदां सिद्ध झाल्यावरहि आपण शांतताद्रोही ठरूं या भीतीपायीं नेहरूंनीं त्या प्रश्नावरील संयुक्त राष्ट्रसंघामधल्या फसव्या चर्चेवर बहिष्कार घालण्याचें नि तो प्रश्न स्वसामर्थ्यानें सोडवण्यासाठीं सज्ज होण्याचें नाकारलें.

चिनी सत्ताधाऱ्यांनीं जेव्हां एकीकडे भारताशीं पंचशीलाचे प्रेमालाप करत असतांनाच दुसरीकडे १९५४ सालापासून भारतीय सीमाप्रदेशांत घुसायला सुरवात केली, तेव्हांहि त्यांना प्रथमतःच जरब बसवण्याऐवजीं त्यांच्या चांगुलपणावर प्रमाणाबाहेर भरंवसा ठेवून नि गोडीगुलाबीनें त्यांचा हृदयपालट करण्याची आशा बाळगून नेहरू त्यांच्याशीं मित्रत्वानें वागत राहिले. पंचशीलावर अशा रीतीनें अहिंसावादाचें आवरण चढवण्याचें धोरण नेहरूंनीं जें स्वीकारलें त्याचा एक

परिणाम असा झाला कीं, स्वराज्यप्राप्तीनंतर भारताला संरक्षण दृष्ट्या जास्तींत जास्त सामर्थ्यशाली बनवण्याकडे नेहरूंचें नि एकंदर कॉंग्रेस राजवटीचें सपशेल दुर्लक्ष झालें. भारताच्या तिन्ही पंचवार्षिक योजनांमध्यें भारताला संरक्षणक्षेत्रांत बलाढ्य नि स्वयंपूर्ण बनवण्याच्या प्रश्नाला अत्यंत किरकोळ मानण्यांत आलें.

या जगामध्यें समर्थांच्या शांततावादालाच किंमत असते, दुर्बळांच्या नव्हे, हें कटु व्यावहारिक सत्य अहिंसावादानें भारलेल्या नेहरूंच्या नजरेआड झालें. १९६२ च्या अखेरीस चीननें केलेल्या चढाईनंतर काय ती या वैगुण्याची जाणीव नेहरूंना होऊं लागली होती. तरीहि शांततावादाला व्यावहारिक धोरणापेक्षां निरपवाद आध्यात्मिक सिद्धान्त मानण्याची वृत्ति नेहरूंच्या मनांत एवढी रुजली होती कीं, त्या सिद्धान्तापासून ढळल्याचा आरोप आपल्यावर येऊन आपण 'पाखंडी' ठरूं नये म्हणून चिनी नि पाकिस्तानी आक्रमकांपुढें पुनः पुन्हां नमतें घेण्याकडे त्यांचा कल झुकत असे. यामागें नेहरूंचा हेतु अत्यंत उच्च होता यांत शंका नाहीं. त्यांच्या या प्रयत्नांमागें देशाभिमानाची वाण होती असा आरोप करणें म्हणजे देशासाठीं त्यांनीं केलेल्या तपश्चर्येची विटंबना करणें ठरेल.

पण साऱ्या जगाला केवळ नैतिक युक्तिवादानें अहिंसाप्रेमी बनविण्याच्या प्रयत्नांत नेहरूंना जो कटु अनुभव आला तो प्रेमानें जग जिंकण्याचें दिव्य स्वप्न पाहणाऱ्या ख्रिस्त, गौतम बुद्ध इत्यादि महात्म्यांनाहि आला होता. मानवी समाजाच्या विकासाचे जे कठोर नियम इतिहासानें घालून दिले आहेत, ते केवळ थोर विभूतींच्या आकांक्षांनीं पालटूं शकत नाहींत. पण तरीहि अशा विभूतींच्या ध्येयवादाचा जगाच्या इतिहासावर परिणाम होत असतो. या दृष्टिकोनांतून नेहरूंच्या पंचशीलवादी विचारसरणीकडे पाहतां, चिनी आणि पाकिस्तानी आक्रमकांचें नांवनिशाणहि जेव्हां उरणार नाहीं, तेव्हां जागतिक शांततेचे एक महान् उपासक म्हणून नेहरूंचें

नांव मात्र अजरामर झालेलें आढळेल यांत शंका नाहीं. एवढेंच नव्हे तर आजहि या पंचशीलवादी सिद्धान्ताला जर व्यावहारिक मुत्सद्देगिरीची नि खंबीरपणाची जोड दिली, तर तो सिद्धान्त भारताच्या स्वातंत्र्याला नि प्रगतीला तारक नि सबंध जगाला मार्गदर्शक ठरल्याखेरीज राहणार नाहीं. म्हणूनच पंचशीलाच्या सिद्धान्ताला जन्म देऊन नेहरूंनीं एक महान् ऐतिहासिक कामगिरी बजाविली असेंच म्हटलें पाहिजे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वत्वप्रत
अनुक्रमांक 3६८८४ .. दि: ...
क्रमांक ...२२७६... ...




ज्याला 'नेहरूवाद' असें म्हणतां येईल, अशी नेहरूंची कांहीं निश्चित विचारसरणी किंवा तत्त्वज्ञान सांगतां येईल काय? वैचारिक सृष्टींत नेहरू हे एकांडे शिलेदार होते. त्याबाबतींत त्यांनीं कोणाला गुरु केलें नाहीं. जगांतील सर्व क्रांतिकारक विचारधारांची त्यांना पूर्ण जाणीव होती. त्यांपैकीं कांहीं विचारांचे संस्कार वेळोवेळीं त्यांच्या मनावर होत गेले. पण कोणत्याहि एका विचाराच्या आहारीं असे ते केव्हांहि गेले नाहींत, त्यामुळें त्यांना 'संशयवादी' म्हणणें जास्त यथार्थ ठरेल.

ह्या त्यांच्या संशयवादी प्रवृत्तीमुळें कोणत्याहि विचाराचा निश्चितपणें स्वीकार करतांना त्यांच्या मनाची फार ओढाताण होई–नव्हे, त्यांच्या जिवाला फार यातना होत. तथापि, कोणत्याहि तत्त्वज्ञानाचा विचार करतांना त्याकडे जागतिक दृष्टिकोनानें पाहावयाची त्यांनीं स्वतःला संवय लावून घेतली होती. ज्या ज्या वेळीं जो जो विचार त्यांच्या डोक्यांत

प्रभावी असे तो तो विचार ते त्याच दृष्टिकोनामधून मांडीत असत. पण आपल्या या विविध विचारांमधून त्यांनीं निश्चित वा सुसंगत तत्त्वज्ञानाचें सूत्र गोंवण्याचा कधींच प्रयत्न केला नाहीं. त्याबद्दल त्यांचा त्यांनाच जणुं कांहीं संशय पडलेला होता.

एके ठिकाणीं ते लिहितात : "माझ्या जीवनाचें तत्त्वज्ञान काय आहे बरें? मला माहीत नाहीं. कांहीं वर्षांपूर्वीं तें सांगायला मी असा घोटाळलों नसतों. पण गेल्या कित्येक वर्षांत अशा कांहीं घटना घडलेल्या आहेत कीं, त्यामुळें मी गोंधळलों आहें. भांबावलों आहें. अस्वस्थ झालों आहें. त्यामुळें ज्या भविष्यकाळाचा आराखडा पूर्वीं मला स्पष्ट दिसत होता तो आतां अंधुक आणि अस्पष्ट दिसूं लागला आहे. कालचीं ध्येयें नि उद्दिष्टें आजहि माझ्या डोळ्यांसमोर आहेत. पण त्यांचें पूर्वीचें तेज मंदावलें आहे. हृदयाला आनंद देणारें नि शरिराला चैतन्य देणारें यांचें तेजस्वी सौंदर्य पहिल्यासारखें उरलें नाहीं. जगांत असत्याचा जय पुष्कळदाच होतो, पण त्यापेक्षांहि जें सत्य आहे असें वाटत होतें त्याचें निकृष्ट आणि विकृत स्वरूप प्रकट व्हावें, ह्याचें मनाला जास्त दुःख होतें."

ह्यावरून सत्य काय आहे ह्याबद्दल त्याचा शोध करतांना त्यांचें मन नेहमीं गोंधळांत पडे. साध्य आणि साधन ह्यांचा तर त्यांच्या डोक्यांत वारंवार घोटाळा होई. ते म्हणतात, "अशा प्रसंगीं माणसानें काय करायचें? कांहीं न करतां स्वस्थ बसावें म्हटलें, तर आपल्या पराभवाची कबुली देऊन असत्याला शरण गेल्यासारखें तें होतें. बरें, कांहीं करावें म्हटलें तर असत्याच्या कोणत्या तरी प्रकाराशीं तडजोड करावी लागते आणि अशा तडजोडींतून निष्पन्न होणारें सर्व

दुष्परिणाम सहन करण्याला तयार व्हावें लागतें." संशयाचे नि नैराश्याचे अधूनमधून असे झटके नेहरूंना येत असले तरी त्यांच्या ह्या तात्त्विक आत्मनिरीक्षणांतूनच त्यांना आशादायक भविष्यकाळाचा साक्षात्कार होत असे.

विज्ञानावद्दल त्यांना श्रद्धा वाटे. नवजीवनाच्या निर्मिती-साठीं मानवाचा सतत प्रयत्न चाललेला आहे ह्याचा त्यांना विश्वास वाटे. अशा वेळीं त्यांच्या तोंडून असे उद्गार निघत: "व्यक्ति आणि समाज ह्यांचे संवंध अधिक सुसंगत आणि समतोल व्हावेत आणि त्यामुळें जीवन अधिक समृद्ध आणि उदात्त व्हावें, म्हणून मानवाची जी अहर्निश धडपड चालू आहे, तो माझ्यापुढें खरा प्रश्न आहे. प्रत्यक्ष ज्ञानावर आणि विज्ञानावर आधारलेलें जिवंत तत्त्वज्ञानच आजच्या सर्व प्रश्नांचें उत्तर देऊं शकेल!" अधिभौतिक आणि सामाजिक प्रश्नांच्या विचारांनीं त्यांचें मन सदैव व्याप्त असल्यानें धर्मावावत ते उदासीन असत. किंबहुना देवभोळ्या आचारांशीं नि रूढ अंधविश्वासांशीं निगडित असलेल्या सनातनी धर्माचा त्यांना उबगच वाटत असे.

गूढवादाबद्दल त्यांना कधीं प्रेम वाटलें नाहीं. अध्यात्मवाद आणि तत्त्वज्ञान ह्यांचें त्यांना कधीं कधीं बौद्धिक आकर्षण वाटे, पण त्या क्षेत्रांत त्यांचें मन फार वेळ रमत नसे. आपण अज्ञेयवादी आहोंत असें अनेकदां त्यांनीं उघडपणें सांगितलें होतें. 'या विश्वाचीं सूत्रें चालविणारी कोणीतरी एक अज्ञात किंवा दैवी शक्ति आहे, अशा तऱ्हेची कल्पना माझ्यानें करवत नाहीं. जे तशी करतात, त्यांच्यावद्दल कींव वाटते.' तथापि जीवनाचा नैतिक दृष्ट्या विचार केला पाहिजे, या विचाराचें त्यांना जबरदस्त आकर्षण वाटे. आणि म्हणून सार्वजनिक जीवन नैतिक मूल्यांनीं प्रभावित झालें पाहिजे, या गांधीजींच्या विचारसरणीचा त्यांच्या मनावर जास्त प्रभाव पडला. मार्क्सवादाचें बौद्धिक ऋण ते मान्य करीत असत.

त्यासंबंधीं ते म्हणत, "मार्क्सवादानें माझें संपूर्ण समाधान

किंवा माझ्या मनांतील सर्व शंकांचें निरसन कधींच झालें नाहीं. त्याचें मुख्य कारण म्हणजे त्याचा ठोकळेबाजपणा! मानवी जीवन इतकें गुंतागुंतीचें आहे आणि त्यासंबंधींचें आपलें ज्ञान इतकें अपूर्ण आहे कीं, एका विशिष्ट तत्त्वज्ञानाच्या चौकटींत तें सामावूं शकतें, हें आपल्या तर्कबुद्धीस मुळीं पटतच नाहीं." सोव्हिएट समाजानें केलेल्या कित्येक महत्त्वपूर्ण गोष्टींबद्दल त्यांना कौतुक वाटे. पण ते स्वतः व्यक्तिस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते असल्याकारणानें सोव्हिएट समाजांतील सामाजिक नियंत्रणाचा अतिरेक हा त्यांना केव्हांहि मान्य होण्यासारखा नव्हता. मनुष्याची इच्छाशक्ति कांहीं मर्यादेच्या आंत का होईना पण स्वतंत्र राहिली पाहिजे, तरच त्या व्यक्तीचीं मूल्यें विकसित होऊं शकतील, असें ते म्हणत.

सामाजिक ध्येयें साध्य करण्यासाठीं आचार आणि विचार यांचा समन्वय कसा घडवून आणावा याचा निदिध्यास त्यांना लागून राहिला होता. त्यांनीं एके ठिकाणीं लिहिलें आहे, "कांहीं तरी करावें, अशी तळमळ किती वर्षांपासून तरी माझ्या मनाला लागून राहिली आहे. पण जी कांहीं कृति करावयाची आहे, ती विचारापासून वेगळी असतां कामा नये. उलट विचारांतूनच ती उचंबळली पाहिजे. कृति आणि विचार यांची सुसंगति साधली म्हणजे जीवनामध्यें पूर्णतेचें समाधान उत्पन्न होतें—आणि जिवंतपणाची उत्कटता भासते. अशा वेळेला कृतीची हांक अनावर होते. संकटाचें भय वाटेनासें होतें आणि मृत्यूच्या समोर मान ताठ करून उभें राहावेंसें वाटतें. मला मृत्यूचें प्रेम नाहीं, तथापि त्याचें भयहि नाहीं. जीवनावर माझें प्रेम आहे. त्याचें विलक्षण आकर्षण मला आहे. माणसाला कृतीचें वेड आणि ऊर्मि नसेल तर

आशा आणि जिवंतपणा नष्ट होऊन त्याचें जीवन निरर्थक होईल."

पाश्चात्य विचारांतील उदारमतवादाचा नेहरूंच्या मनावर विशेष प्रभाव पडलेला असल्याकारणानें राजकीय लोकशाही आणि व्यक्तिगत स्वातंत्र्य यांवर त्यांची अढळ श्रद्धा होती. लोकशाहीचे ते कट्टर कैवारी होते. म्हणूनच संसदीय पद्धतीचा, मतदान-स्वातंत्र्याचा, त्याचप्रमाणें भाषण, मुद्रण, सभा, धर्म, राजकीय पक्ष आणि नागरिक हक्क यांच्या स्वातंत्र्याचा ते जन्मभर पुरस्कार करीत आले. समाजवादाचीं मुळें तर त्यांच्या विचारांत खोल रुजलेलीं होतीं. त्यामुळेंच राष्ट्रीय विकासाच्या योजनांवर आणि आर्थिक समतेवर त्यांनीं विशेष भर दिला. पंचवार्षिक योजना, समाजवादी समाजरचना आणि योजनाबद्ध अर्थव्यवस्था हीं आपलीं ध्येयें साकार करण्यासाठीं त्यांनीं आपलें सर्वस्व वेंचलें. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांमध्यें जो बदल घडवून आणावयाचा त्याला नैतिक मूल्यांचा पाठिंबा असला पाहिजे—आणि तो अहिंसात्मक रीतीनें घडवून आणला पाहिजे—ही शिकवणूक त्यांना गांधीवादानें दिली.

ते ज्वलंत राष्ट्रवादी होते हें तर सांगावयासच नको. साम्राज्यवाद नष्ट झाला पाहिजे आणि अखिल मानवजात स्वतंत्र झाली पाहिजे, असें त्यांना उत्कटतेनें वाटे. सारांश, उदारमतवाद, समाजवाद, गांधीवाद आणि राष्ट्रवाद यांचा समन्वय नेहरूंच्या विचारसरणींत झालेला होता. पण कोणत्या वेळीं कोणत्या वादाचा प्रभाव त्यांच्यावर पडेल, हें त्या त्या परिस्थितीवर अवलंबून राही. भारताच्या स्वातंत्र्यासाठीं ते जितक्या निकरानें झगडले, तेवढे समाजवादासाठीं ते झगडले नाहींत, अशी त्यांच्यावर टीका होते. कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत समाजवाद भारतांत आवश्यक आहे, यावद्दल त्यांच्या मनांत मुळीं शंकाच नव्हती. पण तो समाजवाद कोणत्या साधनानें आणावा, याचा निश्चित आराखडा


त्यांच्याजवळ नव्हता. त्यांना असें वाटे कीं, लोकशाहीच्या आणि समाजविकासाच्या मार्गानें समाजवाद आला पाहिजे. सर्व धर्मांच्या लोकांना समान हक्क देऊन म्हणजे निधर्मी राज्यपद्धतीनें तो आला पाहिजे. जनतेच्या जीवनाची पातळी सुधारून तो आला पाहिजे. क्रांतीच्या नव्हे–पण शांतीच्या मार्गानें व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी न करतां तो आला पाहिजे. एवढीं सारीं पथ्यें पाळून समाजवाद आणावयाचा म्हटलें, तर त्याला तेवढा विलंब हा लागणारच!

त्याचा अर्थ, स्वातंत्र्याइतकी समाजवादाबद्दल नेहरूंना कळकळ वाटत नव्हती, असें म्हणणें बरोबर होणार नाहीं. १९३६ सालीं समाजवादी परिषदेला संदेश पाठवतांना ते म्हणाले होते, 'समाजवादाबद्दल मला अतिशय आत्मीयता वाटते, हें तुम्हांला माहीत आहे. पण समाजवादाचा स्फूर्तिदायक आणि आशादायक संदेश भारतीय जनतेच्या अंतःकरणापर्यंत कसा पोहोंचेल याची मला चिंता वाटते. समाजवादाचें भारतीयीकरण केल्यावांचून त्याचा प्रभाव ह्या देशांतील जनतेवर पडणार नाहीं, असें मला निश्चयानें वाटतें. कित्येक लोक नेहरूंना कम्युनिस्ट म्हणतात. पण तें खरें नव्हे! १९२३ सालींच त्यांनीं म्हणून ठेवलें आहे कीं, 'एका बाजूला लेनिन आणि मुसोलिनी आणि दुसऱ्या बाजूला गांधी ह्या दोघांच्या मार्गांतून आपल्याला आपला मार्ग शोधून काढावयाचा आहे.' दुसऱ्या महायुद्धानंतर मार्क्सबद्दल वाटणारें त्यांचें बौद्धिक आकर्षणहि कमी झालें. मार्क्स हा कालबाह्य झाला असून मार्क्सवादाची भाषा आज बोलणें हें प्रतिगामीपणाचें लक्षण आहे, असें ते म्हणत.

भगवान् बुद्धांच्या विचारांचा मात्र अलीकडे त्यांच्या मनावर

पगडा बसला होता. एका मित्राला ते एकदां म्हणाले, 'कोणत्याहि धर्माचें आकर्षण मला वाटत नाहीं. पण एखाद्या धर्माचा स्वीकारच करायचा झाला, तर मी बौद्ध धर्माचा स्वीकार करीन!' हजारों लोकांचा प्राणनाश करणाऱ्या अणुशास्त्राबद्दल क्रुश्चेव्ह यांच्याशीं चर्चा करतांना नेहरूंनीं त्यांना एक गोष्ट सांगितली. ती अशी : 'दोन हजार वर्षांपूर्वी भारतांत साम्राट् अशोक नांवाचा एक बलाढ्य राज्यकर्ता होऊन गेला. त्याचे सेनापति प्रत्येक लढाईत हजारों लोकांना ठार मारून विजयी होत. या अमर्याद प्राणहानीचा अशोकाला कंटाळा येऊन, त्यानें अखेर बुद्धधर्माचा स्वीकार केला. तरी देखील एक दिवस एक सेनापति लढाई जिंकून त्याच्याकडे आला आणि आपण किती हजार माणसें मारलीं हें तो गर्वानें सांगूं लागला. त्याबरोबर सम्राट् अशोक सिंहसनावरून एकदम उठला आणि आपल्या तलवारीचे दोन तुकडे करून तो गरजला कीं, 'बस झाली ही हिंसा आणि प्राणहत्या! यापुढें युद्ध बंद! माझ्या राज्यांत आतां सर्वत्र शांतताच नांदेल!' या गोष्टीवरून नेहरूंच्या मानवतावादाची कोणालाहि कल्पना येण्यासारखी आहे.

एवढें सारें 'रामायण' सांगितल्यानंतर शेवटीं 'नेहरूवाद' म्हणजे काय हा प्रश्न उरतोच! ते एकदां म्हणाले होते, 'मी स्वभावानें आणि संस्कारानें व्यक्तिवादी आहें. पण बुद्धीनें समाजवादी आहें. कारण समाजवादानें व्यक्तिमत्त्वाचा नाश होत नाहीं. उलट आर्थिक आणि सांस्कृतिक दास्यांतून असंख्य व्यक्तींची मुक्तताच होते.' सारांश, व्यक्तिस्वातंत्र्यवाद, उदारमतवाद, राष्ट्रवाद, लोकशाही समाजवाद, गांधीवाद आणि मानवतावाद अशा विविध वादांच्या सौम्य, सुसंगत आणि सुगंधित संमिश्रणामधून जो 'वाद' निर्माण होईल, त्याला 'नेहरूवाद' ह्या नांवानें संबोधावयाला हरकत नाहीं.



# विरोधकांना भुलविणारे नेहरू

भारतामधील कोट्यवधि अपक्ष जनतेच्या कंठामधले जवाहरलाल नेहरू हे 'ताईत' होते हें सांगण्याची जरुरी नाहीं. त्याप्रमाणें ज्या काँग्रेस पक्षाचे नेहरू हे वर्षांनुवर्षें सूत्रधार होते, त्या पक्षांतील लोकांना ते एखाद्या दैवताप्रमाणें पूज्य आणि वंद्य वाटावे हेंहि पण साहजिक होतें. तथापि, सगळ्यांत कौतुकाची गोष्ट ही कीं, काँग्रेस पक्षावर सतत टीका करणाऱ्या विरोधी पक्षांमधल्या कित्येक लोकांना सुद्धां नेहरूंच्याबद्दल विलक्षण आकर्षण वाटत होतें. इतकें कीं, नेहरूंवरील त्यांच्या त्या प्रेमामुळें त्यांच्या पक्षांमध्यें वारंवार भांडणें होत होतीं आणि त्याचेंच पर्यवसान अखेर त्या पक्षांच्या फाटाफुटीमध्यें झालें.

आजकाल राजकीय पक्षांमध्यें सर्व जगांतच फाळणीची एक लाट उसळलेली आहे. पाश्चात्य देशांतील भांडवलशाही राष्ट्रांत ही फाटाफूट आंतल्या आंत खदखदते आहे, तर

साम्यवादी जगांतहि आंतरराष्ट्रीय कम्युनिस्टांच्या संघटनेमध्यें चीननें बंडाचें निशाण उभारलेलें आहे. भारतामधल्या प्रमुख राजकीय पक्षांतहि ही फाटाफुटीची सांथ आलेली आहे. कम्युनिस्ट पक्ष आणि प्रजासमाजवादी पक्ष यांच्यांतील फाटाफूट तर आतां जगजाहीर झालेली आहे. कॉंग्रेस पक्षांत बाह्यात्कारी जरी एकजुटीचा देखावा दिसत असला, तरी त्याच्या पोटांत डाव्या आणि उजव्या शक्तींची झोंबाझोंबी सुरू झालेली आहे. आणि कोणता गट दुसऱ्यावर केव्हां मात करील याचें भविष्य सध्यां तरी वर्तवितां येणार नाहीं. भारतामधल्या विरोधी पक्षांतील हे अंतर्गत संघर्ष केवळ वैचारिक मतभेदांमुळें निर्माण झालेले आहेत, असें म्हणतां येणार नाहीं. या भांडणाचें मुख्य मूळ त्या त्या पक्षांतील गटांना नेहरूंविषयीं वाटणारें आकर्षण हेंच होय!

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून देशाचें राजकीय क्षेत्र पंडित नेहरूंच्या विराट व्यक्तिमत्त्वानें संपूर्णतः व्यापून टाकलें होतें. तसें पाहिलें तर स्वातंत्र्यप्राप्तीनें देशामधली कोणतीहि महत्त्वाची समस्या समाधानकारकपणें सुटलेली नाहीं. दैनंदिन जीवनांतील प्रत्येक आवश्यक गोष्टीची टंचाई निर्माण झाली. महागाई आणि काळाबाजार वाढत गेला. दारिद्र्य आणि बेकारी बेसुमार वाढली. एवढीं संकटें जणुं कांहीं अपुरीं पडलीं, म्हणून त्यांत लक्षावधि निर्वासितांच्या पुनर्वसतीकरणाची भर पडली. आणि त्या सर्व संकटांवर अखेरीस चिनी आक्रमणानें कळसच चढवला. अशा रीतीनें गेल्या सतरा वर्षांत कॉंग्रेसच्या राज्यकारभाराला एकापेक्षांहि एक प्रचंड हादरे बसले. तथापि, नेहरूंच्या अद्वितीय आणि अढळ स्थानावर त्यांचा काडीमात्र परिणाम झाला नाहीं. नेहरूंच्याऐवजीं राष्ट्राचें नेतृत्व जर दुसऱ्या कोणाच्या हातीं असतें तर तें केव्हांच कोलमडून पडलें असतें.

त्याचा परिणाम असा झाला कीं, मोठमोठ्या संकटांच्या वेळीं देशाचें संरक्षण करणारें हें नेहरूंचें राजकारण यापुढें

सावरून धरलें पाहिजे, नाहीं तर नेहरूंच्यानंतर देशाचें स्वातंत्र्य आणि लोकशाही फार वेळ टिकणें अशक्य आहे, अशी जाणीव विरोधी पक्षांमधल्या कित्येकांच्या मनांत निर्माण झाली. वार्धक्यामुळें म्हणा किंवा नेहरूंच्या प्रकृतींत बिघाड झाल्यामुळें म्हणा, 'नेहरूयुगा'चा समाप्तिकाळ आतां समीप आलेला आहे, याची कल्पना ह्या विरोधकांना झाल्यावांचून राहिली नाहीं. म्हणून नेहरू हयात असतांना त्यांच्या डोळ्यांदेखतच आपण आपल्या पक्षामध्यें नेहरूवादी धोरणाचा उठाव केला, तर तो यशस्वी होईल अशी विरोधी पक्षांतील ह्या मंडळींनीं कल्पना केली.

नेहरूंच्या नेतृत्वानें आणि मार्गदर्शकत्वानें कॉंग्रेसनें गेल्या दहा वर्षांत जीं जीं धोरणें आणि कार्यक्रम आंखले, त्यांचा प्रजासमाजवादी आणि कम्युनिस्ट पक्षांच्या धोरणावर परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. उदाहरणार्थ, १९५५ सालीं आवडीच्या अधिवेशनांत 'समाजवादी समाजरचना' या ध्येयाची जेव्हां कॉंग्रेसनें घोषणा केली, तेव्हांपासून ह्या देशांतील राजकीय पक्षांच्या इतिहासांत एक नवीन पर्व सुरू झालें असें म्हटलें पाहिजे. आवडी कॉंग्रेसच्या घोषणेमुळें सर्वांत अधिक पंचाईत जर कुणाची झाली असेल, तर ती आमच्या प्रजासमाजवादी पक्षाची! त्यांच्या शिडांतली हवाच तेव्हांपासून कमी झाली, आणि त्यांच्या घसरगुंडीला प्रारंभ झाला.

त्याच्या दोन वर्षें आधीं जयप्रकाश नारायण ह्यांना आपल्या मंत्रिमंडळांत येण्याचें आमंत्रण नेहरूंनीं केलें होतें हें येथें सांगणें जरूर आहे. राममनोहर लोहियांनीं त्या आमंत्रणाला निकराचा विरोध केला नसता, तर जयप्रकाश हे कधींच नेहरू

सरकारांत जाऊन दाखल झाले असते, असें कित्येकांना त्या वेळीं वाटलें. प्रजासमाजवादी पक्षांतील आचार्य कृपलानी, आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश आणि अशोक मेहता यांच्याशीं आणि दुसऱ्या अनेक पुढाऱ्यांशीं नेहरूंचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यामुळें साहजिकच प्रजासमाजवादी पक्षांत नेहरूवादी आणि नेहरूविरोधी असे दोन गट उत्पन्न झाले. तथापि, काँग्रेसशीं आणि नेहरूंशीं सहकार्य करावें, अशा विचारसरणीच्या गटावर राममनोहर लोहिया हे पहिल्यापासून कडाडून हल्ला चढवीत आले. त्याचा परिणाम असा झाला कीं, लोहियांना आणि त्यांच्या विचारसरणीच्या मंडळींना प्रजासमाजवादी पक्षांतून बाहेर पडावें लागलें. ही त्या पक्षांत पडलेली पहिली फूट होय. आणि तिचें कारण नेहरू हेच होत !

पुढें प्रजासमाजवादी पक्षांतून जयप्रकाश आणि कृपलानी ही मंडळी निघून गेली. तरी देखील त्या पक्षांतील अंतर्गत संघर्ष कांहीं कमी झाला नाहीं. त्याला गेल्या जूनमध्यें भोपाळच्या परिषदेंत तोंड फुटलें. त्याआधीं चिनी आक्रमणामुळें काँग्रेसच्या पुढाऱ्यांची प्रतिष्ठा देशांत पुष्कळच घटलेली होती. म्हणून नेहरू आणि काँग्रेस यांच्या विरुद्ध आतां कडक भूमिका घेतली पाहिजे, असें पुष्कळ प्रजासमाजवाद्यांना वाटलें. ती भूमिका प्रजासमाजवादी पक्षाचे नेते अशोक मेहता यांना मान्य झाली नाहीं. त्यांनीं आपल्या नेतृत्वाचा राजिनामा देऊन टाकला, एवढेंच नव्हे तर 'प्लॅनिंग कमिशन'च्या डेप्युटी चेअरमनची जागा स्वीकारून त्यांनीं पक्षीय भांडणाच्या आगींत उलट तेलच ओतलें. अशोक मेहता यांच्या ह्या कृत्यामुळें पक्षांतील अंतर्गत भांडणें पराकाष्ठेचीं विकोपाला गेलीं; अखेर पक्षाच्या कार्यकारणीनें त्यांची पक्षांतून हकालपट्टी करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळें प्रजासमाजवादी पक्षांत अशोकवादी विचारसरणीचे जे सदस्य होते त्यांना आपल्या पक्षांतून बाहेर पडायला आणि काँग्रेस पक्षांत प्रवेश करायला

चांगलीच संधि मिळाली. सारांश, त्या पक्षांतील ही सारी फाटाफूट नेहरूंच्यामुळें झाली, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

नेहरूंना विरोध केला म्हणून लोहियांना ज्या प्रजासमाजवादी पक्षानें काढून टाकलें, त्यालाच नेहरूंची बाजू घेतल्याच्या आरोपावरून अशोक मेहतांची हकालपट्टी करावी लागली आणि आतां नेहरूविरोधाच्या भूमिकेवर समाजवादी आणि प्रजासमाजवादी पक्षांची एकी होत आहे, ही सगळ्यांत मौजेची गोष्ट आहे. 'जें' प्रजासमाजवाद्यांचें झालें 'तें'च कम्युनिस्टांचें पण झालें आहे किंवा होत आहे. नेहरू आणि त्यांच्या मंत्रिमंडळाच्या धोरणाबाबत कोणती भूमिका घ्यावयाची या प्रश्नावर प्रजासमाजवादी पक्षाचें ऐक्य जसें दुभंगलें त्याप्रमाणेंच त्याच भूमिकेवर कम्युनिस्टांतील डाव्या आणि उजव्यांचे मतभेद विकोपाला गेलेले आहेत. कम्युनिस्ट पक्षांतील या अंतर्गत भांडणाला आवडी कॉंग्रेसपासूनच प्रारंभ झाला.

१९५६ सालीं पालघाटच्या अधिवेशनांत कम्युनिस्ट पक्षानें असा ठराव मंजूर केला कीं, कोणत्याहि सरकारांत कोण मंत्री आहेत हा विचार करणें गौण असलें, तरी नेहरूंच्या बाबतींत पक्षानें निराळी भूमिका घेणें जरूर आहे. या ठरावाला डाव्या कम्युनिस्टांचा विरोध होता. तथापि, कम्युनिस्ट पक्षाच्या समाजवादी कार्यक्रमाला उपकारक असे कित्येक ठराव वा कार्यक्रम नेहरू सरकारनें स्वीकारल्यामुळें त्याला विरोध करणें डाव्यांना सुद्धां अशक्य झालें. त्याखेरीज नेहरूंचें परराष्ट्रीय धोरण हें तर कम्युनिस्ट धोरणाच्या सर्वस्वी चौकटींत बसणारें होतें. म्हणून महत्त्वाच्या धोरणाच्या प्रश्नावर नेहरूंना विरोध न करतां राज्यकारभारांतल्या लांचलुचपतीसारख्या गौण प्रश्नावर टीका करण्याचें धोरण

कम्युनिस्टांनीं अवलंबिलें. १९५६ पासून कम्युनिस्ट पक्षाचीं जीं महत्त्वाचीं अधिवेशनें भरलीं, त्यांत नेहरू सरकारचें धोरण कितपत पुरोगामी आहे, या एकाच गोष्टीचा अधिक विस्तारानें विचार करण्यांत आला. केंद्रीय मंत्रिमंडळांतील कोणते मंत्री पुरोगामी आहेत आणि कोणते प्रतिगामी आहेत, याच्यांत फरक करण्यांत आला. नेहरू, कृष्ण मेनन आणि मालवीय यांना पाठिंबा देण्यांत आला. आणि मोरारजी देसाई, टी. टी. कृष्णम्माचारी यांच्यावर कडक टीका करण्यांत आली.

तथापि, सर्व मंत्र्यांची नेमणूक नेहरूच करीत असल्याकारणानें व्यक्तिशः मंत्र्यावर टीका करणें योग्य नाहीं असें म्हणणारी कांहीं मंडळी कम्युनिस्ट पक्षांत होती. पण सर्वसाधारणपणें सरकारवर टीका न करतां नेहरूंना पाठिंबा द्यावयाचा हेंच धोरण ठोकळमानानें कम्युनिस्ट पक्षानें स्वीकारलें असें म्हणावयाला हरकत नाहीं. नेहरूंना पाठिंवा देण्याच्या या धोरणामुळें कम्युनिस्ट पक्षांत निर्माण झालेला अंतर्गत भेद चिनी आक्रमणामुळें अधिक धसाला लागला. नेहरू सरकारला संपूर्ण साहाय्य आणि पाठिंवा देण्याच्या 'सोव्हिएट' भूमिकेचा 'उजव्यां'नीं पुरस्कार केला, तर 'प्रतिगामी आणि साम्राज्यवादी नेहरू टोळी'चा धिक्कार करण्याची 'चिनी' भूमिका 'डाव्यां'नीं घेतली. कम्युनिस्टांमधली डाव्या-उजव्यांची ही फाटाफूट कोणत्या थरापर्यंत यापुढें जाणार आहे, हें एवढ्यांतच सांगतां येणार नाहीं. सारांश, कम्युनिस्टांच्या आणि प्रजासमाजवाद्यांच्या धोरणावर आणि कार्यक्रमावर गेल्या दहा वर्षांत नेहरूंच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा निःसंशय परिणाम झाला, यांत मुळींच शंका नाहीं.

नेहरूंच्या धोरणाला पाठिंवा देणारे आणि विरोध करणारे लोक जसे विरोधी पक्षांत होते, तसे ते काँग्रेस पक्षांतहि होते आणि आहेत. तथापि, काँग्रेसमधल्या ह्या नेहरूंच्या विरोधकांना त्यांच्या तोंडावर बोलण्याची कधीं हिंमत झाली नाहीं.

खुद्द त्यांच्या मंत्रिमंडळांत असे कांहीं मंत्री होते कीं, नेहरूंच्या मागें ते त्यांची यथेच्छ निंदा करीत, पण नेहरू समोर असले कीं त्यांच्या तोंडाला अक्षरशः कुलूप बसे. चिनी आक्रमणानंतर काँग्रेसच्या नेतृत्वाबद्दल लोकांचा भ्रमनिरास झाला. काँग्रेसच्या नेतृत्वांत आणि धोरणांत तावडतोब बदल झाला पाहिजे, अशी देशामध्यें एकच हाकाटी उठली. नेहरूंच्या मंत्रिमंडळांतले त्यांचे जे विरोधक होते, त्यांना प्रत्यक्ष त्यांच्या विरुद्ध बोलण्याचें धैर्य झालें नाहीं. तथापि कृष्ण मेनन किंवा मालवीय ह्यांच्यासारखे नेहरूंना पाठिंबा देणारे आणि त्यांच्या विश्वासांतले जे मंत्री होते, ते मात्र मधल्यामध्यें विरोधकांच्या विषारी प्रचाराला बळी पडले.

'नेहरूंचें नेतृत्व संकटांत आहे!' असा आरडाओरडा करून काँग्रेसमधल्या पुरोगामी आणि प्रतिगामी शक्ति त्याचें खापर एकमेकांच्या डोक्यावर फोडूं लागल्या. पुढें चिनी आक्रमणाचें संकट कमी झाल्यानंतर काँग्रेसमधल्या या वातावरणांत एकदम बदल झाला. त्यानंतर 'कामराज योजना' आली आणि तिनें नेहरूंच्या मंत्रिमंडळांतील 'चार' प्रतिगामी मंत्र्यांना निकालांत काढलें. काँग्रेसमधल्या नेहरूवादी डाव्या शक्तींचा हा सर्वांत मोठा विजय होय. भुवनेश्वर काँग्रेसमध्यें नेहरू अकस्मात् आजारी पडल्यानंतर त्यांच्या 'वारसदारी'च्या प्रश्नानें साहजिकच जोरानें उचल खाल्ली. काँग्रेसमधल्या डाव्यांनीं आणि उजव्यांनीं पुन्हां कंबरा कसल्या आणि नेहरूंनंतर राष्ट्राचीं सूत्रें कुणाच्या हातीं सोंपवावींत त्यासंबंधीं त्यांच्यामध्यें आपापसांत वाटाघाटी सुरू झाल्या. या संदर्भांतहि पुन्हां नेहरूंच्या अधिक जवळचे कोण याच एका कसोटीवर निरनिराळीं नांवें पुढें येऊं लागलीं.

लालबहादूर शास्त्री हे नेहरूंच्या अधिक विश्वासांतले आणि त्यांच्या राजकीय धोरणाचे निस्सीम पुरस्कर्ते म्हणून त्यांच्या नांवाचा जास्तींत जास्त गवगवा करण्यांत आला. तर इंदिरा गांधी ह्या प्रत्यक्ष नेहरूंच्याच कन्या म्हणून वडिलांच्या राजकारणाचा वारसा त्यांच्याकडेच चालत आला पाहिजे, असें म्हणण्यांत येऊं लागलें. अर्थात् त्यांच्या नांवाला विरोध करण्याचें धैर्य कोणालाहि झालें नाहीं, याचें कारण अगदीं उघड होतें. तथापि, स्वतः नेहरू आणि इंदिरा गांधी यांनीं त्या कल्पनेचा इन्कार केल्यामुळें तो प्रश्न त्या वेळेपुरता मिटला. एवढ्यांत नेहरूंच्या प्रकृतींत एकएकीं विघाड होऊन त्यांचें अकस्मात् अवसान झालें. साऱ्या भारतवर्षावर— नव्हे साऱ्या जगावर दुःखाचा वज्राघात झाला. ह्या गोष्टीला दोन दिवस झाले नाहींत, तोंच नेहरूंच्या वारसदारीबद्दल डाव्या-उजव्यांत भांडणें होण्याऐवजीं खुद्द उजव्यांमध्येच दोन तट पडले. डाव्यांची फारच पंचाईत झाली. कारण त्यांच्याजवळ इंदिरा गांधीखेरीज दुसरा कुणी उमेदवारच नव्हता. परंतु उजव्या पक्षांत उठलेलें हें वादळ 'कामराज' योजनेला बळी पडलेल्या मंत्र्यांना पुन्हा जीवदान देऊन मिटवण्यांत आलें. आणि भारताच्या पंतप्रधानकीचीं वस्त्रें लालबहादुरांना देण्यांत आलीं.

पण त्यामुळें कॉंग्रेसमधलें डाव्या-उजव्यांचें भांडण कायमचें मिटलें, असें मात्र कोणीं समजूं नये—मुळींच समजूं नये. आज जरी उजव्यांचा जय झालेला असला, तरी त्यांचें राजकारण नेहरूंच्या धोरणाशीं विसंगत आहे, ह्या मुद्द्यावर कॉंग्रेसमधले 'डावे' त्यांच्याविरुद्ध केव्हां उठाव करतील हें सांगतां येणार नाहीं. नेहरूंच्या मृत्यूमुळें विरोधी पक्षांच्या राजकारणामध्येंहि फार महत्त्वाचे बदल होण्याचा संभव आहे. अनेक वर्षांपूर्वीं कॉंग्रेसमधून बाहेर पडलेल्या श्रीमती अरुणा असफअल्लीसारखे विरोधक नेहरूंचें राजकारण सांवरण्यासाठीं पुन्हां कॉंग्रेसमध्यें ज्याप्रमाणें प्रवेश करतील, त्याप्रमाणेंच

नेहरूनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठीं आपापसांतले मतभेद विसरून पुनः एकजूट केली पाहिजे, असें कॉ. डांग्यांसारखे नेते आपापल्या पक्षांना आवाहन केल्यावांचून राहणार नाहींत. सारांश, स्वपक्षीयांना आणि विरोधी पक्षीयांना वर्षांनुवर्षे सतत मोहिनी घालण्याची विलक्षण जादू पं. नेहरूंमध्यें होती, असाच इतिहासाला निर्वाळा द्यावा लागेल.



# रसिकराणा नेहरू

“माझ्या मृत्यूनंतर माझ्या रक्षेमधला चिमुकला मूठभर अंश अलाहाबाद् येथें गंगेमध्यें विसर्जित करावा. म्हणजे तो अंश वाहात जाऊन, भारताच्या किनाऱ्यांना स्नान घालणाऱ्या सागराला मिळेल. माझी उरलेली रक्षा जेथें शेतकरी कष्टतात अशा शेतांमध्यें विमानांतून विखरावी. म्हणजे माझ्या देशाच्या भूमीशीं ती एकरूप होईल.” पंडित जवाहरलाल नेहरूंनीं आपल्या मृत्युपत्रांत प्रकट केलेली ही उदात्त नि हृदयद्रावक अंतिम इच्छा एखाद्या महाकवीलाच साजेशी आहे.

सामान्य माणसाचें मृत्युपत्र म्हणजे जीव गेल्यावर मागें उरलेल्या निर्जीव मालमत्तेच्या विल्हेवाटीचा रुक्ष हिशेब! त्या मृत्युपत्रामधील कायद्याच्या रखरखीत भाषेंत काव्याचा ओलावा यावा कोठून? उलट त्याच्या प्रत्येक शब्दामधून मृत्यूची भेसूर अवकळा डोकावत असते. जनावराच्या मुडद्याचे लचके तोडण्यासाठीं गिधाडांचे झगडे होतात, त्याप्रमाणें मृत्युपत्रानें वांटून दिलेल्या टीचभर मालमत्तेसाठीं अनेकदां

मृताच्या वारसांचे क्षुद्र तंटे माजतात आणि त्या बखेड्यांमधें मृताविषयींचा शोक, एवढेंच काय, पण साध्या माणुसकीचा लवलेशहि नष्ट होतो.

पण नेहरूंचें मृत्युपत्र या साऱ्या जगरहाटीला अपवाद आहे. त्यांच्या मृत्युपत्रांत ज्या मालमत्तेचा उल्लेख आहे, ती केवळ अमोल आहे. नेहरूंचें जीवनसर्वस्व, या राष्ट्रामधील जनतेवरील त्यांचें अथांग प्रेम नि त्यांच्या देहाचा कणनूकण हीच ती मालमत्ता होय. ही थोर मालमत्ता त्यांनीं ज्या वारसांना अर्पण केली आहे तेहि तिला जोपासण्याची विराट जबाबदारी पेलण्यास समर्थ असेच आहेत. या राष्ट्राचा उज्ज्वल इतिहास, त्या इतिहासाच्या अखंड नि प्रचंड ओघाचें प्रतीक असलेला गंगामाईचा युगप्राचीन नि पवित्र प्रवाह, या राष्ट्राच्या भव्यत्वाचा साक्षात्कार घडवणारा हिमालय, या राष्ट्राची पाद्यपूजा करणारा तीर्थराज महासागर, या राष्ट्राची भूमि आणि राष्ट्राच्या विशाल नि सुंदर देहाचा आत्मा असलेली कोट्यवधि जनता हेच नेहरूंचे वारस आहेत. अशी मालमत्ता, तिचा असा दाता आणि असे वारस सबंध जगाच्या इतिहासांत केवळ अद्वितीय आहेत.

या पृथ्वीतलावर नि या भारतामध्यें आजवर अनेक श्रेष्ठ राजकीय मुत्सद्दी नि उदंड कीर्तीचे सत्ताधारी होऊन गेले. पण साक्षात् स्वतःचें मृत्युपत्र लिहितांनाहि ज्यांचें मन हृदयंगम नि भव्य काव्यकल्पनांच्या आकाशांत उंच भराऱ्या घेत होतें, असे एकमेव प्रतिभाशाली राजकीय नेते जवाहरलालच होत. जवाहरलालजींचें सारें जीवनच या काव्यमय वृत्तीनें भारलेलें होतें. तारुण्यांत पदार्पण केल्यापासून आमरण, राजकारणाची कांट्याकुट्यांनीं भरलेली वाट

चालत असतांनाहि हृदयावर त्यांनीं रसिकतेचा टवटवीत नि कोमल गुलाब सतत धारण केलेला होता. राजकीय संघर्षांच्या धकाधकींतहि तो गुलाब नकळत पायदळीं पडून चुरडला गेला नाहीं. स्वातंत्र्यलढ्याच्या धगधगत्या होमकुंडांतहि तो होरपळला नाहीं. राजकीय पराजयांच्या धगीनेंहि तो सुकून गेला नाहीं. क्षुद्र पक्षीय झगड्यांच्या बुजबुजाटांतहि तो किडला नाहीं. पंतप्रधान या नात्यानें देशाच्या नि जगाच्या अनेक चिंतांच्या झळी नेहरूंना सतत लागत असतांहि त्यांच्यामुळें तो गुलाब कोमेजला नाहीं. नेहरूंच्या वार्धक्यांतहि तो निर्माल्य झाला नाहीं. तो रसिकतेचा गुलाब नेहरूंच्या अंतःकरणांत अखेरपर्यंत वहरत राहिला, सुगंध दरवळत राहिला.

नेहरूंच्या चिरतारुण्याचें एक रहस्य त्यांच्या या अक्षय रसिकतेमध्यें आहे. ही रसिकता सौंदर्याच्या केवळ एखाद्यात्र क्षेत्रापुरती मर्यादित नव्हती. रंग, रूप, गंध, स्पर्श, रुचि, ध्वनि, शब्द, विचार, भावना, इत्यादि विविध प्रकारचें जें जें सौंदर्य या जगामध्यें आहे, त्या सर्वांचा आस्वाद घेण्याची उत्कट आसक्ति नेहरूंना होती. त्या आसक्तीमध्यें विषयलंपटता नव्हती, तर खरी रसिकता होती. म्हणूनच, वडिलोपार्जित गडगंज संपत्तीमुळें सर्व प्रकारचीं सुखें उपभोगणें नेहरूंना सुलभ असतांनाहि देशासाठीं नि जनतेसाठीं त्यांनीं त्यांच्या-पैकीं अनेक सुखांचा त्याग केला. तरीहि नेहरूंनीं वैराग्याचें व्रत कधींच घेतलें नाहीं.

राजकारणांत जरी त्यांनीं गांधीजींचें नेतृत्व स्वीकारलें, तरी गांधीवादाचा जीवनविषयक नीरस नि रुक्ष दृष्टिकोन त्यांनीं कधींच मान्य केला नाहीं. गांधीजींनीं दारिद्र्याचा उदोउदो केला, तर नेहरूंनीं स्पष्टपणें सांगितलें कीं, दरिद्री माणसाविषयीं मला जिव्हाळा वाटत असला, तरी दारिद्र्याचा मात्र मी द्वेष करतों. नेहरूंना दारिद्र्याविषयीं वाटणाऱ्या या द्वेषाच्या मुळाशीं समतेची नि सामाजिक न्यायाची वैचारिक

जाणीव ज्याप्रमाणें होती, त्याचप्रमाणें दारिद्र्य व्यक्तीच्या नि समाजाच्या जीवनांतील सौंदर्य नष्ट करतें ही भावनात्मक तळमळहि होती. म्हणूनच एका ठिकाणची गलिच्छ झोंपड-पट्टी पाहतांच 'जाळून टाका या झोंपड्या' असे अतिरेकी उद्‌गार संतापाच्या भरांत त्यांच्या मुखांतून बाहेर पडले.

राजकारणाच्या व्यापांत जेव्हां क्षणभरहि सवड नि संधि मिळेल, तेव्हां नेहरू अंतःकरणामधल्या रसिकतेच्या या ऊर्मींना वाव करून देत असत. ते काश्मीरला जात, तेव्हां तेथील स्वर्गीय निसर्गसौंदर्यानें त्यांचें भान हरपत असे. काश्मीरमधील पर्वताच्या वर्फाच्छादित शिखरांचीं, हिरव्या-गार दर्‍यांचीं, उंच चिनार वृक्षांचीं नि खळखळत्या नद्यांचीं जीं सुंदर वर्णनें नेहरूंनीं आपल्या लिखाणांत केलीं आहेत, तीं ललितवाङ्मयाचे मनोहर नमुनेच आहेत. सुभाष बोस हे १९३८ सालांत गांधीजींच्या विरोधाला न जुमानतां काँग्रेस अध्यक्ष म्हणून निवडून आल्यामुळें गांधीजींनीं काँग्रेस कार्यकारिणीच्या सभासदांना राजीनामा देण्याचा जो आदेश दिला, तो पाळल्यावर नेहरू संध्याकाळीं शेवगांवहून वर्ध्याला पायीं चालत गेले. त्या व्याकुळ मनःस्थितींत, सूर्यास्तामुळें आकाशांत उसळलेल्या विविध रंगांच्या छटांमध्यें त्यांना स्वतःच्या अंतःकरणाचें प्रतिबिंब दिसूं लागलें आणि त्याचें अत्यंत हृदयस्पर्शी वर्णन त्यांनीं लिहून काढलें.

स्वातंत्र्यलढ्याच्या काळांत नेहरू जेव्हां तुरुंगामध्यें असत, तेव्हां कधीं आकाशामध्यें एकत्र झालेल्या काळ्याभोर पावसाळी मेघांच्या बदलत्या आकृति पाहाण्यांत ते दंग होत, तर कधीं तुरुंगाच्या कोठडींत गांधीलमाशा कसें घर बांधतात हें ते एकाग्रतेनें निरखीत राहात. निसर्गसौंदर्याप्रमाणें मानवी

जीवनांतील सौंदर्याचेहि नेहरू मनोमन भोक्ते होते. सर्व प्रकारच्या कलांचें त्यांना विलक्षण आकर्षण होतें. राजधानी दिल्लीमध्यें एखाद्या राष्ट्रीय समारंभानिमित्त रंगीबेरंगी नि चित्रविचित्र वेष परिधान केलेल्या आदिवासी स्त्री-पुरुषांचें नृत्य पाहतांना नेहरूंचें मन एवढें हरखून जात असे कीं, एखाद्या वेळीं त्या आदिवासींच्या हातांत हात घालून ते स्वतः त्यांच्याबरोबर नाचूं लागत. होळीच्या वेळीं राष्ट्राचा हा पंतप्रधान रंग उडवण्यांत नि गुलाल उधळण्यांत दंग होऊन जात असे.

ते संगीताचेहि अतिशय शौकिन होते. एकदा त्यांच्या एका मित्रानें त्यांना विचारलें, "जवाहर, राजकारणाच्या गडबडींत बऱ्याच वर्षांमध्यें तुला सतार ऐकायला मिळाली नसेल नाहीं का?" तो प्रश्न ऐकतां क्षणीं नेहरूंचे नेत्र ओलावले नि बराच वेळ ते उदासपणें स्तब्ध बसून राहिले. दुसऱ्या एका मित्रानें त्यांना एकदां चेष्टेनें म्हटलें, "जवाहरलालजी, तुम्ही राजकारणांत पडलां नसतां तर फार मोठे साहित्यिक झालां असतां. पण गालिबनें स्वतःविषयीं जसें म्हटलें आहे कीं, 'इश्कने निकम्मा कर दिया गालिब, नहीं तो आदमी थे कुछ काम के' तशी तुमची अवस्था झाली आहे. फक्त 'इश्क'च्या जागीं 'राजकारण' हा शब्द घातला कीं पुरे." हें ऐकून नेहरूंचें मन इतकें विचलित झालें कीं, त्यांनीं गालिबच्या त्या काव्यपंक्ति हलक्या आवाजांत दोन-तीनदां घोळून म्हटल्या आणि मग स्वतःशींच विमनस्कपणें हंसून ते पुन्हां कामाला लागले.


नेहरूंना अनेक इंग्रज आणि उर्दू कवींच्या कित्येक कविता तोंडपाठ होत्या. फारसी, अरबी नि उर्दू वाङ्मयाचे एक अत्यंत रसिक नि विद्वान् चाहते असलेले मौलाना आझाद हयात होते, तेव्हां दिवसभराचें काम संपल्यावर ते आणि नेहरू एकत्र येत आणि मग काव्यरसामध्यें डुंबतांना त्या दोघांचे तासन् तास कसे जात होते हें त्या दोघांनाहि कळत नसे.

श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांचे पति कै. रणजित पंडित आणि श्रीमति इंदिरा गांधी यांचे पति कै. फिरोज गांधी यांच्याशीं नेहरूंचें मन रसिकतेच्या रेशमी धाग्यांनीं जोडलेलें होतें. काव्याप्रमाणेंच नेहरूंना रंगभूमीचेंहि अत्यंत आकर्षण होतें. मागें गिरगांव ब्राह्मणसभेनें दिल्लीमध्यें कालिदासाच्या संस्कृत 'शाकुंतल'चा प्रयोग केला, तेव्हां नेहरूंनीं एका अंका-पुरतें त्या प्रयोगाला हजर राहण्याचें कबूल केलें होतें. पण महाकवि कालिदासाच्या थोर प्रतिभेचा मूर्तिमंत आविष्कार रंगभूमीवर प्रत्यक्ष पाहतांच नेहरू एवढे मंत्रमुग्ध झाले कीं, इतर सगळीं कामें बाजूला सारून ते अखेरपर्यंत त्या नाट्य-प्रयोगाला हजर राहिले आणि नंतर रंगपटामध्यें जाऊन त्या नाटकांतील प्रमुख नटांना हर्षभरानें त्यांनीं मिठ्या मारल्या.

नेहरूंच्या या रसिकतेच्या विविध रूपांचें करावें तेवढें वर्णन थोडेंच आहे. त्यांना कलांप्रमाणेंच सर्व प्रकारच्या खेळांची आवड होती. घोड्यावर बसण्यांत तर ते निष्णातच होते. कॉंग्रेसच्या वेगवेगळ्या अध्यक्षांच्या मिरवणुका कधीं हत्तीवरून, कधीं बैलांच्या रथांतून, तर कधीं मोटारगाडींतून निघाल्या. पण १९२९ सालांत नेहरू कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून पहिल्याप्रथमच निवडून आल्यावर त्यांची जी मिरवणूक निघाली तिच्या अग्रभागीं एका उमद्या शुभ्र घोड्यावर स्वार होऊन नेहरू ऐटदारपणें चालले होते. १९३० सालांत कराची कॉंग्रेसच्या वेळीं युवक संघटनेचे नेते या नात्यानें नेहरू आणि सुभाष बोस यांची मिरवणूक निघाली, तेव्हां ते दोघेहि देखणे नि रुबाबदार पुरुष घोड्यांवर स्वार होऊन त्या मिरवणुकीच्या अग्रभागीं जोडीनें चालले होते. तसें मनोरम दृश्य राष्ट्रीय आंदोलनाच्या इतिहासांत पूर्वी नि नंतरहि कधीं दिसलें नसेल.

नेहरूंना युरोपमधील आल्प्स आणि भारतामधील हिमालय पर्वताच्या उतारावरील बर्फावरून घसरगुंडी करण्याच्या खेळाचाहि विलक्षण शौक होता. हा खेळ खेळतांना दोनदां त्यांच्या जिवावरहि जवळजवळ बेतलें होतें. पण साहसी वृत्तीच्या नेहरूंना त्याची पर्वा कधींच वाटली नाहीं. केंब्रिज येथील विद्यालयामध्यें शिकत असतांना नौकांच्या शर्यती-मध्येंहि ते भाग घेत असत. त्यांना क्रिकेटचीहि आवड होती. १९५१ सालांत क्रिकेटच्या एका महोत्सवी सामन्यांत त्यांनीं भाग घेतला आणि त्या वृद्ध वयांतहि 'बॅटिंग' करतांना त्यांनी दाखवलेली चपळाई पाहून सगळे थक्क झाले. गेल्या वर्षी इंग्लंडचा एम्. सी. सी. संघ आणि भारतीय संघ यांच्यामध्यें दिल्ली येथें क्रिकेटचा सामना झाला, तेव्हां प्रकृति बरी नसतांहि पंतप्रधान नेहरू तासन् तास तो सामना पाहात बसले होते.

अशा रीतीनें राजकारणापासून ते वाङ्मयापर्यंत, विविध कलांपर्यंत नि खेळांपर्यंत सर्व क्षेत्रांमध्यें नेहरूंना सर्वव्यापी रसिकतेचें रम्य दर्शन होत असे. या रसिकतेचा उगम मानवी जीवनाच्या सर्व अंगांवरील नेहरूंच्या उत्कट प्रेमामध्यें होता. त्यांच्या इतका खराखुरा सुसंस्कृत नेता देशामध्यें अथवा सबंध जगामध्यें क्वचितच दुसरा कुणी झाला असेल. नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वांतून, त्यांच्या वक्तृत्वांतून, त्यांच्या लिखाणांतून नि त्यांच्या आचरणांतून त्यांच्या या रसिक-तेचा जो सतत आविष्कार होत असे, तो कोट्यवधि जनतेला त्यांच्याविषयीं वाटणाऱ्या गाढ प्रीतीचें एक प्रमुख कारण होता. नेहरूंच्या निधनामुळें केवळ एक श्रेष्ठ राजकीय मुत्सद्दी, जागतिक शांततेचा एक अग्रणी नि एक विद्वानच नव्हे, तर एक खराखरा रसिकराज हरपला आहे.




नेहरूंच्या मरणानें कोणाला दुःख झालें नाहीं? साऱ्या भारताला झालें. साऱ्या जगाला झालें. राष्ट्रपति राधाकृष्णन्-पासून तो पाकिस्तानचे अध्यक्ष अयूबखान यांच्यापर्यंत, अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन यांच्यापासून तो चीनचे पंतप्रधान चाऊ-एन-लायपर्यंत सर्वांना दुःख झालें. नेहरूंच्या मृत्यूच्या यातना मित्रांना जशा झाल्या, तशा शत्रूंनाहि पण जाणवल्या. सूर्य मावळला म्हणजे ज्याप्रमाणें साऱ्या पृथ्वीवर अंधार पडतो, त्याप्रमाणें महापुरुषाच्या मरणानें साऱ्या जगावर शोकाची सावली पडते. तथापि, नेहरूंच्या मोठेपणाचें आणि लोकप्रियतेचें वैशिष्ट्य हें म्हटलें पाहिजे कीं, त्यांच्या मृत्यूनें सर्वांत जास्त जर दुःख कोणाला झालें असेल तर तें लहान मुलांना आणि मुलींना. तरुणांना आणि तरुण स्त्रियांना.

'चाचा नेहरू गेले!' म्हणून देशामधल्या कोट्यवधि मुलांनीं हंबरडे फोडले. आणि लक्षावधि तरुण धाय मोकलून रडूं लागले. आपल्या जन्मदात्या पित्यावर मुलामुलींचें जेवढें

प्रेम नसेल, तेवढें त्यांचें 'नेहरूचाचा'वर प्रेम होतें. 'नेहरूचाचा' हें नांवच मुळीं तरुणांच्या प्रेमाचें एक जिवंत प्रतीक होऊन बसलें होतें. नेहरूचाचा हें नांव कानांवर पडतांच किंवा नेहरूचाचांच्या स्वरूपसुंदर मुखकमलाचें चित्र कुठें दृष्टीस पडलें कीं मुलांमुलींचे चेहरे हर्षानें आणि आनंदानें एकदम टवटवीत आणि प्रफुल्लित होत. आणि त्यांच्या सर्वांगांत नवचैतन्य उत्पन्न होऊन ते हंसूं लागत आणि वागडूं लागत.

मुलांमुलींना नेहरूंचें इतकें आकर्षण वाटत होतें कीं, त्यांना पाहण्यासाठीं हातांतला खेळ सोडून किंवा खाऊ फेकून देऊन तीं तडक नेहरूंच्या सभेला वा मिरवणुकीकडे धांवत जात. कोणत्याहि देशांतल्या राजकीय पुढाऱ्यांना जास्तींत जास्त लोकप्रियता लाभते, नाहीं असें नाहीं; तथापि, मुलांमुलींचें अपरंपार प्रेम ज्यांना लाभलें आहे, असें नेहरूंसारखे भाग्यशाली लोकनेते जगांत विरळाच! नेहरूंच्या पूर्वी महात्मा गांधीजींना काय कमी लोकप्रियता मिळाली होती? पण मुलांना त्यांचें नेहरूंसारखें कधींहि आकर्षण वाटलें नाहीं. आजकाल मुलांमुलींना आणि तरुणांना चित्रपटांमधील नटांचें आणि नटींचें विलक्षण वेड असतें, पण तरुण पिढीवर आपल्या सर्वांगसुंदर व्यक्तिमत्त्वानें नेहरूंनीं जी मोहिनी घातली होती, तिच्या पासंगालाहि शेंकडों राज कपूर आणि दिलीपकुमार पुरे पडणार नाहींत.

नेहरूंच्या अलौकिक त्यागाचें आणि लोकोत्तर कार्याचें महत्त्व ज्यांना माहीत होतें, अशा प्रौढांना आणि वृद्धांना नेहरूंच्या मरणानें दुःख व्हावें हें समजण्यासारखें आहे, पण नेहरूंच्या केवळ नांवाच्या आणि सौंदर्याच्या अजब जादूनें ज्यांचीं मनें आकर्षित झालीं होतीं आणि म्हणून त्यांच्यावद्दल ज्यांना अनिर्वचनीय प्रेम वाटत होतें अशा मुलांमुलींनीं त्यांच्या मृत्यूवद्दल मुक्तकंठानें शोक करावा याचेंच सर्वांना आश्चर्य आणि कौतुक वाटलें. दिल्लीच्या रस्त्यांतून आपल्या मोटारीमधून जेव्हां नेहरू जात असत,

तेव्हां जीं मुलें त्यांना पाहावयाला धांवत आणि तेवढ्यांत त्यांच्याकडे पाहून सस्मित मुखानें नेहरूंनीं जर आपला हात हलवला तर ज्यांना आभाळ ठेंगणें वाटे, त्याच मुलांनीं नेहरूंच्या अंत्ययात्रेंत त्यांची चिरनिद्रित मूर्ति पाहून, 'नेहरू-चाचा आमच्याकडे पाहात नाहींत' असा जेव्हां आक्रोश केला तेव्हां वडीलधाऱ्या मंडळींच्या काळजांना किती पीळ पडला असेल, त्याचें शब्दांनीं वर्णन करतां येणें अशक्य आहे.

नेहरूंच्या चितेला जेव्हां त्यांच्या नातवानें—संजीवनें अग्नि दिला, तेव्हां शांतिघाटावर जमलेल्या हजारों लोकांनीं 'पंडित नेहरू अमर हैं' अशा गर्जना केल्या. पण त्या गर्जनांच्या कल्लोळांतून 'चाचा नेहरू झिंदाबाद' अशा हजारों मुलांच्या आणि तरुणांच्या शोकविव्हल आरोळ्या वर उचंबळल्या, तेव्हां यमुना नदीच्या पाण्याचा प्रवाह देखील कांहीं काळ थिजून बसला असेल. नेहरूंचीं आवडतीं गुलाबाचीं फुलें हातांत घेऊन त्यांच्या समाधीचें दर्शन घ्यावयास जाणाऱ्या मुलांमुलींची तर गेल्या आठवड्यांत कोण रीघ लागून राहिली होती. नेहरूंच्या पवित्र समाधीसमोर 'त्यांचीं अपुरीं राहिलेलीं स्वप्नें पूर्ण करण्यासाठीं आपण आपल्या सर्वस्वाचें दान करूं या' अशी प्रतिज्ञा हजारों तरुणांनीं घेतली. देशामधल्या तरुणांच्या ज्या अनेक संघटना आहेत, ज्या मानवी जीवनमूल्यांसाठीं आणि स्वातंत्र्यासाठीं जन्मभर नेहरू लढले, त्या कार्याला स्वतःला वाहून घेण्याचा ठराव त्यांनीं मंजूर केला. दिल्लीच्या 'यूथ कॉंग्रेस'नें नेहरूंचें कार्य पुढें चालविण्यासाठीं आंतरराष्ट्रीय तरुणांची संघटना काढण्याचें ठरविलें.

नेहरूंच्या मृत्यूचें दुःख केवळ याच देशांतील मुलांमुलींना

झालें असें नव्हे, तर दूरदूरच्या अनेक राष्ट्रांमधल्या मुलांमुलींनीं 'इंदिरामावशी'ला तारा पाठवून आणि पत्रें लिहून 'चाचा-नेहरू' गेल्याबद्दल दुःख व्यक्त केलें. भारतांतल्या आणि जगांतल्या मुलांमुलींना आणि तरुणांना वेड लावणारी अशी कोणती जादू नेहरूंजवळ होती बरें? स्वतःच्या कुटुंबांतल्या पित्याला, चुलत्यांना किंवा मामांना ज्या जिव्हाळ्यानें आणि आपलेपणानें संबोधिलें जातें, तीच भावना नेहरूचाचांबद्दल त्यांना कां बरें वाटावी? याचें कारण अगदीं उघड आहे. मुलांबद्दल आणि तरुणांबद्दल नेहरूंना जसें अपरंपार प्रेम वाटत होतें, तसें प्रेम जगांतल्या फारच थोड्या राजकीय पुढाऱ्यांना वाटलें असेल.

नेहरू हे वृत्तीनेंच मुलासारखे निरागस आणि खेळकर होते. लहान मुलांच्या स्वभावांतलीं सारीं लक्षणें अगदीं सत्तरी उलटून गेली, तरी परवांपरवांपर्यंत नेहरूंच्या अंगामध्यें शाबूत होतीं. लहान मुलांसारखेच ते खोडकर आणि चेष्टेखोर होते. कॉंग्रेसच्या बैठकींत व्यासपीठावर एक पुढारी झोंपला असतां, त्याच्या अंगावर लोड फेकून त्याला त्यांनीं जागें केलें, ही गोष्ट महशूरच आहे. एकदां नेहरू भाषण करीत असतांना त्यांच्या शेजारीं बसलेल्या गुजरातच्या मंत्र्यांना—जीवराज मेहतांना—प्रश्न विचारण्यासाठीं म्हणून त्यांच्याकडे ते वळले, तों जीवराज झोंपीं गेलेले त्यांना आढळले. तेव्हां नेहरू हंसून म्हणाले, 'दमले आहेत बिचारे. झोंपूं द्या त्यांना!' त्यावर सभेंत खूपच हंशा पिकला आणि त्या आवाजानें जीवराज खडबडून जागे झाले.


लहान मुलासारखेच ते अत्यंत संतापी आणि तापट होते. एखाद्या सभेंत गर्दी अनावर झाली आणि खूप गोंधळ झाला, तर व्यासपीठावरून ताडकन् उडी मारून नेहरू त्या गर्दींत घुसत आणि दंगेखोर लोकांना चापट्या आणि थपडा मारून बाजूला करीत. अशा वेळीं त्यांच्या संरक्षक पोलिसांना त्यांना मिठी मारून उचलावें लागे आणि परत व्यासपीठावर आणून

सोडावें लागे. तथापि, त्यांचा हा राग लहान मुलाप्रमाणेंच फार वेळ टिकत नसे. पत्रकारांच्या एका मुलाखतींत ते चिडले असतांना एका धूर्त पत्रकारानें गुलाबाचें एक ताजें फूल आणून त्यांच्या कोटांत खोवलें. त्याबरोबर ते एकदम खदखदा हंसूं लागले. कोणताहि विकार त्यांच्या मनांत फार वेळ राहात नसे. लहान मुलाप्रमाणेंच त्यांचें अंतःकरण अत्यंत पारदर्शक असे. आणि त्यांच्या भावनांचें प्रतिबिंब त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणें उमटलेलें दिसे.

लहान मुलें दिसलीं कीं ते आपलें देहभान विसरत आणि त्या मुलांना जवळ घेऊन मोठ्या प्रेमानें कुरवाळीत. मोठ्या माणसांच्या हारांची त्यांना फारशी पर्वा नसे. पण लहान मुलें त्यांना हार घालायला जवळ आलीं कीं, त्यांना वर उचलून आणि आपली मान वाकवून ते त्यांच्या हातून हार घालून घेत. अशा तऱ्हेचे त्यांचे कितीतरी फोटो प्रसिद्ध झालेले आपण पाहिले आहेत. लहान मुलांच्या मेळाव्यांत ते उपस्थित झाले म्हणजे बाकीचे सारे कार्यक्रम ते विसरून जात आणि जणुं कांहीं आपण फुलांच्या ताटव्यामधूनच फिरतों आहोंत, अशा तल्लीनतेनें ते मुलांच्या रांगांतून हिंडत राहात. कांहीं वर्षांपूर्वीं शिवाजी पार्कवर दीड लाख मुलांनीं जेव्हां त्यांचा सत्कार केला, तेव्हां त्यांच्या मागें दुसरीं अनेक कामें असतांनाहि तिकडे दुर्लक्ष करून मुलांच्या त्या हंसऱ्या मेळाव्यांत किती वेळ तरी ते नाचत बागडत फिरले.

त्यांचे नातू राजीव आणि संजीव जेव्हां लहान होते, तेव्हां त्यांना आपल्या पाठीवर बसवून ओणव्यानें 'घोडा घोडा' खेळ ते खेळायचे. लहान मुलांना जशी कुत्र्याची आवड असे तशी त्यांनाहि होती. मधु, पप्पी, आणि पुतळी ह्या

आपल्या लाडक्या 'सोनकुऱ्यां'ना जवळ घेतल्याखेरीज ते कधींच जेवत नसत. स्वतःच्या कुटुंबांतल्या किंवा ह्या देशांतल्या मुलांवर त्यांचें प्रेम होतें असें नव्हे; तर जगामधल्या सर्वच मुलांवर त्यांचें तेवढेंच प्रेम होतें. हा त्यांचा स्वभाव माहीत असल्यानें निरनिराळ्या देशांतील मुलें निरनिराळ्या गोष्टींची मागणी त्यांच्याकडे करीत. कुणी हत्ती मागे, कुणी अस्वल मागे तर कुणी हरिणें मागत आणि ह्या त्यांच्या मागण्या स्वतःच्या पदरचे पैसे खर्च करून ते पुऱ्या करीत. त्यामुळें जगांतल्या सर्वच मुलांचे ते 'चाचा नेहरू' झाले होते. नेहरूंचा वाढदिवस हा ह्या देशांतल्या सर्वच मुलांच्या आनंदाचा एक राष्ट्रीय महोत्सव होऊन बसला होता. दसरा-दिवाळीपेक्षांहि जास्त हर्षानें आणि उत्साहानें नेहरूचाचांचा वाढदिवस ह्या देशांतील मुलें साजरा करीत असत.



नेहरू ज्या ज्या देशांत जातील किंवा ज्या ज्या समाजांत मिसळतील त्यांचे त्यांचे चित्रविचित्र कपडे अंगावर घालून त्यांच्याप्रमाणें नाचायचा आणि गायचा त्यांना कधींच संकोच वाटला नाहीं. सिक्किम आणि भूतानमध्यें गेले तर त्यांचे कपडे ते अंगावर चढवतील. लडाखी लोकांत आणि नागा लोकांत ते मिसळले कीं त्यांच्या लोकनृत्यांत ते सामील होतील. महाराष्ट्रांत आले तर ते कोल्हापुरी पटका आपल्या डोक्यावर चढवतील. तर गुजरातमध्यें गेले तर गुजराती बायकांच्या गर्भानृत्यांत ते सामील होतील. होळीच्या दिवशीं तर दिल्लीमधले शेंकडों तरुण लोक त्यांच्या बंगल्यांत बेधडक शिरत आणि त्यांच्या कपाळाला गुलाल फासून त्यांच्या अंगावर केशर-पाण्याच्या पिचकाऱ्या मारीत. नेहरूंच्या स्वच्छंदी खेळकरपणाचा आणि खोडकर दंगामस्तीचा होळीचा सण म्हणजे एक अविस्मरणीय कळसच होता.




जगांतल्या कोणत्याहि थोर राष्ट्राच्या पंतप्रधानानें एवढा मनमोकळा रंगेलपणा केल्याचें इतिहासाला नमूद करतां येणार-नाहीं. नेहरूंच्या स्वभावांतलीं हीं सर्व खेळकर लक्षणें

त्यांच्या बालवृत्तीचींच द्योतक होतीं. नेहरूंना मुलांचें जितकें वेड होतें, तेवढेंच फुलांचेंहि वेड होतें. गुलाबाचें फूल हा तर त्यांचा जीव कीं प्राण होता. त्याच्यावांचून त्यांना एक दिवसदेखील जगणें अशक्य होतें. फुलांच्या प्रेमाचा हा रमणीय वारसा त्यांच्या काश्मिरी रक्तांतून त्यांना मिळालेला होता. 'काश्मीर' हें भारताचें 'नंदनवन' आहे. सौंदर्य-देवतेची ही मूर्तिमंत विलासभूमि आहे. ह्या सौंदर्याचा वारसा वंशपरंपरा त्यांच्याकडे चालत आल्यानें, त्यांच्या कणाकणांत सौंदर्य भरलें होतें. सौंदर्य फुललें होतें. सौंदर्य बहरलें होतें. म्हणूनच जगांतील सर्व सौंदर्याचें त्यांना उपजत आकर्षण वाटत होतें.

'जें रम्य तें बघुनिया मज वेड लागे' अशी एखाद्या कवी-प्रमाणें त्यांची सौंदर्यवेडी वृत्ति असे. गंगा-यमुनांच्या संगमावर ते उभे राहिले कीं, निरनिराळ्या ऋतूंमध्यें बदलत जाणारीं त्या नद्यांचीं रूपें ते आपल्या मनांत कोरून ठेवीत. त्या नद्यांच्या अनादि प्रवाहांतून वाहात आलेल्या अमरकथा आणि प्राचीन परंपरा यांचीं जयगीतें ह्यांच्या कानांमध्यें निनादूं लागत आणि भारतीय संस्कृतीचें भव्य आणि दिव्य चित्र त्या दोन नद्यांच्या संगमावर उभ्या असलेल्या त्यांच्या अंतःचक्षूंना भासमान होई. लखनौच्या तुरुंगांत असतांना खिडक्यांच्या लोखंडी गजांतून ते तासन् तास आभाळांतून इतस्ततः जाणाऱ्या ढगांची शोभा पाहात बसत. पर्वताच्या शिखरावरून किंवा सागराच्या किनाऱ्यावरून सूर्योदयाचीं आणि सूर्यास्ताचीं दृश्यें पाहतांना ते आनंदानें बेहोष होऊन जात. सारांश, ते वृत्तीनें, भावनेनें आणि प्रतिभेनें कवि होते आणि ते कवि होते म्हणूनच त्यांना फुलांचें आणि मुलांचें एवढें वेड

होतें. ते कवि होते म्हणूनच शेवटपर्यंत मनानें आणि शरीरानें ते तरुणच राहिले.

किंबहुना, चिरतारुण्याचे ते चिररुचिर प्रतीकच होते. 'प्रौढत्वीं निज शैशवास जपणें' ह्या जन्मजात कविबाण्याचें त्यांनीं शेवटपर्यंत निष्ठेनें संगोपन केलें. त्यामुळेंच देशांतल्या लक्षावधि मुलांच्या मनावर ते मोहिनी घालूं शकले. भारताचें जीवन म्हातारें झालें होतें. युगायुगांच्या सुरकुत्या जनतेच्या कपाळावर पडलेल्या होत्या. त्याच्या आशाआकांक्षा झडून गेल्या होत्या. अशा वेळीं एखाद्या वसंतऋतूप्रमाणें भारताच्या क्षितिजावर नेहरू प्रकट झाले आणि त्यांनीं जनतेच्या जीवनांत नवीन चैतन्य आणि तारुण्य निर्माण केलें. वठलेल्या झाडांना पुनः पालवी आणली, आणि वाळलेल्या फांद्यांना फिरून मोहर आला. अशा रीतीनें भारताच्या जीवनांत आणि राजकारणांत नेहरूंनीं वसंतऋतूचा हर्ष आणि आल्हाद निर्माण केला. त्याचमुळें या राष्ट्रांतल्या मुलांना आणि तरुणांना त्यांच्याबद्दल विलक्षण आकर्षण वाटूं लागलें. मुलें आणि तरुण हेच राष्ट्राच्या क्रांतीचे खरे आधारस्तंभ आहेत, या एकमेव जाणिवेनें नेहरूंनीं त्यांच्यावर अमर्याद प्रेम केलें. म्हणूनच क्रांतीच्या उंबरठ्यावर उभी असलेली आजची तरुण पिढी 'इन्किलाब झिंदाबाद' ही घोषणा करण्याऐवजीं 'नेहरूचाचा झिंदाबाद' अशी गर्जना उद्यां केल्यावांचून राहाणार नाहीं, याविषयीं आम्हांला तिळमात्र शंका नाहीं.



# नेहरूंचे अंतरंग

नेहरूंचें बहिरंग जितकें सुंदर आणि आकर्षक होतें, तितकेंच त्यांचें अंतरंगहि सुरम्य आणि मनोहर होतें. त्यांच्या मानससरोवरांत विविध विचारांचीं कमळें सदैव फुललेलीं असत, आणि भावनांचें सप्तरंगी इंद्रधनुष्य नेहमींच प्रतिबिंबित झालेलें असे. त्यांच्या ह्या अंतरंगाचें हृदयस्पर्शी दर्शन ज्याला घ्यावयाचें असेल, त्यानें त्यांचीं खाजगी पत्रें वाचावयाला हवींत. सार्वजनिक कामाच्या प्रचंड व्यापांत त्यांना जवळच्या नि दूरच्या लोकांना पत्रें लिहावयाला कसा वेळ मिळत होता, त्याचें कौतुक वाटतें. त्यांच्या ग्रंथलेखनापेक्षां त्यांच्या पत्रलेखनाचा पसारा कितीतरी मोठा होता. तो जेव्हां सर्वच्या सर्व प्रसिद्ध होईल, तेव्हां त्यांच्या अंतरंगांत दडलेल्या अनेक दैदीप्यमान रत्नांच्या राशी जगाला डोळे भरून पाहावयाला मिळतील.

सध्यां तरी त्यांनीं लिहिलेल्या पत्रांचे दोनच संग्रह वाचायाला मिळतात. एक, इंदिरेला लिहिलेल्या पत्रांचा नि दुसरा त्यांची धाकटी वहीण कृष्णा हाथीसिंग हिला लिहिलेल्या पत्रांचा. इंदिरेला लिहिलेल्या पत्रांत खाजगी असें फारच थोडें आहे. जगाचा इतिहास तिला त्या पत्रांमधून त्यांनीं सांगितलेला आहे. आपल्या लाडक्या कमलेच्या प्रेमाला आलेलें इंदिरा हें पहिलेंवहिलें आणि एकुलतें एक फूल असल्यानें तिच्यावर जवाहरलालांचें साहजिकच निरतिशय प्रेम होतें. इंदिरेच्या पाठीवर सात वर्षांनीं त्यांना एक मुलगा झाला होता. पण तो एका आठवड्यांतच मरण पावला. त्यामुळें इंदिरा त्यांच्या जीवनसर्वस्वाचा एकमेव आधार झाली होती.

इंदिरेचा जन्म झाल्यानंतर सरोजिनी नायडूंनीं नेहरूंना लिहिलेल्या पत्रांत ती 'भारताचा नवा आत्मा' आहे असें सूचित केलें होतें. नेहरूंची तिच्यावद्दल तीच अपेक्षा होती. इंदिरेच्या तेराव्या वाढदिवशीं नैनीच्या तुरुंगांतून तिला लिहिलेल्या पत्रांत ते लिहितात, "रशियांत लेनिनने महान् क्रांतीचा प्रारंभ ज्या वर्षी केला, त्याच वर्षी तुझा जन्म झाला. राष्ट्रांच्या इतिहासांत अनेक मोठमोठे पराक्रमी पुरुष आणि स्त्रिया होऊन जातात. त्यांचीं स्फूर्तिदायक चरित्रें वाचून आपल्यालाहि असें वाटतें कीं, आपणहि त्यांच्याप्रमाणें व्हावें. जोन ऑफ आर्कची कथा वाचल्यानंतर तुलाहि नाहीं का वाटलें कीं आपण जोनच व्हावें म्हणून? तुझ्या वाढदिवशीं मला एकच संदेश तुला द्यावासा वाटतो, तो हा कीं, तूं शूर हो! आपण शूर झालें कीं आपल्या मनांत भयाला यत्किंचित्‌हि थारा मिळत नाहीं; मग कोणतेंहि लाजिरवाणें कृत्य आपल्या हातून होत नाहीं. सूर्याशीं स्नेह कर. प्रकाशांत जीवन जग. काळोखांत कांहींहि करूं नकोस. प्रकाशाची कन्या हो! म्हणजे मग मोठेपणीं तूं भारताची सेवा करणारी शूर सैनिक होशील!" स्वतंत्र भारतांतल्या प्रत्येक पित्याने आपल्या मुलीला किंवा मुलाला द्यावा असा हा उर्जस्वल आदेश आहे.

धाकटी वहीण कृष्णा हिला लिहिलेल्या पत्रांमधें आपल्या कुटुंबांतील मंडळींवद्दल त्यांना किती जिव्हाळा वाटत असे, त्याचें अत्यंत हृद्‌यंगम दर्शन जागोजाग होतें. रक्षाबंधनाच्या दिवशीं आपल्या वहिणीकडून राखी आली म्हणजे त्यांना अतिशय आनंद होत असे. 'भैयादूज' (भाऊबीज) असली म्हणजे ते आपल्या वहिणीची आठवण करावयाला कधींहि विसरत नसत. तिलाहि आपली आठवण झाली किंवा नाहीं ह्याची ते न चुकतां पत्रानें विचारपूस करीत. मुलीच्या किंवा वहिणीच्या वाढदिवशीं त्यांना आवडणाऱ्या पुस्तकांची भेट पाठवायला ते कधींहि चुकत नसत. नोव्हेंबर महिना हा त्यांचा आवडता महिना होता. कारण त्यांचा स्वतःचा, इंदिरेचा नि कृष्णाचा जन्म त्याच महिन्यांत झालेला होता. एका पत्रामधें ते लिहितात, "नेहरू मंडळींना नोव्हेंबर महिन्यांत जन्माला येणें फार आवडतें."

नेहमीं भाऊबीज झाल्यानंतर नेहरूंचा वाढदिवस येतो. म्हणून आपल्या वहिणीला भाऊबीजेच्या दिवशीं न लिहितां आपल्या वाढदिवशीं लिहावें असा बेचाळीस सालीं त्यांनीं विचार केला होता. पण भाऊबीजेचा दिवस जसा उगवला, तशी त्यांना वहिणीची आठवण झाली आणि त्यावरोबर हातांत लेखणी घेऊन ते तिला पत्र लिहावयाला बसले. "त्रेपन्नावें वर्ष पूर्ण झाल्यानंतर कसें वाटतें तें मला अनुभवावयाचें होतें. म्हणून आयुष्याच्या त्या उदात्त पण तितक्याच त्रासदायक उंचीवरून तुला पत्र लिहावयाचें मीं ठरविलें होतें. पण मागाहून मला माझ्या मूर्खपणाचें हंसूं आलें. म्हणून भाऊबीजेच्या दिवशीं तुला मी हें पत्र लिहितों आहे." त्या वेळीं ते तुरुंगांत होते.

एका पत्रांत ते कृष्णाला लिहितात, "बाप, आई, भाऊ, वहिणी, बायको, मुलगे, मुली आणि इतर थोडे कांहीं लोक ह्यांनाच तुरुंगांतून लिहिण्याची कैद्यांना परवानगी असते. पण मला बाप नाहीं, आई नाहीं, भाऊ नाहींत, बायको नाहीं कीं मुलगा नाहीं. त्यामुळें पत्र लिहिण्याचें माझें क्षेत्र फारच मर्यादित झालें आहे. मुलगी आणि वहिणी ह्यांनाच फक्त मी पत्रें लिहूं शकतों. पण इंदिरा आणि विजयालक्ष्मी ह्या दोघी तुरुंगांत असल्यानें त्यांना माझीं पत्रें मिळतील की नाहीं याची शंका वाटत असल्यानें, शेवटीं तूं शिल्लक राहतेस. म्हणून या क्षणीं तरी ह्या विशाल जगांत जिला पत्रें लिहावयाचीं मला परवानगी आहे अशी तूंच एकटी मला उरली आहेस!" ह्या पत्रांत प्रकट झालेली नेहरूंची ही भावना अंतःकरणाला अक्षरशः पीळ पाडते.

आपले मेहुणे आणि त्यांचीं मुलें यांच्यासंबंधीं प्रत्येक पत्रांत अगत्यानें बारीकसारीक विचारपूस करायला नेहरू कधींच चुकत नसत. राजा हाथीसिंगानें एकदां दाढी वाढविल्याचें त्यांना समजलें. तेव्हां त्यांनीं लिहिलें, "राजा दाढी वाढवितो आहे हें ऐकून मी घाबरून गेलों आहे. अक्षम्य गोष्ट आहे ही."

कृष्णाचे दोन मुलगे हर्ष आणि अजित यांना कोणत्या शाळेत घालावें, याबद्दल सूचना देतांना त्यांनीं मुलांच्या शिक्षणाबद्दल जे विचार व्यक्त केले आहेत, ते अत्यंत चिंतनीय आहेत. ते म्हणतात, "मुलांच्या शिक्षणाबद्दल मी काय सल्ला देऊं? कारण, तो प्रश्न जसा मुलाच्या मनावर अवलंबून आहे, तसा त्याच्या आईबापांच्या ध्येयावरहि अवलंबून आहे. आईबापांना वाटतें कीं आपल्या मुलांच्या अंगांत सगळेच सद्गुण असायला पाहिजेत. अन् आयुष्यांतल्या सगळ्या चांगल्या चांगल्या गोष्टी त्यांना मिळायला पाहिजेत. पण आयुष्यांतल्या प्रत्येक गोष्टी सर्वच्या सर्व आपणांस कशा मिळणार? त्यांपैकीं कांही गोष्टी निवडून त्यावरच आपण भर दिला पाहिजे. शिवाय ज्या काळांत आपण राहतों

आहोंत, तो काळ किती झपाट्यानें बदलतो आहे, त्याचाहि आपल्याला विचार करायला पाहिजे. कांहींहि असलें तरी स्वावलंबन, शरीराची सुदृढता, मनाची जिज्ञासा अन् त्या उभयतांचा मधुर समन्वय आणि जीवनमूल्यांची कांहींशी मूलभूत जाणीव हा माझ्या दृष्टीनें मुलांच्या शिक्षणाचा आधार आहे. बाहेरच्या वातावरणांत समवयस्क मुलांच्या सहवासांत आपल्या मुलांना ठेवल्यानें त्यांचा नेहमींच फायदा होतो. घरांत राहणें आवश्यक तर आहेच; पण त्याचा अतिरेक होणें चांगलें नाहीं. शाळा आणि घर यांच्यामधें एक समतोल उत्पन्न झाला पाहिजे. घरापासून अधून मधून दूर राहिल्या-खेरीज, त्याची गोडी मुलांना उमगत नाहीं. शाळेच्या वातावरणांत स्वावलंबनाच्या आणि सहकार्याच्या भावनेचा विकास होतो."

विजयालक्ष्मीचे यजमान रणजित पंडित हे जेव्हां मरण पावले, तेव्हां नेहरू नगरच्या तुरुंगांत होते. त्याबद्दल ते लिहितात, "रणजितला जाऊन तीन आठवडे झाले. तो आतां जगांत नाहीं हें मनाला पटवून देण्याचा मी सारखा प्रयत्न करतों आहे. कधीं कधीं वाटतं कीं तो जाऊन पुष्कळ वर्षें झालीं आहेत, गेल्या दीड वर्षांत मीं त्याला पाहिलें नाहीं आणि आतां मी ह्या कारावासांत एकटा राहतों आहे. म्हणून सर्व परिस्थितीचा विचार केवळ मनानें आणि कल्पनेनें करावा लागतो. प्रत्येक मृत्यूनें व्यक्तिव्यक्तीमधला आणि कुटुंबा-कुटुंबामधला समतोल ढळतो. मध्येच एक खळगा पडल्या-सारखें होतें. हा खळगा तसाच राहतो आणि निसर्ग मात्र नवा समतोल निर्माण करतो.'

एकतीस सालीं नेहरू कमलाला आणि इंदिरेला घेऊन

लंकेला गेले. तेथें त्यांना जे गंमतीचे अनुभव आले, ते एका पत्रांत त्यांनीं लिहिलेले आहेत. ते लिहितात, “लंकेचे प्राचीन अवशेष पाहण्यासाठीं आम्ही एका डोंगरांतल्या किल्ल्यांत गेलों असतां वर जाणाऱ्या खडकाळ रस्त्यमाध्यें आम्हाला एका नागानें अडविलें. किती वेळ तरी तो आमची वाट धरून बसला होता. शेवटीं आम्ही त्याला कसेंबसें हुसकून लावलें. काल रात्रीं एक चमत्कारिक गोष्ट घडली. मी माझ्या पलंगावरून एकदम खालीं पडलों आणि जागा झालों तेव्हां मला कळून आलें कीं मी जमीनीवर पडलों आहे आणि माझें सारें तोंड रक्तानें भरलें आहे. माझ्या कपाळाला पाऊण इंचाची जखम होती, पण ती फारशी खोल नव्हती. मी कमलाला जागें केलें. माझ्या तोंडावरचें रक्त पाहून ती मूर्च्छित पडली. हें कसें झालें हें कांहीं समजलें नाहीं. दुसऱ्या दिवशीं मोठमोठे डॉक्टर आले. त्यांत हृदयाचे तज्ज्ञहि होते. त्यांनीं माझ्या सर्वांगावर ठोके मारून मला तपासलें आणि माझें हृदय, फुफ्फुस आणि शरीराचे महत्त्वाचे भाग धडधाकट आहेत असा अभिप्राय दिला. येथें प्रवास करतांना कमलाला आणि इंदूला पाहून पुष्कळांचा घोटाळा होतो. कमला ही माझी मुलगी आणि इंदु ही तिची आई आहे, असाच पुष्कळांचा भ्रम होतो.”

माणसाचें आरोग्य आणि प्रकृति उत्तम पाहिजे. त्याशिवाय आयुष्यांतील आनंदाचा आस्वाद घेणें अशक्य आहे, ह्या गोष्टीवर जवळ जवळ प्रत्येक पत्रांत त्यांनीं भर दिलेला आहे. ते सर्व उल्लेख येथें एकत्र करतों. “शरीर उत्तम असेल तरच मनाचा समतोल साधतो. प्रकृति नीट असली म्हणजे मन नेहमींच नीट असतें, असें नव्हे. पण आजारी शरीरांत धडधाकट मन कधींच राहूं शकत नाहीं. मन किंवा शरीर दुखणाईत असेल तर जगण्यांत कांहींच अर्थ नाहीं. वैद्यकीय व्यवसायावर माझा फारसा विश्वास नाहीं. अर्थात् आजारीपणांत किंवा तातडीच्या प्रसंगीं डॉक्टरांकडे जावेंच लागतें. पण आरोग्याचे प्राथमिक नियम जर आपण समजून घेतले

नाहींत आणि त्याप्रमाणें आपण वागलों नाहीं, तर नुसत्या औषधाच्या जोरावर आपला फारसा निभाव लागत नाहीं. तुरुंगांत झाडण्याचें, कपडे धुण्याचें आणि बागेंत खणण्याचें काम मी स्वतः मुद्दाम करीत असतों. त्यामुळें आपला वेळ तर जातोच पण शरीरहि चपळ राहतें. बागेंत काम करतांना मला अतिशय मानसिक समाधान होतें. आणि माझे हातहि गुंतून राहतात. मन आणि शरीर शक्य तितकें धडधाकट ठेवण्याचा मी प्रयत्न करतों. मनाची शरीरावर आणि शरीराची मनावर एकसारखी प्रतिक्रिया होत असते. त्या उभयतां-मध्यें समतोल साधण्याचा माझा प्रयत्न असतो. स्वभावतःच मी उद्योगी आहें. म्हणून जेव्हां माझें मन भकास असतें, तेव्हां कांहींतरी उद्योग मी करीत असतों. वळकट हृदय आणि आनंदी मन हें सुखी आयुष्याचें रहस्य आहे. तुरुंगांत जे लोक आहेत त्या सर्वांत माझी प्रकृति उत्तम आहे. कारण इतरांपेक्षां मी प्रकृतीची अधिक काळजी घेतों. त्या बाबतींत मी स्वतःवर अवलंबून असतों. कांहीं अपघात झाला नाहीं तर माझी प्रकृति अनेक वर्षें तरी अवसानघात करणार नाहीं, असा मला विश्वास वाटतो. तुरुंगांत असतांना प्रकृति चांगली ठेवणें ही इज्जतीची गोष्ट मानतों. तेथें आजारी पडणें हा एक अक्षम्य अपराध आहे, असें मला वाटतें."

बारीकसारीक गोष्टींबद्दल विनाकारण चिंता करीत बसणें नेहरूंना मुळींच आवडत नसे. ते अनेकदां आपल्या पत्रांत लिहितात, "ज्याला आयुष्यांत फारसें महत्त्व नाहीं अशा अनेक बारीकसारीक गोष्टी आपण आपल्या मनाला लावून घेतों. त्यांची निष्कारण चिंता आपण काय म्हणून करावी? आकाशांतल्या ताऱ्यावर आपण सदैव लक्ष ठेवावें आणि

त्याच्या प्रकाशांत आपण जगावें. नेहमीं हंसत राहावें. काळजी कशाची करूं नये. तुरुंगांत असतांना मी माझें मन अगदीं शांत ठेवतों. कशाचीहि चिंता करीत नाहीं. काय म्हणून मी चिंता करावी? दिवसभर मी काम करतों अन् रात्रीं गाढ झोंपतों. तुरुंगांत मी किती वर्षें राहणार आहें, याचा विचारसुद्धा माझ्या डोक्याला शिवत नाहीं."

मनुष्याला आयुष्यांत कांहींतरी ध्येय असलें पाहिजे. यावर नेहरूंचा फार कटाक्ष आहे. ते लिहितात, "ज्यांना आयुष्यांत कांहीं ध्येय नाहीं, तीं समाजवृक्षावर उगवलेलीं निव्वळ बांडगुळें होत. मी स्वतःच्या ध्येयवादानें इतका व्यग्र झालेलों आहें कीं, ज्यांच्या आयुष्यामध्यें कसलेंहि ध्येय नाहीं त्याचें जीवन मला समजूंच शकत नाहीं. प्रचंड क्रांतीच्या आणि संघर्षाच्या काळांत आपण राहात आहोंत! अशा वेळीं आपल्या भोंवतालीं घडणाऱ्या घटनांचा ज्याच्या मनावर परिणाम होत नाहीं आणि ज्याला त्यांत भाग घेण्याची इच्छा होत नाहीं, तो माणूस बौद्धिक दृष्ट्या जिवंत आहे, असें मला वाटत नाहीं. माणसाचें आयुष्य आधींच थोडें. म्हणून तें क्षुद्रपणानें आपण जगू नये. जीवनांतील महान् ध्येयासाठीं आपण रुबावानें जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पुढें काय होईल याची आपण पर्वा करूं नये. आणि अगदी फांशीच जाण्याचा प्रसंग आला, तर दीडशें वर्षांपूर्वी फ्रेंच उमराव ज्याप्रमाणें ऐटीनें आणि मिजाशीनें फांशी गेले, त्याप्रमाणे आपणहि हंसत हंसत दिमाखानें आपल्या वधस्तंभावर चढावें!" मानवी जीवनाचें केवढें भव्य आणि उदात्त चित्र नेहरूंनीं या शब्दांत उभें केलेलें आहे. पराभवाचा विचारहि नेहरूंच्या मनाला कधीं शिवत नाहीं. एका पत्रांत ते लिहितात, "कालचा दिवस वाईट होता. आजचा दिवस वाईट आहे. पण उद्याचा दिवस एखाद्या ज्वालेसारखा आपल्या समोर प्रकाशतो आहे."

एकदां तुरुंगांत असतांना एका इंग्रज कवीची कविता

वाचून ते मनांत विचार करूं लागले, "होय, अजून आपल्याला सूर्य दिसतो. चंद्र दिसतो. पुरुष दिसतो. स्त्री दिसते. कालच शरद्पौर्णिमा होती. पहाटे मी जागा झालों. बाहेर अंधार होता आणि आकाशांतून गुरूचा तारा डोकावत होता. सायंकाळीं शुक्राचा तारा दिसतो. रात्रीच्या वेळीं आकाशाचें स्वरूप हळू हळू बदलतें आहे. शिशिर ऋतु येऊं लागला आहे. निसर्गाच्या ह्या सर्व दृश्यांचा ताजेपणा आहे तसाच कायम आहे. मग माणसें आपणाला तशींच ताजीं टवटवीत कां वाटूं नयेत? जुनीं जुनीं कां बरें दिसतात? आणि स्त्रिया? त्यांना तर मी किती दिवसांत पाहिलें नाहीं! सव्वीस महिने म्हणजे ७८५ दिवस मी आतां तुरुंगांत आहें. ह्या काळांत स्त्री लांबून देखील मी कधीं पाहिली नाहीं. स्त्रिया कशा दिसतात? त्या कशा असतात? त्या कशा बोलतात आणि कशा चालतात? तें सारें सारें मी विसरून गेलों आहें."

नेहरूंच्या पत्रांतून ओथंबणारीं अशीं रमणीय काव्यें वाचतांना आपणालाहि स्थळाचा, काळाचा नि स्वतःचा विसर पडतो. आणि अनंत नक्षत्रांनीं प्रज्वलित झालेल्या शारदीय पौर्णिमेच्या चांदण्यांत रातराणीच्या आणि गुलाबांच्या ताटव्यांत एकाद्या सोन्याच्या कारंज्याखालीं नेहरू आपणांशीं भावमधुर स्वरानें बोलत बसले आहेत असें वाटतें.




पंडित नेहरू आपल्या शेरवानीवर रोज सकाळीं उठतांच लाल गुलाबाचें ताजें टवटवीत फूल लावीत असत, ही गोष्ट साऱ्या जगाला माहीत आहे. ते घरांत असले किंवा लोकसभेंत गेले, जाहीर सभेंत व्याख्यानाला उभे राहिले अथवा स्वदेशांत वा परदेशांत प्रवास करीत असले, तरी त्यांच्या छातीवर सदोदित गुलाबाचें फूल असे. गुलाबाच्या फुलाचें त्यांना कधींच विस्मरण झालें नाहीं.

रोज सकाळीं ते उठले आणि त्यांनीं पोषाख केला कीं त्यांचा माळी हिरालाल त्यांच्या बागेंतलें गुलाबाचें फूल तोडून आणावयाचा आणि त्यांच्या शेरवानींत खोवायचा. जणुं कांहीं तो एक धार्मिक विधीच होऊन बसला होता. बाकीच्या इतर गोष्टींचा एखादे वेळीं त्यांना विसर पडे, पण आपल्या छातीवर गुलाबाचें फूल लावायला मात्र एक दिवस देखील ते कधीं विसरले नाहींत.



गुलाबाचें फूल हें त्यांच्या जीवनाचें एक रमणीय प्रतीकच

होऊन बसलें होतें. म्हणून मरणानंतर त्यांच्यावर लक्षावधि गुलाबाच्या फुलांचा वर्षाव झाला. त्यांच्या शवाची किंवा अस्थीची ज्या ज्या रस्त्यावरून यात्रा गेली, त्या त्या मार्गावर गुलाबाच्या पाकळ्यांचा प्रचंड सडा पसरलेला होता.

गुलाबाचें फूल कोणाला आवडत नाहीं? 'फुलांचा राजा' असेंच त्याला म्हटलें जातें. लाखों लोक गुलाबाच्या फुलांवर प्रेम करतात. पण नेहरूंनीं गुलाबाच्या फुलांवर जेवढें प्रेम केलें, तेवढें क्वचित्च कुणीं केलें असेल. गुलाबाच्या फुलावर नेहरूंनीं एवढें प्रेम कां केलें? एका कवीनें म्हटलें आहे, "सुंदर गोष्टी क्षणभंगुर असतात. त्या नाश पावल्या तरी त्यांचा सुवास मागें रेंगाळत राहतो. पण ज्यानें गुलाबावर प्रेम केलें आहे, त्याच्या हृदयाला त्या गुलाबाच्या सुगंधानें सदैव यातनाच होत असतात."

अशाच एका काश्मीरी गुलाबावर आपल्या आयुष्यांत नेहरूंनीं एकदां प्रेम केलें होतें. पुढें तें फूल कोमेजून गेलें. पण त्याच्या सुगंधाचें दुःख शेवटपर्यंत त्यांच्या हृदयांत सलत राहिलें. त्या सुकलेल्या गुलाबाच्या पाकळ्या शेवटपर्यंत त्यांनीं आपल्या हृदयसंपुटांत जपून ठेवलेल्या होत्या. त्यांच्या अस्थींबरोबरच त्या पाकळ्या प्रयागच्या त्रिवेणीसंगमांत विसर्जन झाल्या. ज्या गुलाबाच्या फुलावर नेहरूंनीं प्राणांपलिकडे प्रेम केलें आणि ज्याचें विस्मरण आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांना कधींहि झालें नाहीं, तो गुलाब दुसरा तिसरा कोणी नसून, त्यांची स्वरूपसुंदर पत्नी कमला हाच होय!

विलायतेहून बॅरिस्टर होऊन परत आल्यानंतर जवाहरलाल आपल्या वडिलांच्या हाताखालीं वकिली करूं लागले. त्यांचें

वडील मोतीलाल हे एक दिवस कुठल्यातरी विवाह-समारंभाला गेले होते. तेथें त्यांनीं सतरा वर्षांची एक काश्मीरी मुलगी पाहिली. ती अंगानें उंच, सडपातळ आणि अत्यंत नाजुक होती. तिच्या गालावर आणि ओठांत गुलाबाचीं फुलेंच जणुं कांहीं उमललेलीं होतीं. तिचें स्वर्गीय लावण्य पाहून त्यांचे डोळे तिच्यावर खिळून बसले. आपल्या मुलाची पत्नी होण्यास हीच मुलगी लायक आहे, अशी त्याच क्षणीं त्यांनीं आपल्या मनाशीं खूणगांठ बांधली. तिचें नांव कमला कौल असें होतें. तिचे वडील दिल्लीमधलेच एक श्रीमंत व्यापारी होते. आपल्या मुलासाठीं मोतीलालनीं कमलेला मागणी घातली. ती कौल यांनीं तात्काळ मान्य केली. जवाहर-लालसारखा कुलीन, श्रीमंत, सुशिक्षित आणि सुंदर जावई सुखासुखी आपल्याला मिळत असतांना कोण 'नाहीं' म्हणेल?

कमला ही स्वभावानें आनंदी, खेळकर आणि मनमोकळी होती. पण ती आपल्या मैत्रिणीशीं आणि घरांतल्या मंडळींशीं. पण परकी माणसांमध्यें ती भारी लाजाळू आणि अति अबोल असे. शिवाय ती हिंदु संस्कृतींत वाढलेली होती. तिला इंग्रजी फारसें येत नसे. शिकलेल्या आणि सुधारलेल्या समाजांत कसें वागावें या रीतिभाती फारशा तिला माहीत नव्हत्या. मोतीलालना ती फार अडचण वाटली. कारण त्यांचें 'आनंदभवन' म्हणजे त्या काळीं पाश्चात्य संस्कृतीचें आगरच होतें. म्हणून त्यांनीं कमलाला अलाहाबाद येथें तिच्या आतेच्या घरीं आणून ठेवलें. तिला इंग्रजी शिकवण्याची व्यवस्था केली. अलाहाबादला आल्यानंतर कमला वारंवार 'आनंदभवनां'त येऊं लागली आणि नेहरू कुटुंबाशीं तिची चांगली ओळख झाली. पण त्या काळांत जवाहरलालांशीं ती कधींच बोलत नसे. त्यांना पाहिलें कीं ती चटकन् लाजून मान खालीं घाली.

पुढें त्यांच्या विवाहासाठीं 'वसंत-पंचमी' चा मुहूर्त ठरला. 'वसंत-पंचमी' म्हणजे वसंतऋतूच्या आगमनाचा क्षण.

काश्मीरांत आणि उत्तर प्रदेशांत वसंत-पंचमी मोठ्या थाटानें साजरी करतात. गळ्यांत पिवळ्या फुलांच्या माळा घालून आणि अंगांत केशरी रंगाचे कपडे घालून तरुण मुलें आणि मुली त्या दिवशीं आनंदानें नाचतात आणि गाणीं गातात. नेहरूंच्या संसाराचा प्रारंभ 'वसंत-पंचमी'च्या मुहूर्तावर व्हावा, हा खरोखर काव्यमय योगच म्हटला पाहिजे.

हें लग्न दिल्लीला झालें. त्यासाठीं शेकडों वऱ्हाडी लांब-लांबून आले. लग्न-समारंभ चांगला दहा दिवस चालला होता. मेजवान्या काय, नाच काय, गाणीं काय; एखाद्या राजपुत्राचें लग्न जेवढ्या वैभवाने झालें नसेल तेवढ्या थाटानें आणि रुबाबानें तें लग्न झालें. तथापि, सर्वांचे डोळे जवाहर-लाल आणि कमला ह्या वधूवरांवरच खिळून राहिले. दोघांचें सौंदर्य आणि लावण्य पाहून लोकांना आपण पृथ्वीतलावर नाहीं असा भास होत होता. साक्षात् मदन आणि रति यांचेंच जोडपें आपण पाहात आहोंत कीं काय असें सर्वांना वाटलें.

लग्न-समारंभ संपतांच नेहरू-मंडळी अलाहाबादला परत आली; आणि जवाहरलाल कमलाला घेऊन मधुचंद्रासाठीं काश्मीरच्या नंदनवनांत गेले. नेहरूंच्या आयुष्यांतील सौख्याची ती परमावधी होती. स्वर्गाशीं स्पर्धा करणाऱ्या काश्मीरच्या त्या सौंदर्यभूमींत वसंतऋतूच्या रमणीय वाता-वरणांत अप्सरेची आठवण करून देणाऱ्या कमलाच्या सहवा-सांत नेहरूंनीं दोनतीन महिने कसे घालविले असतील, त्याचें वर्णन करावयाला महाकवि कालिदासाची प्रतिभा उसनी घ्यावी लागेल. सौंदर्य, तारुण्य आणि विलास ह्यांचा असा मनोहर संगम मानवी आयुष्यांत क्वचितच झाला असेल.

मधुचंद्रावरून परत आल्यानंतर 'आनंद-भवना'च्या आवारांत कमला-जवाहरलालचा नवा संसार मोठ्या आनंदानें उत्साहानें सुरू झाला. एका वर्षाच्या आंतच इंदिरेचा जन्म झाला. तेवढ्यांत गांधीजींची आणि नेहरूंची प्रथम भेट झाली. गांधीजींच्या मोहिनीनें नेहरू भारून गेले आणि आपला कायद्याचा व्यवसाय सोडून त्यांच्या सत्याग्रहाच्या निशाणाखालीं ते दाखल झाले. आपल्या संसाराच्या निळ्याभोर आकाशांत राजकारणाचे कृष्णमेघ इतक्या लवकर प्रगट होतील अशी कमलाला मुळींच कल्पना नव्हती. 'आनंद-भवना'-वर गांधीजींची छाया पडतांच तेथील विलासी आणि ऐषआरामी जीवन पार बदलून गेलें. श्रमाच्या, त्यागाच्या आणि तुरुंगवासाच्या आयुष्याला सुरुवात झाली.

दुःख आणि कष्ट काय असतात तें कमलाला तोंपर्यंत माहीत नव्हतें. तिच्या जागीं जर दुसरी कोणी स्त्री असती, तर ती भीतीनें भेदरून गेली असती आणि चिंतेनें करपून गेली असती. पण आपल्या पतीबरोबर देशसेवेची दीक्षाहि तिनें मोठ्या धैर्यानें आणि आनंदानें घेतली. त्याबद्दल एका शब्दानें देखील तिनें तक्रार केली नाहीं. रामाबरोबर सीतेनें चौदा वर्षें वनवास सहन केला. पण त्या वनवासांत कांहीं काळ रामाची तिला सोबत तरी मिळाली. पण जवाहरलालांचा एक पाय नेहमींच तुरुंगांत होता. कधीं ते तुरुंगांत जातील आणि कधीं बाहेर येतील यांचा कांहीं नेमच नव्हता. जसा कांहीं सरकारचा आणि त्यांचा शिवाशिवीचा खेळ चालला होता. पण पतीच्या वियोगाचें दुःख कमलानें कधींहि मनाला लावून घेतलें नाहीं. स्वातंत्र्याच्या लढ्यांत तिनेंहि धैर्यानें उडी घेतली.

नेहरू हे त्या लढ्याचे सेनापति होते, तर ती एक सामान्य सैनिक होती. मोतीलाल किंवा जवाहरलाल यांची गोष्ट वेगळी होती. राजकारणाच्या झंझावातांत एखाद्या प्रचंड वटवृक्षाप्रमाणें ते दोघे खंबीरपणें उभे राहूं शकले. पण कमला ही एखाद्या वेलीसारखी नाजुक होती. परंतु तिची इच्छाशक्ति

पोलादाच्या तारेप्रमाणें कणखर होती. म्हणूनच ती त्या झंझावातांत थोडा तरी तग धरूं शकली. स्वातंत्र्याच्या वाऱ्यानें पतीप्रमाणें तिलाहि झपाटलें होतें. भावनेच्या त्या भरांत तिनें आपल्या प्रकृतीची आबाळ केली आणि पुढें ती वारंवार आजारी पडूं लागली. आजारानें जरी तिचें शरीर आंतून पोखरलें होतें तरी त्याचा परिणाम तिच्या चेहऱ्यावर मात्र कधींच झाला नाहीं. प्रौढ वयांतहि ती एखाद्या तरुण मुलीप्रमाणेंच मधुर आणि कोमल दिसत होती.

दिवसेंदिवस आपल्या पतीच्या कीर्तीचा झेंडा देशभर फडकत असलेला पाहून कमलाच्या आनंदाला पारावर उरला नाहीं. त्याच भावनेंत ती आपलें दुखणें विसरून जाई. पण असें किती दिवस चालणार? चौतीस सालानंतर तिची प्रकृति झपाट्यानें बिघडूं लागली. मग तिला भवालीच्या आरोग्यधामांत ठेवण्यांत आलें. तेथून जवळ असलेल्या आल्मोरा येथील तुरुंगांत जवाहरलालना सरकारनें मुद्दाम आणून ठेवलें. या हेतूनें की मधूनमधून त्यांना तिला भेटतां यावें. कमलाची प्रकृति तेव्हां अधिकच बिघडली, तेव्हां जवाहरलालना अकरा दिवस तुरुंगांतून सोडण्यांत आलें.

किती वर्षांनीं तरी आपल्या पत्नीच्या सान्निध्यांत निर्वेध शांततेनें बसण्याची त्यांना संधि मिळाली. तिच्या रुग्ण-शय्येवर बसून तिच्या क्षीण शरीराकडे पाहात असतांना आपल्या अठरा वर्षांच्या वैवाहिक जीवनाचा करुण चित्रपट नेहरूंच्या डोळ्यासमोरून सरकला. त्याचें हृदयद्रावक वर्णन त्यांनीं आपल्या आत्मचरित्रांत केलेलें आहे. ते लिहितात, "अठरा वर्षें आमचा विवाह होऊन झालीं. लग्न होऊन पहिल्यानें ती आमच्या घरीं आली तेव्हां ती जशी अल्लड दिसत होती,

तशीच ती अजून दिसते आहे. त्या मानानें मीच आतां जास्त प्रौढ दिसूं लागलों आहे. अठरा वर्षांच्या वैवाहिक जीवनामधली माझी किती वर्षं तुरुंगांत गेलीं आणि कमलाचीं किती वर्षं इस्पितळांत आणि आरोग्यधामांत गेलीं! तिनें आपल्या प्रकृतीची जेवढी काळजी घ्यायला पाहिजे होती तेवढी घेतली नाहीं म्हणून मला तिचा थोडासा राग येतो, पण मी तरी तिला कसा दोष देणार? आपल्याला आजारी-पणामुळें स्वातंत्र्याच्या झगड्यांत आपल्याला भाग घेतां येत नाहीं, म्हणून ती आपल्या जिवाला अतिशय लावून घेते आहे. त्याचाच परिणाम तिच्या प्रकृतीवर झाला आहे. आतां ज्या वेळीं मला तिची जास्त जरुरी लागणार आहे, त्याच वेळीं तर ती मला सोडून जाणार नाहीं ना?"

जवाहरलालांचें आपल्या पत्नीवर किती प्रेम होतें ह्याची कल्पना त्यांच्या ह्या आत्मगत विचारावरून येते. कमलाच्या आजारीपणामध्यें नेहरूंना तिच्याजवळ रहाता यावें म्हणून सरकार त्यांना तुरुंगांतून सोडावयाला तयार होतें, पण तें एका अटीवर—राजकारणांत भाग न घेण्याची त्यांनीं हमी दिली तर! पण तशी हमी देणें म्हणजे आपल्या जीवनाच्या मुळावरच घाव घालण्यासारखें होतें. एका बाजूला प्राणां-पेक्षांही पवित्र अशा मातृभूमीला दिलेलें इमान आणि दुसऱ्या बाजूला प्राणांपेक्षांही प्रिय अशा आपल्या लाडक्या कमलाचे प्राण! त्यांपैकीं कशावर पाणी सोडावयाचें? पण त्या संक-टांतून अखेर कमलानेंच त्यांना वाचविलें. ती त्यांच्या कानांत हळूच म्हणाली, "माझें जें काय व्हायचें असेल तें होऊं द्या. सरकारला कसलीही हमी देऊं नका!" तेवढ्यांत तुरुंगांत परत जायची वेळ आली.

कमलाचा निरोप घेतांना जवाहरलालांना काय वाटलें असेल? "तिची माझी पुन्हा कधीं गांठ पडेल!—का, या आयुष्यांत फिरून तिची नि माझी भेटच होणार नाहीं?"


जर्मनीमध्यें 'वादनवायलर' नांवाचें एक गांव आहे. तेथल्या आरोग्यधामांत कमलाला ठेवण्यांत आलें. पण तेथेंहि कमलाच्या प्रकृतीला उतार पडला नाहीं. दिवसेंदिवस तिची प्रकृति जास्तच बिघडत गेली. तेव्हां मुदत संपण्यापूर्वी सरकारनें जवाहरलालांची मुक्तता केली. विमानानें ते तावड-तोब यूरोपला गेले. त्यांना पाहातांच कमलाला बरें वाटलें. तिची प्रकृति थोडी सुधारली. तेव्हां तिला घेऊन ते लंडनला गेले. तेवढ्यांत कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून जवाहरलालांची पुन्हा निवड झाली. कमलाच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. तिला वाटलें ह्या परिस्थितींत परमेश्वरानें आपले डोळे मिटवावे. तोंच तिच्या प्रकृतीनें उलट खाल्ली. तिला घेऊन परत ते लाउझानला आले. बरोबर इंदिरा होती. २८ फेब्रुवारी १९३६ रोजी लाऊझान येथें कमलाची प्राणज्योत मावळली.

त्याच क्षणीं नेहरूंच्या आयुष्याच्या सुखसर्वस्वाचा सुवासिक गुलाब कोमेजला. कमलाची रक्षा हृदयाशीं धरून शून्य मनानें आणि व्याकुळ हृदयानें नेहरू एकटे स्वदेशीं परतले. विमानांतून येतांयेतांच आपल्या 'आत्मचरित्रा'ची 'अर्पणपत्रिका' त्यांनीं लिहिली. 'कमलास—आतां जी नाहीं!' पत्नीच्या निधनानें नेहरूंच्या अस्तित्वाचा एक खंड समाप्त झाला. त्यांच्या जीवनाचा अर्धा भागच तुटून पडला. कमला आतां आपल्या आयुष्यांत नाहीं हें त्यांच्या मनाला पटावयाला फार कष्ट पडले! आपल्या दुःखाचें विस्मरण व्हावें म्हणून त्यांनीं देशाच्या सार्वजनिक जीवनांत स्वतःला वर्षानुवर्षे बुडवून घेतलें. भारताच्या ह्या टोकापासून तो त्या टोकापर्यंत प्रवास केला. पण त्यांच्या मनाला शांतता आणि स्वस्थता कधींच लाभली नाहीं. कमलाच्या मरणानें त्यांच्या

हृदयाला जी खोल जखम झाली होती ती शेवटपर्यंत कधींच भरून निघाली नाहीं.

कमला गेल्यानें त्यांना आयुष्यांत भयानक एकटेपणा वाटूं लागला. लाखों लोकांची गर्दी त्यांच्याभोंवतीं असली, फुलांच्या हारांचा वर्षाव जरी त्यांच्या डोक्यावर होत असला आणि टाळ्यांचा कडकडाट नि नांवाचा जयजयकार सदोदित त्यांच्या कानामध्यें निनादत राहिला, तरी आपण 'एकटे आहोंत'—आपण 'एकटे आहोंत' ही त्यांची भावना त्यांच्या मनांतून कधींहि जाऊं शकली नाहीं. पंचेचाळीस कोटि लोकांच्या देशाचे पंतप्रधान या देशांत अगदीं 'एकटे' होते ही नेहरूंच्या जीवनाची सर्वांत मोठी शोककथा होती.

आपल्या एकटेपणाचें विस्मरण व्हावें म्हणून ते आपल्या हृदयावर गुलाबाचें फूल नेहमीं लावीत खरे. पण त्या गुलाबाचे कांटे आंत त्यांच्या हृदयाला किती रक्तबंबाळ करीत असत हें त्यांचें त्यांनाच ठाऊक! अठ्ठावीस वर्षांच्या वियोगानंतर प्रयागच्या त्रिवेणीसंगमांत कमला-जवाहरांच्या आत्म्यांचा संयोग झाला. अस्थीला अस्थि मिळाली आणि रक्षेमध्यें रक्षा मिसळली. अशी हृदयद्रावक प्रेमकहाणी क्वचित्‌च पाहावयाला किंवा ऐकावयाला मिळेल. भारतीय स्वातंत्र्याच्या कल्पलतेवर उगवलेला जवाहर-कमलाच्या प्रेमाचा हा गुलाब चिरंतन प्रफुल्लित राहील!




पंडित नेहरूंचें स्मरण झालें म्हणजे डोळयासमोर महाकवि कालिदास उभा राहतो. निसर्गाच्या सौंदर्याचें मूर्तिमंत दर्शन जसें कालिदासाच्या काव्यांत होतें, त्याप्रमाणें मानवी जीवनाच्या सौंदर्याचा साक्षात्कार नेहरूंच्या मनोहर व्यक्तिमत्वांत होतो. कालिदासानें काव्य लिहिलें. पण नेहरू तें काव्य जगले. कालिदासाच्या काव्यामधून दरवळणाऱ्या सुगंधाच्या उन्मादानें ज्याप्रमाणें अंतःकरण धुंद होतें, त्याप्रमाणें नेहरूंच्या भोंवतीं सदैव पसरलेल्या सौंदर्याच्या आल्हादकारक वातावरणानें मनें भुंग्याप्रमाणें आकर्षित होत असत. कालिदासाचें रूप आणि आकृति कशी होती हें कळावयाला कांहीं मार्ग नाही. पण तो बहुधा पंडित नेहरूंसारखाच सुंदर दिसत असावा अशी कल्पना केली, तर ती वावगी ठरूं नये असें वाटतें.

कालिदासाची प्रतिभा जर एवढी रमणीय होती, तर त्याची

आकृति रमणीय कां असूं नये ? शकुंतलेचें अलौकिक सौंदर्य पाहून दुष्यंत ज्याप्रमाणें म्हणाला :

*मानुषीषु कथं वा स्यादस्य रूपस्य संभवः ?*
*न प्रभातरलं ज्योतिरुदेति वसुधातलात् !*

'मनुष्यकुळांत अशा रूपाचा संभव होणें कसें शक्य आहे ? अशी तेजस्वी ज्योति जमिनींतून कशी उगवेल ?' सौंदर्यांतूनच सौंदर्य जन्माला येतें. म्हणून ज्याच्या प्रतिभेंत सौंदर्याचें अनंत भांडार भरलें होतें, तो कालिदास सुंदर नसणें कसें शक्य आहे? नेहरूंनीं जरी कालिदासाप्रमाणें काव्य रचलें नसलें, तरी त्यांचा आत्मा हा कवीचाच होता ह्यांत मुळींच शंका नाहीं आणि म्हणूनच त्या आत्म्याच्या निवासाला शोभेल असेंच सुंदर नि मोहक शरीर निसर्गानें त्यांना दिलें होतें.

सौंदर्याची एक कसोटी कालिदासानें सांगून ठेवली आहे.

*सरसिजमनुविद्धं शैवलेनापि रम्यम्*
*मलिनमपि हिमांशोर्लक्ष्म लक्ष्मीं तनोति*

कमळाच्या भोंवतीं शेवाळ असलें तरी तें रम्यच दिसतें. चंद्राला डाग असला तरी त्याची त्यामुळें शोभाच वाढते. 'किमिव हि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम् ?' सुंदर माणसाला कोणती गोष्ट शोभत नाहीं ? पंडित नेहरूंनीं अंगावर सम्राटाची वस्त्रं घातलीं असतीं, तर तीं त्यांना निःसंशय शोभलींच असतीं. पण खादीचें साधें कपडे त्यांनीं घातलें, तरी त्यांत ते अतिशय सुंदर दिसत होते. राजकारणाचीं शेवाळें जरी त्यांच्याभोंवतीं सदैव जमलेलीं होतीं, तरी त्यामुळें त्यांची आकृति जास्तच उठून दिसत होती. तुरुंगाच्या गजाआडूनहि त्यांचा मुखचंद्र अधिकच शोभायमान दिसत होता.

नेहरूंच्या एकंदर जीवनाचा विचार केला म्हणजे मला कालिदासाच्या 'ऋतुसंहार' ह्या काव्याची आठवण होते. 'ऋतुसंहार' ह्या काव्यांत कालिदासानें निरनिराळ्या ऋतूं-मधील निसर्गाच्या विविध सौंदर्याचें अत्यंत आल्हादकारक

दर्शन घडविलेलें आहे. त्याप्रमाणें नेहरूंच्या आयुष्यांतहि त्या सर्व ऋतूंच्या विविधतेचा नि वैभवाचा साक्षात्कार होतो. नेहरूंना संस्कृत चांगलें येत होतें. नगरच्या कारागृहांत असतांना कालिदासाचें 'शाकुंतल', नि 'मेघदूत' आणि बाणभट्टाची 'कादंबरी' ह्या पुस्तकांच्या मूळ संस्कृत प्रती त्यांनीं मागवल्या होत्या. कालिदासाच्या काव्याचा दृढ संस्कार त्यांच्या मनावर झालेला होता.

संस्कृत साहित्याचा नाद त्यांना त्यांच्या भगिनी विजयालक्ष्मी ह्यांचे पति रणजित पंडित ह्यांच्यामुळें लागलेला होता. रणजित पंडित हे महाराष्ट्रीय होते आणि संस्कृत भाषेवरील त्यांचें प्रभुत्व आनुवंशिक होतें. इंग्रजी भाषेंत तर ते उत्कृष्ट काव्यरचना करीत असत. कल्हण कवीची 'राजतरंगिणी', विशाखदत्ताचें 'मुद्राराक्षस' आणि कालिदासाचें 'ऋतुसंहार' ह्या अमर कलाकृतींचीं त्यांनीं केलेलीं भाषांतरें इतकीं सुंदर आहेत, कीं मोठमोठ्या आंग्ल टीकाकारांनीं त्यांची मुक्त कंठानें प्रशंसा केलेली आहे. रणजितला 'ऋतुसंहार' काव्याचें विलक्षण आकर्षण होतें.

हिमालयाच्या उत्तुंग उतारावरील अलमोऱ्यापासून थोड्या अंतरावर 'कुमावन' टेकड्यांच्या समूहांत 'खाली' नांवाची एक टेकडी आहे. त्या टेकडीवर रणजितच्या मालकीचा एक अत्यंत रमणीय असा फुलांचा नि फळांचा बाग होता. त्याच्या मधोमध एक शोभिवंत बंगला होता. त्या बंगल्याला त्यानें 'ऋतुसंहार' असें नांव दिलें होतें. जगांत अनेक सुंदर सुंदर बंगले असतील आणि त्यांना पुष्कळ चांगलीं चांगलीं नांवें दिलेलीं असतील. पण 'ऋतुसंहार' ह्या नांवाइतकें काव्यमय नांव क्वचित्‌च एखाद्या घराला कोणीं दिलेलें असेल.

ह्या ‘ऋतुसंहारा’च्या परिसरांतून हिमालयाचीं उंच उंच बर्फाच्छादित शिखरें आणि त्याच्या उतारावरील सूचिपर्ण वृक्षांचीं काळीं हिरवीं घनदाट जंगलें सदैव दृष्टीला आल्हाद देत असत. वसंतऋतूंत सूर्याचीं सोनेरी किरणें सदैव ह्या बंगल्यावर नाचत असत. त्याच्या परिसरांत ॲप्रिकॉट आणि आणि वीच फळांच्या भारानें वाकलेल्या वृक्षांच्या रांगा एकसारख्या लागून राहिलेल्या असत. अकेशिया नि मिमोसा ह्यांच्या फुलांचा सुगंध सर्वत्र वातावरणांत दरवळून जात असे. दिवेलागणीच्या वेळीं बंगल्याच्या एका अर्धप्रकाशित खोलींत शेगडीमध्यें जळणाऱ्या देवदाराच्या ढलप्यांच्या नारिंगी ज्वालांसमोर मानवी जीवनांतील सौंदर्याचें चिंतन करीत पुष्कळदां रणजित बसत असे. त्यांच्या काव्यमय सांनिध्यांत पंडित नेहरूंनींसुद्धां त्या सुरम्यस्थळीं कांहीं दिवस वा रात्री घालविल्या असाव्यात.

रणजित पंडितांचें हें रमणीय वास्तव्य रवींद्रनाथ टागोरांना तर इतकें आवडले, कीं एका वसंतऋतूमध्यें त्या ठिकाणीं येऊन ते प्रत्यक्षच राहिले आणि त्याच वेळीं कालिदासाच्या ‘ऋतुसंहारा’चें इंग्रजी भाषांतर करण्याचा गुरुदेवांनीं रणजितला आदेश दिला. रणजितनें ‘ऋतुसंहारा’चें केलेलें हें इंग्रजी भाषांतर त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झालें. त्याला सरोजिनी नायडूंनीं अत्यंत हृदयंगम प्रस्तावना लिहिली आहे.

हें सर्व सांगण्याचें कारण इतकेंच कीं, रणजित पंडितांच्यामुळें ‘ऋतुसंहार’ काव्याचा नेहरूंच्या अंतःकरणावर निश्चित संस्कार झालाच असला पाहिजे. नेहरूंचें भाग्यच एवढें मोठें कीं, सौंदर्याच्या सांनिध्यांत त्यांचें सर्व आयुष्य गेलें. मानवी जीवन अधिक सुंदर कसें करतां येईल, ह्याखेरीज त्यांनीं दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीचा विचार केला नाहीं. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर ह्यांनीं त्यांना जेव्हां प्रथम पाहिलें, तेव्हां नेहरूंच्या रूपानें साक्षात् ऋतुराज वसंतच आपल्यापुढें उभा आहे असें त्यांना वाटलें.

'ऋतुसंहारां'त कालिदासानें वसंतऋतूचें वर्णन किती बहारीचें केलें आहे.

*प्रफुल्ल-चूतांकुर-तीक्ष्ण-सायको*
*द्विरेफ-माला विलसद्धनुर्गुणैः*
*मनांसि वेध्दुं सुरतप्रसंगिनाम्*
*वसंतयोद्धा समुपागतः प्रिये*

ज्याच्या धनुष्याला भृंगमालिकेची दोरी जोडली आहे आणि प्रफुल्ल आम्रमंजिरीचे बाण ज्यानें त्या दोरीवर चढवलेले आहेत. तो पहा हा वसंत योद्धा तरुणांचीं अंतःकरणें विद्ध करण्यासाठीं आला आहे! आपल्या आकर्षक आकृतीनें आणि मधुर वाणीनें देशांतील लक्षावधि तरुणांचीं नि तरुणींचीं अंतःकरणें जिंकणारे नेहरू हे जणुं कांहीं त्या वसंत योद्ध्याचे मूर्तिमंत अवतार आहेत असेंच वाटतें.

कालिदासानें वसंतकालाचें जें वर्णन केलें आहे, तें वाचतांना आरक्त रंगाचीं पलाश आणि कर्णिकार पुष्पें डोळ्यांना सर्वत्र दिसतात. आम्रमंजिरीचा मधु प्राशून उन्मत्त झालेल्या कोकिळांचें कूजित ऐकूं येतें. चंदनाच्या सुगंधानें दरवळणारा मलयानिल अंगाला हर्षकंपित करतो. तरुणांच्या जीवनांत नवचैतन्य निर्माण करणाऱ्या कुसुममासाशीं नेहरूंचें साम्य नाहीं असें कोण म्हणेल?

ग्रीष्मऋतूचें कालिदासानें जें वर्णन केलें आहे तें सुद्धां नेहरूंच्या रागीट आणि तापट स्वभावाशीं जुळतें. निदाघकाल कसा असतो? तर 'प्रचण्ड सूर्यः स्पृहणीय चंद्रमा'! ग्रीष्मऋतूंत सूर्याचा ताप असह्य असतो, पण 'दिनान्त रम्यः' संध्याकाळ रमणीय असते आणि रात्रीं चंद्रमा अत्यंत आल्हाद-

दायक वाटतो. सूर्याची उष्णता नि चंद्राची शीतलता ह्यांचा मनोज्ञ समन्वय नेहरूंच्या स्वभावांत झालेला होता. रात्रीच्या वेळीं घराच्या सौधतलावर पाटलकुसुमांनीं सुगंधित केलेल्या वायुलहरींत सुललित अशा गीतांचे स्वर ऐकत आपला ग्रीष्मकाळ जावा अशी कालिदासानें जी मनोहर इच्छा व्यक्त केली आहे ती नेहरूंना आपल्या आयुष्यांत क्वचित्च पूर्ण करतां आली असेल.

वर्षाकाळाचें कालिदासानें केलेलें वर्णन अत्यंत नेत्रोद्दीपक आहे. घनागम म्हणजे वर्षाकाळ कसा असतो तर सत्तेच्या गर्वानें उद्धट झालेल्या राजासारखा असतो! जलानें भरलेले प्रचंड मेघ हे त्याचे मदोन्मत्त हत्ती असतात. विद्युल्लतेचा प्रकाश ह्या त्याच्या फडकणाऱ्या पताका असतात आणि त्यांचा कडकडाट हा त्याच्या रणवाद्यांचा खणखणाट असतो. घनागमाचें हे रौद्रदर्शन नेहरूंच्या स्वरूपांत कधीं झालेंच नाहीं, असें कोणाला म्हणतां येणार नाहीं. पावसाळ्यामध्यें कमळाला फुलें नि पानें नसतात. त्यामुळें कमळाच्या फुलांतले भुंगे हे मेघांना बघून नाचणाऱ्या मोरांच्या चकाकणाऱ्या पिसाऱ्यावर जाऊन बसतात. त्या वेड्या भृंगांना वाटतें कीं, मोराचीं पिसें हीं जणुं कांहीं कमळेंच आहेत. स्वतःचा पक्ष सोडून नेहरूंच्या परिवारांत नाचणाऱ्या मोरांमुळें आकर्षित झालेल्या माणसांची कित्येकदां ह्या भुंग्यांप्रमाणेंच फसवणूक झाली नसेल काय?

सारांश, कालिदासाचें 'ऋतुसंहार' काव्य हें निसर्ग-सौंदर्याच्या विविध नि रमणीय वर्णनांनीं उचंबळून गेलेलें आहे. त्यांत वृक्षांची पल्लवराजी आहे. प्रफुल्ल पुष्पांचा सुगंध आहे. कोकिळाचें मधुर कूजित आहे. मेघांचा गडगडाट आहे. विद्युल्लतांचा कडकडाट आहे. मयूरांचें नृत्य आहे. जलप्रवाहाच्या क्रीडा आहेत आणि चंद्रकिरणांचें लास्य आहे. हीं सर्व वर्णनें वाचून मन धुंद होतें. 'ऋतुसंहारा'चा प्रारंभ ग्रीष्मऋतूनें होतो आणि शेवट वसंतऋतूमध्यें होतो. शिशिर-

ऋतूमध्यें होत नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. वर्षाचा शेवट शिशिरऋतूमध्यें होतो असें सर्वसामान्य जग समजतें. पण वर्षाची समाप्ति वसंतामध्येंच व्हावी, हें कालिदासाच्या महान् प्रतिभेचें स्वप्न आहे !

नेहरूंच्या जीवनाचें तसेंच झालें. त्यांच्या आयुष्यांत अनेक ऋतू येऊन गेले. अनेक दाहक उन्हाळे आले नि जलप्रलय करणारे अनेक पावसाळेहि आले. त्यांच्या आयुष्याचा शिशिरहि अखेर संपला आणि त्यांच्या आयुष्याचें कमळपुष्प काळरूपी हत्तीनें अकस्मात् तोडून नेलें. 'हा, हन्त हन्त, नलिनीं गजमुज्जहार !' असें असूनहि आज आपल्यासमोर वसंतऋतूच्या नवप्रफुल्लित स्वरूपामध्यें नेहरू उभे आहेत. त्यांचें स्मरण झालें कीं कालिदासाची

*वसंतयोद्धा समुपागतःप्रिये*

ही सुरम्य ओळ आपोआप आपल्या ओठावर नाचूं लागते !


३६८८४ दि: ...२१८६... नों दि: ...



# अखेरचा प्रणिपात

भारतवर्षाला प्रज्वलित करणारी ती महान जीवनज्योत तेरा दिवसांपूर्वी मालवली आणि विश्वज्योतींत विलीन पावली. ती ज्योत ज्या सुंदर देहामध्यें पौर्णिमेच्या चंद्रा-सारखी चौऱ्याहत्तर वर्षे तेवत होती, त्या देहाचे पार्थिव अवशेष आज भारताच्या पवित्र भूमीच्या कणाकणामध्यें आणि पुण्यशाली सरितांच्या जलाजलामध्यें विसर्जन होणार, आणि त्याबरोबर इतिहासानें पूर्वी कधीं न पाहिलेलें असें एक देदीप्यमान सुवर्णस्वप्न आज कालसागरांत विलीन होणार !

सर्व जगाला उच्छिष्ट करणाऱ्या व्यासाच्या 'महाभारता'चें एखादें पर्व संपावे, किंवा वाल्मीकीच्या 'रामायणा'चें एखादें कांडच संपूर्ण व्हावें किंवा कवि कुलगुरु कालिदासाच्या महाकाव्याचा एखादा सर्ग समाप्त व्हावा, तसें शून्यमय आज सर्व वाटत आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या राजकारणांतलें मूर्तिमंत काव्यच आज देशाच्या जीवनामधून मावळलें आहे असें म्हणायला हरकत नाहीं. नेहरूंचें जीवन हें जिवंत



आणि ज्वलंत काव्यच होतें मुळीं. एखाद्या प्रतिभाशाली कवीप्रमाणे त्यांच्या अंतरंगांत अथांग काव्य भरलें होतें. कारण निसर्गाचें नि कलेचें त्यांना विलक्षण वेड होतें. कारागृहापासून काश्मीरपर्यंत किंवा कन्याकुमारीपर्यंत ते कुठेहि गेले, तरी काव्याची सोबत कधीही सोडली नाहीं.

अलिपूरच्या तुरुंगाच्या आवारांत एकहि झाड किंवा झुडुप नव्हतें म्हणून त्यांचा जीव अगदीं गुदमरून गेला. पण शेजारच्या आवारांमधून दोन झाडांचे शेंडे त्यांना दिसले आणि पुढें हळूहळू त्या शेंड्यांना हिरवीगार पालवी फुटूं लागली, तेव्हां त्यांचें अंतःकरण आनंदानें नाचूं लागलें. त्यांपैकीं एका झाडावर घारीचें घरटें होतें. त्याच्याकडे ते तास न् तास पाहत बसत. लखनौच्या तुरुंगांत असतांना आभाळांतून जाणाऱ्या पावसाळी ढगांकडे पाहतांना ते स्वतःच देहभान विसरून जात. कधीं कधीं झंझावातानं ते ढग विस्कटले जात आणि त्यांच्या फटींतून उंच वर निळ्याभोर आकाशाचा विस्तार दिसेल, त्यावेळी त्यांना अनंताचा साक्षात्कार होई.

कारागृहांत अनेक वर्षें त्यांनीं एकट्यानें जीं काढलीं तीं केवळ काव्याच्याच सोबतीनें त्यांना सुसह्य झालीं. त्यासंबंधानें लिहितांना ते म्हणतात, "काळोखाच्या कालप्रवाहांत एकामागून एक ऋतु विलीन होत असतां शुक्लपक्षांतील कौमुदीचें हास्य आणि कृष्णपक्षाच्या निबिड रात्री मी स्वतःच्या विचारतंद्रींत पाहात बसें. जगाकडे तुच्छतेनें पाहत आकाशमार्गांतून दिमाखाने मिरवणाऱ्या तारका किती वेळां तरी माझ्या दृष्टीपुढून जात. त्या गतयामिनींचीं स्मृतिपिशाच्चे माझ्या कानांत हळूच कुजबुजतात, 'एवढें केलेंस, पण काय

साधलेंस ?' " पहाडी मुलुखाचें, डोंगरांचें नि विशेषतः हिमालयाचें त्यांना विलक्षण आकर्षण होतें. हिमालयाच्या दर्शनानें 'माझें मन थक्क झालें. आश्चर्याला नि आनंदाला पारावार उरला नाहीं. घनदाट झाडी पांघरलेल्या पर्वताच्या पलिकडे लांब अंतरावर हिमालयाचीं बर्फाच्छादित शिखरें लखलखत होतीं. मला तीं शिखरें ज्ञानानें गंभीर आणि अगम्य वाटलीं; नि माझा मनस्ताप निवाला !' असें एका ठिकाणीं त्यांनीं लिहिलें आहे.

हिमालयाप्रमाणेंच काश्मीरची त्यांना विलक्षण ओढ होती. ते म्हणतात, "काश्मीर हें स्वप्नासारखें किंवा क्वचितच पूर्ण होणाऱ्या आशाआकांक्षांप्रमाणें अवास्तव वाटतें. स्वप्नांत आपल्याला दिसणाऱ्या आणि जागें होतांच नाहीशा होणाऱ्या आपल्या प्रियतमेच्या सुंदर मुखकमलासारखें तें भासतें." तुरुंगांत असतांना त्यांना कशाची राहून राहून आठवण होत असे ? स्त्रियांच्या आवाजाची नि मुलांच्या हंसण्याची ! एकदां तर जवळ जवळ आठ महिनेपर्यंत कुत्र्याचें भुंकणें आपल्या कानावर पडलें नाहीं या विचाराने ते खिन्न झाले. भारत-वर्षांतून प्रवास करतांना खेडेगांवांमधल्या अगदीं सामान्य माणसामध्यें त्यांना लावण्यमयी स्त्रिया नि शोभिवंत पुरुष दिसत. त्यांना पाहून अजिंठ्याच्या कोरीव लेण्यांतील रमणीय चित्राकृतीची आठवण होई.

जागृतावस्थेंत जशी त्यांची कविकल्पना भराऱ्या मारीत असे, तशी झोंपी जातांना सुद्धां ती जागीच असे. "पापण्यांवर झोंप रांगूं लागली कीं मला वाटे, झोंप म्हणजे एक अजब आणि गूढ चीज आहे. या झोपेंतून मनुष्य जागा होतोच कशाला ? समजा की मी कधींच जागा झालों नाहीं तर ?" जीवन जसें त्यांना काव्यमय वाटे तसा मरणांतहि त्यांना काव्याचाच साक्षात्कार होई. आपल्या पत्नीच्या—कमलाच्या शेवटच्या आजारासंबंधीं लिहितांना ते म्हणतात, "मी जेव्हां तिच्या डोळ्यांकडे पाहात बसे, तेव्हां कोणी तरी अपरिचित

व्यक्ति तिच्या बुबुळांतून माझ्याकडे डोकावते आहे, असा मला भास होई!" वडिलांच्या अंत्यसंस्कारानंतर स्मशानांतून परत येतांना "वर आकाशांत तेजस्वी तारका प्रकाशत होत्या आणि खालीं आम्हीं एकटे नि भकास चाललों होतों" असें त्यांनीं लिहिलें आहे.

गांधीजींच्या मृत्यूवरील त्यांची काव्यवाणी पाहा. "त्यांच्या मरणांतहि वैभव आणि कला होती. त्यांच्या जीवन-मंदिराचा तो शोभिवंत कळस होता. त्यामुळें त्यांच्या चरित्राच्या संदेशाचें महत्त्व वृद्धिंगत झालें. देशाच्या ऐक्या-साठीं ते आयुष्यभर अखंड झगडले आणि त्यासाठींच त्यांना हौतात्म्य पत्करावें लागलें. अकस्मात् मरण यावें असें ज्याप्रमाणें माणसांना वाटतें, त्याप्रमाणेंच त्यांना मरण आलें." जणुं कांहीं स्वतःसंबंधींच नेहरू हें बोलताहेत असें वाटतें. दुसऱ्यांच्या मरणांतच त्यांना काव्य दिसत होतें असें नव्हे, तर स्वतःच्या मरणाचें लोकविलक्षण काव्य दहा वर्षांपूर्वीच त्यांनीं रचून ठेवलें होतें. कालिदासासारख्या किंवा भवभूती-सारख्या महाकवींना सुद्धां आपल्या मृत्यूचें जें महाकाव्य लिहितां आलें नाहीं, असें स्वतःच्या मृत्यूचें अत्यंत प्रभावी आणि हृदयस्पर्शी काव्य रचून नेहरूंनीं भारताच्या कोट्यवधि लोकांच्या काळजांना हात घातलेला आहे.

जीवनाप्रमाणें नेहरूंना मरणाचेंहि आकर्षण होतें हें रॉबर्ट फ्रॉस्ट ह्या अमेरिकन कवीच्या ज्या चार ओळी त्यांनीं आपल्या टेबलावर लिहून ठेवल्या होत्या त्यावरून कळून येतें.

**The woods are lovely,**
**dark aud deep**
**But I have promises to keep**

And miles to go before I sleep
And miles to go before I sleep

अनेक प्रतिज्ञांचें पालन करावयाचें आहे आणि अनेक मैलांचा प्रवास करावयाचा आहे, हें पुरेपूर माहीत असूनहि अकस्मात जर काळानें झडप घातली तर काय करायचें? त्याचीहि काव्यमय योजना या द्रष्ट्या पुरुषानें आधीपासून करून ठेवलीच होती.

"भारतीय जनतेनें माझ्यावर एवढें अपरंपार प्रेम केलें आहे कीं, त्या प्रेमाची परतफेड अल्पांशानेंहि करणें अशक्य आहे. माझ्या वांट्याला भारताच्या सर्व भागांतील, सर्व थरांतील जनतेचें जें प्रेम आलें आहे त्यामुळें मी भारावून गेलों आहें. माझ्या निधनानंतर माझ्या देहाचें दहन करून रक्षा अलाहाबादला पाठवावी. त्यापैकीं मूठभर रक्षा गंगेंत विसर्जन करावी आणि जी राख उरेल ती विमानांतून उंच आकाशांत न्यावी आणि उंचावरूनच ती भारतभूमीवर विखरून टाकावी. भारतांतील शेतकरी जेथें काबाडकष्ट करतो त्या शेतांतून ती पडावी. तेथल्या मातींत ती मिसळून जावी. तेथल्या धुळीशीं ती एकजीव व्हावी. भारताच्या भूमीचाच ती एक अंश बनावी. ही अखेरची इच्छा."

"अलाहाबादजवळून वाहत जाणाऱ्या गंगा-यमुनांशीं लहानपणापासून मी मनानें बांधला गेलों आहे. गंगा ही भारताच्या प्राचीन संस्कृतीचें नि जीवनाचें प्रतीक आहे. गंगेकडे पाहिलें म्हणजे मला हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरांची, खोल खोल दऱ्यांची आणि तिच्या कांठच्या विस्तीर्ण आणि समृद्ध प्रदेशाची आठवण होते. ह्याच प्रदेशांत माझें जीवन घडलें आहे. जीवनकार्य ठरलें आहे. म्हणूनच माझ्या या सर्व मनीषांचा नि भावभावनांचा साक्षीदार असलेल्या माझ्या देहाची थोडी तरी राख गंगेंत पडावी अशी माझी विनंति आहे. भारताच्या सांस्कृतिक परंपरेला माझा तो अखेरचा प्रणिपात आहे. अलाहाबादला गंगेंत

टाकलेली ही राख जो सागर भारतमातेच्या चरणतलांना रोज स्नान घालतो त्या सागराला आपोआपच मिळेल!"

आपल्या देहाचा कणन् कण मातृभूमीच्या मातींत मिसळावा आणि आपल्या अस्थि परमपावन गंगाजळांत पडून त्या महासागरांत वाहत जाव्यात, हें एका लोकोत्तर स्वातंत्र्यवीराच्या देशप्रेमाचें अमर काव्य कोट्यवधि लोकांच्या ओठावर खेळत राहील. नेहरूंच्या ह्या अंतिम इच्छा भारतवर्ष आज श्रद्धेनें आणि आदरानें अक्षरशः पूर्ण करीत आहे. सम्राटालासुद्धां जें भाग्य लाभलें नाहीं तें देशाच्या पंतप्रधानाला लाभत आहे, हा भारताच्या इतिहासांतला सर्वांत मोठा चमत्कार होय. आसामपासून तों लडाखपर्यंत आणि कन्याकुमारीपासून तों काश्मीरपर्यंत, निरनिराळ्या दऱ्याखोऱ्यांमधें आणि पर्वताच्या शिखरावर ठिकठिकाणीं नेहरूंची रक्षा विमानांतून विखुरली जाईल. भारताच्या पावनतीर्थ सरिताजलामधें त्यांच्या अस्थि लक्षावधि लोकांच्या साक्षीनें विसर्जित केल्या जातील. 'सुजला, सुफला, सस्यशामला' अशा ज्या भारत–भूमीच्या मातींतून नेहरूंचा जन्म झाला आणि त्यांचें पालनपोषण झालें, तिच्या त्या मातीच्या कणाकणांत आणि नद्यांच्या बिंदूबिंदूंत आज त्यांच्या दग्ध देहाच्या रक्षेचा कणन् कण एकजीव होणार!

आजपर्यंत नेहरूंचें वास्तव्य केवळ दिल्लींत किंवा ते संचार करतील तेथेंच होत असे. पण ह्यापुढें त्यांचें वास्तव्य अखिल भारत–वर्षांत होणार, किंबहुना साऱ्या भारताला तें व्यापून रहाणार. पूर्वी नेहरू भारतमय होते. यापुढें भारत नेहरूमय होणार. जीवनांत नेहरू जेवढे मोठे होते, त्यापेक्षां अनंत पटीनें आतां ते अधिक मोठे होणार यांत काय शंका? नेहरूंच्या

रक्षेचे कण ज्या ज्या शेतांत पडतील त्यांतून देशाच्या उद्धारासाठीं जन्मभर झगडणाऱ्या नव्या नेहरूंचें अमाप नि तजेलदार पीक जन्माला येवो. नेहरूंच्या रक्षेचे कण ज्या ज्या नद्यांमध्यें विसर्जन करण्यांत येतील, त्या त्या नद्यांमधून त्यांच्या देशभक्तीच्या ज्वलंत प्रेरणा साऱ्या भारतामध्यें वाहत जावोत ! 'नेफा'च्या नि लडाखच्या ज्या पहाडावर नि पठारावर नेहरूंच्या रक्षेचे कण पडतील, त्या कणांकणांतून 'ने-हरू ! ने-हरू !' 'कधींहि हरणार नाहीं—कधींहि हरणार नाहीं—!' अशा वीरगर्जना उत्तरेच्या आक्रमणापासून भारताचें संरक्षण करणाऱ्या आमच्या शूर सैनिकांना एकसारख्या चेतना देत राहोत !

अशा रीतीनें मरणानंतर भारताच्या कणाकणामध्यें नेहरूंनीं आतां प्रवेश केला असल्यामुळें, दिनादिनाला नि क्षणाक्षणाला त्यांचें स्मरण आम्हांला झाल्यावांचून राहाणार नाहीं. स्मरणानेंच माणसाच्या मरणाला खरें मोल येतें. 'स्मरणांत खरोखर जग जगतें !' कविवर्य हरीन्द्रनाथ चट्टोपाध्याय म्हणतात त्याप्रमाणें प्रत्येक दिवस यापुढे सूर्याचें गुलाबफूल आपल्या छातीवर खोवूनच उगवेल नि भारताला नेहरूंचें स्मरण करून देत जाईल !



# अनंताची हांक

समोर सुंदर झाडी आहे
दाट अन् काळीभोर
अजून माझीं पुष्कळ कामें
तशीच पुढें राहिलीं आहेत,
मैल मैल चालायचें आहे
पुष्कळ अंतर तोडायचें आहे
झोपायला अजून वेळ आहे
खूप वेळ आहे
खू—प—च वेळ आहे!



# अखेरची इच्छा

“ भारतीय जनतेनें माझ्यावर एवढें अपरंपार प्रेम केलें आहे, एवढा जिव्हाळा तिनें दाखविला आहे कीं, या प्रेमाची परतफेड अल्पांशानेंहि करणें केवळ अशक्य आहे. खरें म्हणजे प्रेमासारख्या दिव्य भावनेची परतफेड तरी कशी होणार ? अनेकांचें कौतुक झालें, कांहीं जणांना लोकांनीं पूजनीय मानलें, पण माझ्या वांट्याला भारताच्या सर्व भागांतील, सर्व थरांतील जनतेचें जें प्रेम आलें त्यामुळें मी भारावून गेलों आहे. माझ्या उरल्यासुरल्या आयुष्यांत या जनतेला व तिच्या प्रेमाला मी पात्र ठरो, एवढी एकच आशा मी व्यक्त करतों. माझे अनंत सहकारी व अगणित मित्र यांचें ऋण तर कधींच फिटणार नाहीं. अनेक महान् कार्यांत हातांत हात घालून कामें केलीं, तीं करीत असतांना विजय मिळाला तर विजयाचे किंवा दुःख भोगावें लागलें तर त्या दुःखाचेंहि आम्ही भागीदार झालों होतों.

“ मृत्यूनंतर माझ्यासाठीं कोणताहि धार्मिक विधि केला जाऊं नये, असें मला अगदीं मनापासून जाहीर करावयाचें आहे. अशा कर्मकांडावर माझा मुळींच विश्वास नाहीं. केवळ औपचारिक गोष्ट म्हणूनसुद्धां अशा धार्मिक विधींना वळी पडणें म्हणजे एक प्रकारचें ढोंगच ठरेल. त्यामुळें आपली व लोकांचीहि फसवणूक होते असें माझें स्पष्ट मत आहे.

"माझ्या निधनानंतर माझ्या देहाचें दहनच करावें. माझा मृत्यु परदेशांत झाला तर दहन त्या देशांत करून रक्षा मात्र अलाहाबादला पाठवावी. यापैकीं मूठभर रक्षा गंगेत विसर्जन करावी आणि उरलेल्या राखेची विल्हेवाट खाली लिहिल्याप्रमाणें करावी. यापैकीं चिमूटभरसुद्धां राख राखून ठेवूं नये.

माझ्या देहाच्या राखेपैकीं मूठभर राख गंगेत टाका, असें माझ्या देहापुरतें बोलायचें तर मी कोणत्याहि धार्मिक भावनेनें सांगितलेलें नाहीं. अलाहाबादजवळून वाहत जाणाऱ्या गंगा व यमुना नद्यांशीं लहानपणापासूनच मी मनानें बांधला गेलों आहें. जसजसा मी मोठा होत गेलों तसतसें हें बंधनहि अधिकाधिक दृढ होत गेलें. जसजसे ऋतू बदलत जातात तसतसें गंगा-यमुनांचें रूप आणि वृत्ति बदलत जातात. हीं त्यांचीं बदलतीं रूपें मी मनांत कोरून ठेवलीं आहेत. अनेक वेळां या रूपांच्या पलीकडे जाऊन या नद्यांचीं गाणीं मीं ऐकलीं आहेत, त्यांच्या अनादि प्रवाहाबरोबर वाहत आलेल्या कथांचें मी श्रवण केलें आहे. या नद्यांची प्राचीन परंपरा, त्यांचा इतिहास व पुराणांतून त्यासंबंधीं असलेले उल्लेख यांच्यावर मी कितीतरी विचार केला आहे.

"या नद्या, विशेषतः गंगा ही सर्वार्थानें भारताची नदी आहे. गंगेवर भारतांतील जनतेचें अलोट प्रेम आहे. गंगा नदीच्या भोवतीं भरतवंशाचीं अनेक संस्मरणें गुंफलीं आहेत; भारताच्या आशाआकांक्षा, जय-पराजय, यांची गंगा ही साक्षीदार आहे. भारतमातेच्या विजयाचीं गाणीं तिनें ऐकलीं आणि पराभवाचा आक्रोशहि तिनें ऐकला. गंगा ही भारताच्या प्राचीनतम संस्कृतीचें व जीवनप्रवाहाचें प्रतीक आहे. हा जीवनप्रवाह

बदलत राहातो, वाहात राहतो व त्याचें प्रतीक मात्र गंगाच राहतें.

"गंगेकडे पाहिलें म्हणजे मला हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरांची आणि खोल खोल दऱ्यांची आठवण होते; त्याच्यावर मी फार फार प्रेम केलें आहे. या हिमशिखरांप्रमाणेंच मला गंगानदीकडे पाहून समृद्ध आणि विस्तीर्ण अशी दुआबांतील मैदानें आठवतात. याच प्रदेशांत माझें जीवन घडलें आहे. जीवनकार्य ठरलें आहे.

"सकाळीं सूर्यकिरणांच्या कोवळ्या प्रकाशांत गंगा कशी स्मितहास्य करीत, नाचत बागडत चाललेली दिसते, पण एकदा का संध्याछायांचें आवरण पडलें म्हणजे तिचा प्रवाह कसा खिन्न आणि गूढ भासूं लागतो. हिंवाळ्यांत प्रवाह रोडावतो खरा, पण गंगा कशी मंदगतीनें आणि डौलानें वाहात जाते! पावसाळ्यांत तिचा प्रचंड प्रवाह घनगर्जना करीत येतो, त्यावेळचें त्याचें रूप म्हणजे भरदार छातीच्या सागराचेंच जणुं दर्शन; आणि त्या प्रवाहांत सागराप्रमाणेंच विध्वंसकतेचें सुप्त सामर्थ्य! वर्तमानकाळांतून वाहात वाहात भविष्यकालाच्या महान सागरांत एकरूप होणाऱ्या भारताच्या भूतकालाचें गंगा हें मला प्रतीक वाटतें; भव्य स्मारक वाटतें.

"अनेक जुन्या परंपरा व रूढी मी टाकून दिल्या आहेत. भारतीय जनतेंत भेदाभेद उत्पन्न करणाऱ्या, अगणित लोकांना दडपून ठेवून त्यांची भौतिक व आध्यात्मिक उन्नति रोखून धरणाऱ्या सर्व प्रकारच्या बंधांतून भारत मुक्त झाला पाहिजे असें मी सांगत आलों आहें. हें सर्व घडावें असेंच मला नेहमी वाटत असलें तरी भूतकालाशीं पूर्णतः फारकत घ्यावी असें मला कधींच वाटत नाहीं. आपला महान सांस्कृतिक वारसा हें माझेंहि अभिमानाचें निधान आहे. भारताच्या अनंत अशा भूतकालापैकीं इतिहासाचा श्रीगणेशा जेथपासून लिहितां येतो तेथपासूनच्या ज्ञात भूतकालापासून जी एक अक्षुण्ण व अखंड अशी परंपरा चालत आली आहे,

त्या परंपरेचा मी एक दुवा आहें याची जाणीव माझ्या मनांत सतत जागती आहे. परंपरेची ही सांखळी मी तोडणार नाहीं. ही परंपरा म्हणजे माझा अमोल ठेवा आहे. त्याच्यापासून मी सतत स्फूर्ति घेत आलों आहें.

"माझ्या या सर्व मनीषांचा, भावभावनांचा साक्षीदार असलेल्या माझ्या देहाची थोडी तरी राख म्हणूनच गंगेंत पडावी अशी माझी विनंति आहे. भारताच्या सांस्कृतिक परंपरेला माझा तो अखेरचा प्रणिपात आहे. अलाहाबादला गंगेंत टाकलेली ही राख आपोआपच सागराला मिळेल,—जो सागर भारतमातेच्या चरणतलांना रोज स्नान घालतो !

"मात्र मूठभर राखेचें गंगेंत विसर्जन केल्यावर जी राख उरेल ती विमानांतून उंच आकाशांत न्यावी आणि उंचावरूनच ती भारतभूमीवर विखरून टाकावी, ज्या ठिकाणीं भारतांतील शेतकरी काबाडकष्ट करतो त्या शेतांतून ती पडावी. तिथल्या मातींत मिसळून जावी, तिथल्या धुळीशीं ती एकजीव व्हावी. भारताच्या भूमीचाच तो एक अंश बनावा. हीच माझी अखेरची इच्छा आहे."

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ...
सोलापूर

# जीवनपट

| | |
|---|---|
| १४ नोव्हेंबर १८८९ | जन्म : अलाहाबाद |
| १९०५ | हॅरो विद्यालय |
| १९०७ | केंब्रिजचें ट्रिनिटी कॉलेज |
| १९१२ | बॅरिस्टर-ॲट-लॉ, इनर टेंपल; अलाहाबाद हायकोर्टांत ॲडव्होकेट; बंकीपूर कॉंग्रेसमध्यें प्रतिनिधि राजकीय जीवनाला; प्रारंभ |
| १९१६ | कमलेशीं विवाह |
| १९१७ | इंदिरेचा जन्म |
| १९१० | प्रतापगड येथें पहिलें किसान-निदर्शन संघटित केलें |
| डिसेंबर १९२१ | पहिला कारागृहवास |
| १९२३ | अ. भा. कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस |
| फेब्रुवारी १९२७ | ब्रसेल्स येथील दलित राष्ट्रसमूहाच्या परिषदेला राष्ट्रसभेचे अधिकृत प्रतिनिधि म्हणून उपस्थित; मद्रासला ‘स्वातंत्र्य हें कॉंग्रेसचें अंतिम ध्येय’ ठरविण्यांत महत्त्वाचा भाग |
| नोव्हेंबर १९२७ | मॉस्कोमध्यें क्रांतीच्या दहाव्या वाढदिवसाला उपस्थित |
| १९२८ | सायमन कमिशनविरुद्ध निघालेल्या मोर्चाचें नेतृत्व करीत असतां लाठीमार |
| २९ ऑगस्ट १९२८ | सर्वपक्षीय परिषदेंत उपस्थित; भारतीय घटनासुधारणेविषयींच्या नेहरू-अहवालावर सही; ब्रिटिशांपासून संपूर्ण फारकत घ्यावी |

| | |
|---|---|
| | असें प्रतिपादणाऱ्या ' इंडिपेंडन्स फॉर इंडिया लीग 'ची स्थापना व सरचिटणीसपद |
| डिसेंबर १९२९ | लाहोर-कॉंग्रेसचे अध्यक्ष. कॉंग्रेसचें आधीचें उद्दिष्ट बदलून ' संपूर्ण स्वातंत्र्य ' हें ठरवलें |
| १४ एप्रिल १९३० | मिठाच्या कायदेभंग मोहिमेंत अटक आणि सहा महिन्यांचा कारावास |
| १९३२ | पांचव्यांदा शिक्षा |
| १४ फेब्रुवारी १९३५ | अल्मोडा जिल्हा तुरुंगांत आत्मचरित्र पूर्ण केलें |
| फेब्रुवारी-मार्च १९३६ | आजारी पत्नीला भेटण्यासाठीं विमानानें स्वित्झर्लंडला प्रयाण. लंडन, रोम या शहरांस भेटी |
| १९३८ | रिपब्लिकन पक्षाच्या साहाय्यार्थ स्पेनला भेट |
| १९३९ | चीनचा दौरा |
| ३१ ऑक्टोबर १९४० | अटक आणि चार वर्षांची सजा |
| डिसेंबर १९४१ | इतर पुढाऱ्यांबरोबर तुरुंगांतून सुटका |
| १९४२ | भारतांत आलेल्या चॅंग-कै-शेकसह चर्चा; |
| ७ ऑगस्ट १९४२ | मुंबईत भरलेल्या अ. भा. कॉंग्रेस कमिटीच्या अधिवेशनांत ' भारत छोडो ' ठराव मांडला |
| ८ ऑगस्ट १९४२ | अटक; अहमदनगर किल्ल्यांत ठेवलें अखेरचा आणि सर्वांत दीर्घ कारावास |
| जानेवारी १९४५ | सुटका |
| १९४६ | भारताच्या फाळणीला विरोध |
| मार्च १९४६ | पूर्व आशियाचा दौरा |
| ६ जुलै १९४६ | कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून चौथ्यांदा निवड |
| २ सप्टेंबर १९४६ | हंगामी सरकार बनवलें. पंतप्रधान नि परराष्ट्रमंत्री म्हणून अधिकारग्रहण |
| १५ ऑगस्ट १९४७ | स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान |

| | |
|---|---|
| ३ नोव्हेंबर १९४८ | पॅरिस येथें संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या खास बैठकीसमोर भाषण |
| १३ ऑक्टोबर १९४९ | अमेरिकेच्या काँग्रेससमोर भाषण |
| २४ ऑक्टोबर १९४९ | कॅनेडियन पार्लमेंटसमोर भाषण |
| २ एप्रिल १९५० | अल्पसंख्याकांविषयींच्या भारत-पाकिस्तान करारावर सही |
| २६ एप्रिल १९५० | कराचीला भेट |
| जून १९५१ | नेपाळचा दौरा |
| मे १९५३ | लंडनमध्यें राणी दुसरी एलिझाबेथ यांच्या राज्यारोहणाला उपस्थित |
| जुलै १९५३ | कराचीला भेट |
| जून १९५४ | चीनचे पंतप्रधान चाउ एन्–लाय यांच्या-बरोबर बोलणीं |
| २५ जून १९५४ | पंचशीलांची मांडणी करणारा संयुक्त जाहीर-नामा |
| ऑक्टोबर १९५४ | चीनचा दौरा |
| डिसेंबर १९५४ | बर्मा, थायलंड, इंडोनेशिया, मलाया या देशांचा दौरा |
| एप्रिल १९५५ | बांडुंग येथे आफ्रिकी-आशियाई परिषदेला उपस्थित |
| जून–जुलै १९५५ | पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, ऑस्ट्रिया, इटली, ईजिप्त या देशांचा दौरा |
| १३ डिसेंबर १९५५ | पंतप्रधान बुल्गानिन यांच्याबरोबर सह-जीवनाबद्दल संयुक्त पत्रक |
| जून-जुलै १९५६ | आयर्लंड, पश्चिम जर्मनी, पूर्व जर्मनी, फ्रान्स, युगोस्लाव्हिया, ग्रीस, ईजिप्त, सीरिया, लेबॅनन या देशांचा दौरा |
| ११ ऑक्टोटर १९५६ | ईजिप्तविरुद्ध इंग्लंड, फ्रान्स व इस्रायल यांनीं केलेल्या लष्करी कारवाईविरुद्ध तातडीची उपाययोजना करण्याविषयीं संयुक्त राष्ट्रांच्या सरचिटणिसांना संदेश |

| | |
|---|---|
| ३० नोव्हेंबर १९५६ | चीनचे पंतप्रधान चाउ एन-लाय यांचें दिल्लींत स्वागत |
| डिसेंबर १९५६ | अमेरिका, कानडा, यूरोप यांचा दौरा. प्रेसिडेंट आयझेनहॉवर यांच्याशीं बोलणीं |
| २० डिसेंबर १९५६ | संयुक्त राष्ट्र आमसभेच्या अनौपचारिक बैठकींत भाषण |
| जून १९५७ | सिरिया, डेन्मार्क, फिन्लंड, नॉर्वे, स्वीडन या देशांचा सदिच्छा-दौरा |
| जुलै १९५७ | हॉलंड, ईजिप्त, सुदान यांना भेटी |
| ऑक्टोबर १९५७ | जपानचा दौरा |
| ८-१० जानेवारी १९५८ | ब्रिटिश पंतप्रधानांचें स्वागत व चर्चा |
| १६ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर १९५८ | भूतानचा दौरा |
| २३ मार्च १९५९ | तिबेटमधील चिनी चढाईचें लोकसभेस निवेदन |
| ११–१४जून १९५९ | नेपाळला भेट |
| १४–२२ सप्टें. १९५९ | अफगाणिस्तान व इराण यांना भेट |
| ८ ऑक्टोबर १९५९ | ब्रह्मदेशाचे पंतप्रधान ने-विन यांच्याशीं दिल्लींत बोलणीं |
| ११ डिसेंबर १९५९ | संघर्ष शांततामय मार्गानें सोडवण्याच्या निकडीविषयीं प्रेसिडेंट आयझेनहॉवर यांचेसह संयुक्त पत्रक |
| मे १९६० | लंडन येथे राष्ट्रकुल पंतप्रधान परिषदेसाठीं उपस्थित; पॅरिस, ईजिप्त, तुर्कस्तान आणि लेबॅनन यांचा दौरा |
| १९ सप्टेंबर १९६० | सिंधुनदीच्या पाण्याबाबत भारत–पाकिस्तान करारावर सही केली |

| | |
|---|---|
| सप्टेंबर–ऑक्टोबर १९६० | संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या शिखर अधिवेशनांत भारतीय प्रतिनिधि मंडळाचे प्रमुख म्हणून उपस्थित |
| १ ऑक्टोबर १९६० | आयझेनहॉवर आणि क्रुश्चेव्ह यांनीं परस्परांमधील विचारविनिमय पुन्हा सुरू करावा, असा ठराव आमसभेंत मांडला |
| ऑक्टोबर १९६० | जागतिक शांततेची निकड स्पष्ट करणारें भाषण संयुक्त राष्ट्र आमसभेपुढें केलें |
| मार्च १९६१ | राष्ट्रकुल पंतप्रधानांच्या परिषदेस उपस्थित. |
| सप्टेंबर १९६१ | बेलग्रेड येथील तटस्थ राष्ट्रांच्या शिखर परिषदेस उपस्थित |
| मार्च १९६२ | सार्वत्रिक निवडणुकींत कॉंग्रेसला सत्ता प्राप्त झाल्यावर तिसऱ्यांदा पंतप्रधान |
| जानेवारी १९६४ | भुवनेश्वर कॉंग्रेस बैठकीनंतर प्रथम प्रकृति बिघडली |
| २७ मे १९६४ | दिल्ली येथें देहावसान |

REFBK-0013808

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 3६९९४ वि: चरित्र
क्रमांक 99७६ नों. दि. ५५५८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 93८०८